CMYK



सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २५ मार्च २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक ११६ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपण भारतीय लोक आदर्श व्यक्तीला महापुरुष मानतो, त्याचे देवात रूपांतर करतो आणि आपली जबाबदारी संपवतो. मला फक्त भारतासाठी नव्हे तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी प्रभू रामचंद्राला देवरूपात न दाखवता मनुष्यरूपात दाखवायचे आहे. तरच त्यांचे हे रूप लोकांसाठी प्रेरणादायी ठरेल.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# सोलापूर-पुणे महामार्गावरील सावळेश्वर टोलनाक्याची तोडफोड

**कर्मचाऱ्यांनी केली ट्रकचालकास मारहाण**

**चिडलेल्या वाहन चालकांनी केला रास्तारोको**

**वाहनांच्या लागल्या होत्या रांगाच रांगा**



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२४ मार्च-**

सोलापूर-पुणे महामार्गावरील सावळेश्वर टोल नाक्याची तोडफोड करण्यात आल्याची घटना मंगळवार, दि.२४ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडली. या टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांकडून एका ट्रकचालकास बेदम मारहाण करण्यात आली. यात ट्रकचालक गंभीर जखमी झाल्याने चिडलेल्या अन्य वाहनचालक एकत्र येत रास्ता रोको केले. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक बराच वेळ खोळंबली होती.

याबाबतचे वृत्त असे की, मंगळवारी टोल देण्या-घेण्याच्या कारणावरुन कर्नाटक राज्यातील सिध्दू स्वामी (वय-३२, रा.बसवकल्याण) या ट्रक चालकासोबत येथील कर्मचाऱ्यांशी वाद झाला. वादावादीचे पर्यवसन मारहाणीत झाली. या बेदम मारहाणीत ट्रकचालक सिध्दू स्वामी रक्तबंबाळ झाला. त्यामुळे अन्य वाहनचालक जाम चिडले. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या दादागिरीच्या विरोधात रस्ता अडवून धरला.

रास्ता रोको दरम्यान तीन ते चार कि.मी. वाहनाच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. ट्रकचालक सिध्दू स्वामी याच्यावर मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापुरातील सिव्हील हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. त्याच्या पायाला मल्टिपल फ्रॅक्चर झाले असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. मोहोळ पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

### घटनेच्या वेळी वाहतूक पोलिस कोठे होते?

सावळेश्वर टोलनाका येथे सोलापूरकडच्या बाजूला महामार्गाचे वाहतूक पोलिस नेहमी थांबलेले असतात. ते येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची तपासणी करत असतात. या घटनेच्या वेळी ते कोठे होते? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

### पोलिस पथक घटनास्थळी दाखल

मंगळवारी दुपारी ३ ते ६ यावेळेत फ्री टोल चालू होता. दरम्यान, घटनेची खबर मिळताच मोहोळचे पोलिस निरीक्षक बाजीराव पवार, गुप्त वार्ता विभागाचे गजानन माळी यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी धाव घेतली. राज्य राखीव पोलीस दलाला पाचारण करण्यात आले होते.

### दादागिरी व मारहाणीच्या घटना

सोलापूर-पुणे महामार्गावरील सावळेश्वर टोल नाका येथील कर्मचाऱ्यांकडून टोल वसुलीसाठी दादागिरी व वाहनचालकांना मारहाण करण्यात येत असल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. मात्र भीतीपोटी याविषयी तक्रार दाखल होत नसल्याचे सांगण्यात येते.

## महत्त्वाचे

### तेल खरेदीसाठी भारत-इराणमध्ये करार

**नवी दिल्ली :** अमेरिकेच्या निर्बंधांमधून तात्पुरती सूट मिळाल्यानंतर भारतीय कंपन्यांनी इराणकडून तेल खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजने इराणसोबत ५० लाख बॅरल कच्चे तेल खरेदीसाठी मंगळवारी करार केला. करारानंतर तेल खरेदीस सुरुवात करण्यात आली. इराणकडून खरेदी करण्यात येणार तेल भारतासाठी महागडे ठरत आहे. कच्च्या तेलाची किंमत जागतिक क्रूड बेंचमार्क, ब्रेंट फ्युचर्सपेक्षा प्रति बॅरल सुमारे ७ डॉलर इतकी जास्त निश्चित करण्यात आली. रिलायन्स इंडस्ट्रीजने इराणच्या सरकारी कंपनीसोबत करार केला. मे २०१९ नंतर भारताने केलेली इराणी तेलाची पहिली खरेदी आहे. इराणवरील अमेरिकेच्या निर्बंधांमुळे भारताने आपली खरेदी स्थगित केली होती. ■

### शेअर बाजारात जोरदार पुनरागमन

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय तणाव निवळण्याची चिन्हे आणि जागतिक बाजारातील सकारात्मक संकेतां ुळे भारतीय शेअर बाजाराने मंगळवारी जोरदार मुसंडी मारली. सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांनी मोठी झेप घेतली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील हल्ले तात्पुरते थांबवण्याचे संकेत दिल्याने गुंतवणूकदारां ध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. मंगळवारी बाजार बंद होताना मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 'सेन्सेक्स' १,३७२.०६ अंकांनी (१.८९ टक्के) वधारून ७४,०६८.४५ वर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक 'निफ्टी' ३९९.७५ अंकांनी (१.७८ टक्के) वाढून २२,९१२.४० वर बंद झाला.

### अयोध्येत उपमंदिरांवरही फडकणार धर्मध्वज; तयारी सुरू

**अयोध्या - २४ मार्च**
उत्तरप्रदेशातील अयोध्या येथील राममंदिराच्या पाठोपाठ, आता परिसरातील इतर मंदिरां ध्येही धार्मिक विधींना सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिराच्या मुख्य शिखरावर धर्मध्वज फडकवल्यानंतर, अयोध्येतील सहा उपमंदिरां ध्ये धर्मध्वज फडकवण्याची तयारी सुरू झाली आहे. श्री रामजन्मभू ी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांच्या माहितीनुसार, सूर्य, भगवती, शिवलिंग, गणपती, शेषावतार आणि भगवान हनु ान यांना समर्पित असलेल्या सहा उपमंदिरां ध्ये हा धार्मिक विधी पार पाडला जाईल. हनु ान मंदिरात धर्मध्वज फडकवण्याचा सोहळा हनु ान जयंतीनिमित्त २ एप्रिल रोजी होणार आहे. उर्वरित पाच उपमंदिरां धील विधी २२ ते ३१ मार्च दरम्यान टप्प्याटप्प्याने पार पाडले जातील. या सर्व कार्यक्रमां ध्ये मोठी गर्दी टाळण्याची विशेष काळजी घेतली जाईल. प्रत्येक सोहळ्यात अंदाजे ५० संत आणि २०० लोक उपस्थित राहतील, ज्यात प्रकल्पावर काम करणारे अभियंते आणि काम गार यांचा समावेश असेल.

# आश्रमांतील जीवन सर्वांना प्रकाशमान करते

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन



◆ **वृंदावन, २४ मार्च**
आश्रमे केवळ पोट भरण्याची ठिकाणे नसून, ती खऱ्या ज्ञानाची केंद्रे आहेत. ती व्यक्तीला इतके धैर्य देतात की, जीवनातील संकटांना सामोरे जाण्यास सक्षम करतात. ती देशाच्या शाळेसारखी आहेत. येथे जीवनाचे ज्ञान शिकवले जाते. जे आश्रमात येतात आणि येथील धडे गिरवतात, ते केवळ आपले शरीर निरोगी ठेवत नाहीत, तर भौतिक जीवनाच्या पलीकडेही प्रगती करतात, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

महामंडलेश्वर स्वामी यतींद्रानंद गिरीजी महाराज यांच्या हस्ते वृंदावन येथे नव्याने बांधलेल्या जीवन दीप आश्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सरसंघचालक बोलत होते. ते म्हणाले की, चौथा पुरुषार्थ म्हणजे धर्म असून, त्याची शिकवण आश्रमांमध्ये दिली जाते. आश्रमांमध्ये जीवन एका दीपासारखे बनवले जाते, जो सर्वांना प्रकाश देण्यासाठी स्वतःच जळतो. जीवनाचे दीप अपेक्षा करीत नाहीत. संकटांना तोंड देताना ते आपले काम सोडत नाहीत; ते सर्व परिस्थितीत काम करीत राहतात. हे चारित्र्य घडविण्याचे कार्य आश्रमांमध्ये होते आणि आजही सुरू आहे.

धर्म, वैद्यकशास्त्र आणि प्रथा यानुसार प्रत्येकाला तीन मुले असावीत. भूतविद्या अभ्यासकही सांगतात की, ही संख्या तीनपेक्षा कमी होऊ नये. आज जगभरातील देश जन्मदर वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ही लोकसंख्या ५० वर्षांनंतरही उपयुक्त राहील, हे सर्वांना पटवून देऊन लोकसंख्या धोरण राबवले पाहिजे, असे सांगताना डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, देशातील घुसखोरी रोखण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि घुसखोरांना रोजगार टाळला पाहिजे.

कार्यक्रमाची सुरुवात हनुमान चालीसा पठनाने आणि दिल्लीतील एका शाळेतील मुलांच्या सादरीकरणाने झाली. ◀(वृत्तसंस्था)

### मी लहानपणापासून स्वयंसेवक : अवधेशानंदजी

या कार्यक्रमात जुनागढ आखाड्याचे प्रमुख, आचार्य महामंडलेश्वर अवधेशानंद गिरीजी उपस्थित होते. ते म्हणाले की, आम्ही १२ लाख नागा साधूंना दीक्षा दिली आहे. आमच्या कपाळावर त्रिपुंड आहे, जे आमच्या शैव धर्माचे प्रतीक आहे. आम्ही मनाने शाक्त आहोत. आम्ही वर्तनाने वैष्णव आहोत, म्हणजेच आम्ही सर्व संत आणि ऋषी आहोत. एका व्यक्तीने मला विचारले की, सरसंघचालक आणि स्वयंसेवक यांच्यात काय फरक आहे. मी म्हणालो, दोघांमधील साम्य हे आहे की, दोघेही स्वयंसेवक आहेत. मी आणि यतींद्रानंदजी लहानपणापासूनच स्वयंसेवक आहोत. ■

### आपल्यात अहंकार नसावा : साध्वी ऋतंभरा

या सोहळ्यात साध्वी ऋतंभरा म्हणाल्या की, जगातील कोणतेही कार्य पूर्ण करण्यासाठी शंभर संकल्पांप्रति पूर्ण भक्ती उपयुक्त ठरते. आपल्यामध्ये अहंकार नसावा. हा सोहळा स्वामी पद्मानंद गिरीजी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाला. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली. ■

# धर्मांतरानंतर अनुसूचित जातीचा दर्जा संपुष्टात

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय



◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**
एखाद्या व्यक्तीने ख्रिश्चन धर्म स्वीकारून त्या धर्माचे सक्रियपणे पालन व प्रचार केल्यास, त्याला अनुसूचित जाती समुदायाचा सदस्य मानले जाऊ शकत नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला.

या प्रकरणी आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाने दिलेला आदेश सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तीला अनुसूचित जाती समुदायाचा सदस्य मानले जाऊ शकत नाही. तसेच दुसऱ्या धर्मात धर्मांतर केल्यास अनुसूचित जातीचा दर्जा तत्काळ आणि पूर्णपणे संपुष्टात येतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

संविधान (अनुसूचित जाती) आदेश-१९५०, हे स्पष्ट करतो आणि या आदेशांतर्गत लादलेले प्रतिबंध पूर्णपणे लागू आहे. १९५० च्या आदेशाच्या कलम ३ मध्ये नमूद केलेल्या धर्मांव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर केल्यास जन्माचा विचार न करता अनुसूचित जातीचा दर्जा तत्काळ संपुष्टात येतो, असे न्यायालयाने निर्णयात म्हटले.

कलम ३ अन्वये अनुसूचित जातीचा सदस्य नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला संविधानांतर्गत किंवा संसद वा राज्य विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत कोणताही वैधानिक लाभ, संरक्षण, आरक्षण किंवा हक्क प्रदान केला जाऊ शकत नाही किंवा तो त्यास पात्र ठरवला जाऊ शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

याविरोधात पाद्रीने विशेष परवानगी याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. प्रशांत कुमार मिश्रा आणि न्या. एन. व्ही. अंजारीया यांच्या न्यायासनाने म्हटले की, या प्रकरणात याचिकाकर्त्याने ख्रिस्ती धर्माचा त्याग करून मूळ धर्मात परत आल्याचे म्हटलेले नाही. याउलट त्याने सातत्याने ख्रिस्ती धर्माचे पालन केले आणि तो दशकापेक्षा अधिक काळापासून पाद्री म्हणून सेवा देत आहे. घटनेवेळी घरी प्रार्थनासभा घेत होता, हे त्याने मान्य केले. या सर्व तथ्यांवरून तो ख्रिस्ती असल्याचे स्पष्ट होते.

### अ. जाती/जमाती कायदा ख्रिश्चनांना लागू नाही

**ख्रिश्चन धर्म स्वीकारून पाद्री म्हणून काम करणाऱ्या एका व्यक्तीच्या प्रकरणात हा आदेश पारित करण्यात आला होता. त्याने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी त्याच्यावर हल्ला करणाऱ्या काही जणांवर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्याने या कायद्यांतर्गत संरक्षणाचा दावा केला होता. त्याला आरोपींनी आव्हान दिले.** ■

### ख्रिस्ती धर्मात जातीय व्यवस्था अस्तित्वात नाही

आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाने आदेशात म्हटले होते की, ख्रिस्ती धर्मात जातीय व्यवस्था अस्तित्वात नाही. त्यामुळे या कायद्यातील तरतुदी लागू करता येत नाही. उच्च न्यायालयाचे न्या. हरिनाथ एन. यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या आणि अनुसूचित जाती/जमाती कायद्याचा आधार घेतलेल्या तक्रारदाराचे आरोप फेटाळले होते. ◀(वृत्तसंस्था)

# युद्धामुळे जगासमोर गंभीर ऊर्जा संकट : पंतप्रधान मोदी

### पर्यायी इंधनामुळे परिस्थिती आटोक्यात

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**
युद्धामुळे संपूर्ण जगात गंभीर स्वरूपाचे ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. भारतासाठी ही चिंताजनक स्थिती आहे. हे युद्ध आणखी काही दिवस चालले तर, परिस्थिती आणखी गंभीर होईल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी दिला. मात्र, गेल्या दशकभरात सरकारने पर्यायी इंधनावर मोठ्या प्रमाणात काम केल्यामुळे भारतातील परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावाही त्यांनी केला.

पश्चिम आशियातील युद्धपरिस्थितीबाबत राज्यसभेत निवेदन करताना मोदी म्हणाले की, या युद्धाचा परिणाम आपल्या व्यापारी जलमार्गावर झाला आहे. त्यामुळे पेट्रोल, डिझेल, गॅस आणि खतांचा नियमित होणारा पुरवठा काही प्रमाणात प्रभावित झाला आहे. याच मुद्यावर मोदी यांनी सोमवारी लोकसभेतही निवेदन केले होते.

खाडी देशात एक कोटीवर भारतीय राहतात. काम करतात, त्यांच्या जीवाची आणि रोजगाराची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे, असे स्पष्ट करीत मोदी म्हणाले की, या युद्धात काही भारतीयांना आपले प्राण गमवावे लागले असले, काही जखमी झाले असले तरी आतापर्यंत तीन लाख लोकांना आपण सुखरूप भारतात आणले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत, मुंबईतील बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडियाच्या राजमार्ग इन्फ्रा इन्व्हेस्टमेंट ट्रस्टचा लिस्टिंग सोहळा झाला. यावेळी एनएचएआयचे अध्यक्ष संतोष कुमार यादव उपस्थित होते

### अमेरिकेसोबत चर्चेसाठी खामेनेई यांची मंजुरी

◆ **तेहरान, २४ मार्च**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाच दिवसांसाठी इराणवर हल्ले रोखण्याचे आदेश दिले आणि चर्चेच्या वाटाघाटी सुरू केल्या. अशातच इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई यांनी मंगळवारी अमेरिकेशी चर्चा करण्यास मंजुरी दिली आहे.

सौदी अरबची वृत्तसंस्था अल अरबियाच्या वृत्तानुसार, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांना गुप्तपणे कळवले की, मोज्तबा खामेनेई यांनी अमेरिकेशी चर्चा करण्यास मंजुरी दिली आहे. संभाव्य करार करण्यास देखील त्यांनी सांगितले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात एकाचा मृत्यू, एक गंभीर जखमी

**माढा, दि. २४ मार्च-**
सोलापूर-पुणे राष्ट्रीय महाम ार्गावर मौजे शिराळ पाटीजवळ दोन मोटरसायकलींची सम ोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. मंगळवारी सायंकाळी हा अपघात घडला. यात बंडू बाळू लोकरे (वय-४०, रा. शिराळ टें., ता.माढा, जि.सोलापूर) यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात समोरील मोटरसायकलवरील सचिन सिध्दाराम परीट (वय-२७, रा.केगाव, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) हा गंभीर जखमी झाला असून त्यास उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

# भारताच्या सुरक्षा सज्जतेचा आढावा

### मध्यपूर्वेतील संकटावर संरक्षण मंत्र्यांची बैठक

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**
जागतिक आणि प्रादेशिक सुरक्षा घडामोडीच्या पृष्ठभूमीवर संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी मंगळवारी सैन्यदलाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी मध्यपूर्वेतील संघर्ष, होर्मुझ जलमार्गात अडकलेली भारतीय जहाजांची सुरक्षा आणि सीमेवरील सुरक्षेचा आढावा घेतला.

या बैठकीला सीडीएस जनरल अनिल चौहान, वायुदलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात् डीआरडीओचे अध्यक्ष समीर कामत आणि संरक्षण विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

राजनाथ सिंह यांनी मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पृष्ठभूमीवर भारताच्या सुरक्षा सज्जतेचा आढावा घेतल्याची माहिती संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनातून दिली. बैठकीला तिन्ही सशस्त्र दलाचे प्रमुख व देशाचे सीडीएस उपस्थित होते. बैठकीत देशाच्या सीमेवरील सुरक्षा, होर्मुझ सामुद्रधुनीत अडकलेले टँकर आणि जहाजांच्या सुरक्षासाठी रणनीती आणि संघर्षाच्या परिस्थितीत भारताची भूमिका यावर दीड तासापर्यंत चर्चा झाली. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेले हल्ले केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय आहे, असे त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# देशात पहिला इच्छामृत्यू

## हरीश राणाने एम्समध्ये घेतला अखेरचा श्वास

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**
सर्वोच्च न्यायालयाने इच्छामृत्यूची परवानगी दिलेल्या हरीश राणाचे दिल्लीतील एम्स रुग्णालयात मंगळवारी निधन झाले. इच्छामृत्यूच्या प्रक्रियेसाठी त्याला १४ मार्च रोजी दाखल करण्यात आले होते. त्यानंतर अकराव्या दिवशी अखेरचा श्वास घेतला.

हरीशला १४ मार्चला दाखल केल्यानंतर १६ मार्च रोजी इच्छामृत्यूची प्रक्रिया सुरू झाली. प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात नळीद्वारे अन्न देणे थांबवण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात पाणी देणे थांबवण्यात आले. तेव्हापासून डॉक्टर त्याच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून होते. हरीश राणा १३ वर्षांपासून कोमामध्ये होते. त्यांना एम्सच्या आयआरसीएचच्या (इन्स्टिट्यूट रोटरी कॅन्सर हॉस्पिटल) पॅलिएटिव्ह केअर वॉर्डमध्ये दाखल केले होते. ◀(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### बालाजीच्या वतीने एसटीच्या विभागीय कार्यालयात नेत्र तपासणी शिबीर

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

बालाजी अमाईन्स लि. सोलापूर यांच्या सीएसआर फंडा अंर्तगत, प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, एसटी महामंडळ आणि शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय आयोजित मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रकिया शिबिरात २५७ एसटी कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. तर १८५ चष्मे वाटप करण्यात आले. तपासणीनंतर मोतीबिंदू असलेल्या १३ जणांवर शस्त्रकिया करण्यात येणार आहे. या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर यांनी प्रास्ताविक केले. प्रकल्प प्रमुख मितेश पंचमिया यांनी स्वागत केले. या नंतर बालाजी अमाईन्सच्यावतीने सीएसआर प्रमुख अनिल विपत यांनी बालाजी अमाईन्सच्या विविध सीएसआर उपक्रमांची माहिती दिली. तसेच रोटरीचे नियुक्त प्रांतपाल जयेश पटेल यांनी रोटरीच्या सेवा प्रकल्पांची माहिती दिली. शंकरशेट साबळे नेत्र रुग्णालयाचे सुधीर सुधाळ यांनी सोलापूरातील नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिरात झालेल्या मोतीबिंदू शस्त्रकिया यांची सविस्तर माहिती दिली. यावेळी एसटीचे शितल बिराजदार (यंत्र अभियंता) यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन रोटरी सोलापूरचे पार्थ दावडा यांनी केले. कार्यकम यशस्वी करण्याकरीता बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, सचिन मोरे, बसवराज अंटद, रोटरीचे सचिव निलेश फोफलिया, सदस्य डॉ. राजीव मोहोळकर, शांता येळंबकर, मकरंद बसवंती, संतोष काणेकर, संजय मडूर, बालाप्रसाद मुंदडा, विशाल वर्मा, संगिता गुंडयाल,एस टी विभागाचे कांबळे तसेच शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाचे महेश पवार, सिंधु सुरवसे यांनी परिश्रम घेतले.



### शहीद दिनानिमित्त सांगोल्यात शहिदांना अभिवादन

**सांगोला, दि.२४ मार्च -**

सांगोल्यातील शहीद जवान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने शहीद दिनानिमित्त शहिदांना अभिवादन करण्यात आले. चिंचोली रोड उद्यानात झालेल्या या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते शहीद पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. त्यानंतर मेणबत्ती लावून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व सामूहिक राष्ट्रगीत होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी माजी सैनिक कल्याणकारी संस्था पदाधिकारी उत्तम चौगुले, भाऊ निमग्रे, तानाजी मेटकरी, मेजर माणिक बाबर, जय जवान माजी सैनिक संस्थेचे रवींद्र मराळ, डॉ. कृष्णा इंगोले, संस्थेचे अध्यक्ष अच्युत फुले, सचिव संतोष महिमकर, महादेव दिवटे, देवा मासाळ आदी उपस्थित होते.

### मनोरमा बँक परिवाराच्या वतीने उद्या रामनवमीनिमित्त गीतरामायण

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

येथील मनोरमा को-ऑपरेटिव बँक आणि मनोरमा मल्टीस्टेट यांच्या वतीने गुरुवार २६ मार्च रोजी सायंकाळी ६:१५ ते रात्री दहा वाजेपर्यंत गंधार प्रतिष्ठान प्रस्तुत ग. दि. माडगूळकर लिखित गीत रामायण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हुतात्मा स्मृती मंदिर येथे अतुल बेले आणि सहकलाकार हा कार्यक्रम सादर करतील. कार्यक्रम खुला असून प्रवेशिका कार्यक्रम स्थळीच मिळतील. याचा लाभ घेण्याचे आवाहन चेअरमन श्रीकांत मोरे, व्हा. चेअरमन संतोष सुरवसे, मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, बँकेच्या कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड आणि संचालक मंडळाने केले आहे.

## निधन वृत्त...

### दत्तात्रय बोधले



**सोलापूर, दि.२४ मार्च-**

वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयातील निवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक दत्तात्रय शहाजीराव बोधले ( वय ६४) यांचे सोमवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. बार्शी तालुक्यातील कारी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### तुकाराम मस्के



**सोलापूर, दि.२४ मार्च-**

सोलापूर महानगरपालिका परिवहन समितीचे माजी सभापती ज्येष्ठ शिवसैनिक व शिवसेना उपजिल्हाप्रमुख तुकाराम (नाना) मस्के यांचे मंगळवावीर कर्करोगाने निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### मीनाक्षी साठे



**सोलापूर, दि.२४ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील मराठा समाजाचे अध्यक्ष सूर्यकांत साठे यांच्या धर्मपत्नी मीनाक्षी सूर्यकांत साठे ( वय ६२) यांचे अल्पशा आजाराने सोमवार, दि.२३ मार्च रोजी रात्री १० वाजता निधन झाले. मंगळवारी सकाळी हिंदू स्मशानभूमी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सात विवाहित मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# भगवंत प्रकटदिनानिमित्त बार्शीत सांस्कृतिक सोहळ्याची मेजवानी

- २० ते २८ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रम
- बार्शीकरांनी श्री भगवंत महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा : माजी आमदार राजेंद्र राऊत






**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २४ मार्च-**

बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत यांच्या प्रकटदिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री भगवंत महोत्सव २०२६ चे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. बार्शी नगरपरिषद, श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट, कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी पंचायत समिती आणि श्री भगवंत बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव साजरा केला जाणार आहे.

मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी श्री भगवंत प्रकटदिन साजरा होत असून, त्याआधी दि. २० एप्रिल ते २७ एप्रिल या कालावधीत बार्शीकरांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये लोककलांचे सादरीकरण, मराठी नाटके, कीर्तन, भावगीत, भक्तीगीत तसेच मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील सुरेल गाण्यांच्या मैफिलींचा समावेश आहे.

या महोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेचे प्रकाशन माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, श्री भगवंत देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दादासाहेब बुडूख, डॉ. बी. वाय. यादव, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, बाजार समिती सभापती विजय गरड, उपसभापती संतोष निंबाळकर, माजी नगराध्यक्ष असिफभाई तांबोळी, महोत्सव समिती अध्यक्ष सुभाष लोढा, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, विजय राऊत, ॲड. रणवीर राऊत, संतोष सूर्यवंशी, मुन्ना सोनीग्रा, श्रीधर कांबळे, शंकर वाघमारे, ड. राजश्री डमरे-तलवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

**सांस्कृतिक कार्यक्रमांची रूपरेषा**

महोत्सवाची सुरुवात दि. २० व २१ एप्रिल रोजी राज्यस्तरीय 'सोंगी भारुड' स्पर्धेने होणार आहे. दि. २१ एप्रिल रोजी सायंकाळी ६-३० वाजता लोकप्रिय 'होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २२ एप्रिल रोजी 'द फोक आख्यान' या संगीतप्रधान सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे लोककलेचा अनोखा आविष्कार सादर होणार आहे.

दि. २३ एप्रिल रोजी गाजलेले मराठी नाटक 'ऑल दि बेस्ट' रंगभूमीवर सादर होणार आहे.

दि. २४ एप्रिल रोजी कीर्तनकार ह. भ. प. शिवलीला पाटील यांचे कीर्तन तसेच त्यानंतर सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांची भावगीत व भक्तीगीतांची मैफल होणार आहे.

दि. २५ एप्रिल रोजी गायक सुदेश भोसले व पार्श्वगायिका बेला सुलाखे यांच्या आवाजात हिंदी-मराठी चित्रपट गीतांचा 'सुरीला सिलसिला' कार्यक्रम रंगणार आहे.

दि. २६ एप्रिल रोजी बार्शीतील स्थानिक कलावंतांचा 'संगीतमय रंगारंग' कार्यक्रम तर दि. २७ एप्रिल रोजी ऐतिहासिक मराठी नाट्यप्रयोग 'शिवायन' सादर करण्यात येणार आहे. मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी प्रकटदिनाच्या दिवशी श्री भगवंत मंदिरात पहाटे ४-३० वाजता ह. भ. प. जयंत बोधले महाराज यांचे कीर्तन होईल. सकाळी ८ वाजता श्री भगवंत उत्सव मूर्तीची शहरातून भव्य मिरवणूक, दिंडी व शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दुपारी १२ ते ३ या वेळेत मॉर्निंग सोशल फाउंडेशनच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजता शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँकेच्यावतीने आकर्षक शोभेच्या दारुची आतिषबाजी करण्यात येणार आहे.

सदरचे सर्व कार्यक्रम श्री भगवंत मैदान येथे पार पडणार असून महिलांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे. माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शी शहर व तालुक्यातील सर्व नागरिकांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमांची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

## नाटक प्रत्यक्ष आयुष्याशी जोडते : संजय हळदीकर



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि.२४ मार्च -**

आजच्या डिजिटल युगात मुलं मोबाईलमध्ये रमून जात आहेत पण नाटकासारखी कला त्यांना प्रत्यक्ष आयुष्याशी जोडते. संवाद कौशल्य, शरीर भाषा आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी नाटक अत्यंत उपयुक्त आहे असे मत कोल्हापूरचे प्रसिद्ध दिग्दर्शक संजय हळदीकर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई शाखा अकलूज शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज व ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲण्ड टेक्नॉलॉजी, अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने नाटकांची परंपरा नव्या पिढीला माहिती होण्यासाठी जिथे शाळा, कॉलेज तिथे रंगमंच हा एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ जिल्हा परिषद किल्ला शाळा अकलूज येथे करण्यात आला. या शुभारंभाप्रसंगी संजय हळदीकरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी अमीत पुंज, लाला मुजावर, नितीन बनकर, नागन्नाथ साळवे, केदार लोहकरे, सयाजी मगर, मोतीराम वाघमोडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. शुभारंभा दिवशी जि.प.शाळा शंकरनगर, शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल शंकरनगर या ठिकाणीही शुभारंभाचा प्रयोग करण्यात आला.

हळदीकर म्हणाले, नाटक ही केवळ मनोरंजनाची गोष्ट नाही तर ती जीवन समजून घेण्याची एक प्रभावी कला आहे. 'जिथे शाळा, कॉलेज तिथे रंगमंच' हा उपक्रम मुलांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि अभिव्यक्तीची ताकद वाढवणारा आहे. लहान वयातच मुलांनी नाटकाच्या माध्यमातून विचार मांडायला शिकले, तर ते भविष्यात अधिक संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनतील. प्रत्येक भूमिकेला महत्त्व असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने या कलेचा अनुभव घ्यावा. भीती बाजूला ठेवून रंगमंचावर या स्वतःला व्यक्त करा आणि या सुंदर कलेचा आनंद घ्या. शिक्षकांनीही अशा उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे, कारण यातूनच उद्याचे उत्तम कलाकार आणि जागरूक नागरिक घडतील. कार्यक्रमासाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, शितलदेवी मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी आयोजनासाठी अभिनेते अजय तपकिरे, सुनील कांबळे, डॉ.विश्वनाथ आवड, अमित पुंज, औदुंबर भिसे हे परिश्रम घेत आहेत.



## टेंभुर्णीतील मारुती यात्रा कमिटी अध्यक्षपदी सोमनाथ देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २४ मार्च-**

ग्रामदैवत श्री मारुती देवाच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर टेंभुर्णीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून यात्रेच्या नियोजनासाठी झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत २०२६ सालच्या श्री मारुती देवस्थान यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी सोमनाथ धनाजी देशमुख तर उपाध्यक्षपदी सुरज देशमुख यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे - उपाध्यक्ष योतीराम पाटील, ऋतुराज देशमुख, खजिनदार अविनाश देशमुख, सचिव सुरेश देशमुख, मिरवणूक व उत्सव व्यवस्थापन कमिटी मिरवणूक प्रमुख रणजीत आटकळे, उपप्रमुख ऋतुराज संतोष देशमुख यांची निवड करण्यात आली.

कल्याणराव पाटील यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीस श्री मारुती देवस्थान ट्रस्टचे चेअरमन डी. के. देशमुख, कल्याणराव पाटील, औदुंबरभाऊ देशमुख, किसन देशमुख, सुधीर पाटील, गोरख देशमुख, सिद्धेश्वर देशमुख, विजय देशमुख, राहुल देशमुख व किशोर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.



## बार्शीत वधू-वर परिचय मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ मार्च-**

मातोश्री रमाई वधू-वर परिचय मेळावा प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने श्रावस्ती बुद्ध विहार बार्शी येथे वधू-वरांचा परिचय मेळाव्यात २५० बायोडाटा नावनोंदणी केली होती. परंतु प्रत्यक्षात ६५ मुला-मुलींनी सहभाग घेऊन नव वधू-वरांचा शोध परिचयाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाची सुरुवात गौतम बुद्ध, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई व कांशीराम यांच्या प्रतिमांचे पूजन भन्ते सुमेधजी नागसेन, भन्ते विमल किर्ते बिहार व प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य अध्यक्ष विष्णू कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. मातोश्री रमाई महिला मंडळाच्या उपाध्यक्षा विश्रांता काळेगावकर, खजिनदार वैशाली कांबळे, अर्चना कसबे, सदस्या रंजना बोकेफोडे यांनी त्रिशरण व पंचशील घेण्यासाठी भंतेजींना याचना केल्यानंतर त्रिशरण पंचशील म्हणण्यात आले. प्रास्ताविक प्रा. डॉ. टी.एस.मोरे यांनी केले. भन्ते सुमेधजी नागसेन व भन्ते विमल किर्ते यांच्या धम्मदेसने नंतर प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य प्रा. एस. एस.शिंदे यांनी त्यांच्या मातोश्री कलावती शिंदे यांच्या स्मरणार्थ श्रावस्ती बुद्ध विहारास अहुजा कंपनीचा दर्जेदार असा स्पीकर संच भेट देण्यात आला.

दुसऱ्या सत्रात उपस्थित नियोजित वधू-वरांनी आपला स्वतःचा परिचय करुन दिला. आभार अध्यक्ष विष्णू कांबळे यांनी मानले. यावेळी माजी मुख्याध्यापक प्रकाश पालखे यांनी ११ हजार, माजी केंद्रप्रमुख श्रीहरी गायकवाड यांनी रु. १ हजार व भोईंजे गावच्या सरपंच यांनी रु. ५०० रुपये ट्रस्टला देवून पुण्यकर्म केले. वधू-वर परिचय मेळाव्याच्या नियोजनासाठी ट्रस्टचे सहसचिव प्रा.अशोक वाघमारे, खजिनदार प्रा. शशिकांत गायकवाड, मार्गदर्शक प्रा टी. एस. मोरे, सदस्य मधुकर पालखे, सुनील कांबळे, नागनाथ सोनवणे, सुदर्शन ओहोळ, विक्रम सुरवसे, सुरज गायकवाड, अविनाश काळेगावकर, पांडुरंग शिंदे, चंद्रमणी डोकेफोडे, दत्ता शिंदे, राम कसबे, जगदीश भालेराव, बाबासाहेब वाघमारे, भोसले, प्रा. जयद्रथ गायकवाड, संजय लंकेश्वर, बाळासाहेब कदम आदींनी परिचय मेळाव्यासाठी सहकार्य केले.

## नगरपरिषद आणि मंदिर समितीमधील कराराची पूर्तता करा

**नगरसेवक सौरभ थिटे-पाटील यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च-**

पंढरपूर नगरपरिषद व श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती यांच्यामध्ये संत तुकाराम भवन बांधताना झालेल्या कराराबाबतची त्वरीत पूर्तता करण्यात यावी या मागणीचे निवेदन येथील पंढरपूर नगरपरिषदेचे नगरसेवक सौरभ थिटे-पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना मंगळवारी दिले. दरम्यान या निवेदनावर त्वरीत माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल असे आश्वासन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्याची माहिती नगरसेवक थिटे-पाटील यांनी दिली.

या निवेदना संदर्भात माहिती देताना नगरसेवक थिटे-पाटील यांनी सांगितले की, संत तुकाराम भवनच्या जागेवर पंढरपूर शहर विकास आराखड्यात पूर्वी वेगळे आरक्षण होते. सदरहू संत तुकाराम भवनची जागा मंदिरे समितीला देण्यात आली त्यावेळेस श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती व पंढरपूर नगरपरिषद यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. त्या करारातील अटींचा भंग श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीने केला आहे. त्या काळातील काही बाबींची तात्काळ पूर्तता करण्यात आली. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर मंडपाच्या खालील काही दुकान आहे मंदिरे समितीने पंढरपूर



नगर परिषदेकडे हस्तांतरित केले. ते सर्व गाळे पंढरपूर नगरपरिषदेने १९८२ मध्ये जे विस्थापित झाले होते त्यांना देण्यात आले. त्याचे डिपॉझिट व भाडे पंढरपूर नगरपरिषदेला आज सुद्धा मिळत आहे.

दरम्यान वापर परवाना देताना त्याबाबत नगर परिषदेने योग्य लक्ष दिले नाही. नगर परिषदेने योग्य लक्ष दिले असते तर अंदाजे ४० ते ५० दुकान गाळे १९८२ च्या विस्थापितांना मिळाले असते. आता नगर परिषदेने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीकडून सर्व दुकान गाळे हे दिलेल्या बांधकाम परवान्या प्रमाणे तयार करून घ्यावेत आणि ते दुकान गाळे १९८२ च्या विस्थापितांना, दुकानदारांना आणि तुकाराम भवन जागेतील बाधितांना अग्रक्रमाने द्यावेत असे देखील निवेदना मध्ये नमूद केल्याचे नगरसेवक थिटे पाटील यांनी सांगितले.

## माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी अभिनव उपक्रमांची अंमलबजावणी : मुख्यमंत्री



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई. दि. २४ मार्च-**

महाराष्ट्रात माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी विविध अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर, नवी मुंबई येथील सिडकोच्या जागेवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र उभे राहिले आहे. या केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री सत्य साई संजीवनी केंद्रामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत टू-डी-इको शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांद्वारे विविध जिल्हा रुग्णालयांमध्ये हृदयरोग तज्ञांकडून एकूण २,५०७ टू-डी-इको तपासण्या करण्यात आल्या. तसेच जन्मजात हृदयरोग (सीएचडी) उपचारासाठी राज्यभरातील आरबीएसके पथकांमार्फत ३२२६ बालकांवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र येथे उपचार करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार श्री सत्य साई संजीवनी केंद्रांनी पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि सातारा जिल्ह्यातील जावळी या आदिवासी बहुल तालुक्यांना दत्तक घेऊन तेथे विशेष आरोग्य उपक्रम राबविले. तसेच पुण्यातील शहरी झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात आल्या. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आरोग्य सेवा पोहचविण्यात येत आहेत.

विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये बालकांमधील जन्मजात हृदयरोग तपासणीसाठी मेगा शिबिरे सुरू असून, दुर्गम भागातील बालकांनाही अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होत आहेत.

नवी मुंबई येथे बांधकाम कामगार तसेच वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी विशेष आरोग्य प्रकल्प राबविण्यात येत आहेत. तसेच अंगणवाडी सेविकांसाठी नॉन-कम्युनिकेबल डिसीज (एनसीडी) आणि कर्करोग तपासणी प्रकल्पही सुरू करण्यात आला आहे. याशिवाय, आजपर्यंत आशा, अंगणवाडी सेविका, सहाय्यक परिचारिका आणि वैद्यकीय अधिकारी अशा ३५०० हून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांना क्षमता विकास प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे सर्व उपक्रम राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अजित पवार विमान अपघात प्रकरणी कर्नाटकात गुन्हा दाखल

### रोहित पवारांच्या लढ्याला यश

◆ **बंगळुरू, २४ मार्च**

अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी अखेर कर्नाटकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार याच्या लढ्याला यश मिळाले आहे.

बारामती विमानतळाजवळ झालेल्या लियरजेट ४५ विमान अपघातप्रकरणी कर्नाटकमध्ये बंगळुरू येथील शेशाद्रीपुरम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमागे मोठा गुन्हेगारी कट असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे मंगळवारीच रोहित पवार यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला होता. नागपुरात बस स्टॉपवरुन चार्जर चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल होतो, चप्पल चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल होतो. अंगणात झाडाच्या फांद्या आल्या म्हणून गुन्हा दाखल होतो. मात्र, अजित दादांच्या संदर्भात गुन्हा दाखल झाला नाही. ज्याचे जळते त्यालाच कळते, अशा शब्दांत रोहित पवार यांनी टीका केली.

#### हा अपघात नसून घातपात

मुंबईहून बारामतीकडे येणारे व्हीटी-एसएसके नोंदणी असलेले बॉम्बार्डियर लियरजेट ४५ विमान २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.४३ ते ८.४५ वाजण्याच्या सुमारास कोसळले होते. हे विमान व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीद्वारे चालवले जात होते. या घटनेत विमानातील सर्व पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाही समावेश होता. रोहित पवार यांच्या तक्रारीनुसार, ही घटना केवळ अपघात नसून उपमुख्यमंत्र्यांना लक्ष्य करणाऱ्या मोठ्या गुन्हेगारी कटाचा भाग असू शकतो. ■

**काय आहे तक्रारीत?**

तक्रारीत विमान सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन, नोंदींची बनावट कागदपत्रे तयार करणे, देखभाल आणि ऑपरेशनमध्ये गंभीर निष्काळजीपणा, अशा अनेक बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, २४ फेब्रुवारीला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने सादर केलेल्या सुरक्षा लेखापरीक्षण अहवालात व्हीएसआर कंपनीची काही विमाने निष्काळजीपणामुळे उड्डाणासाठी अयोग्य असल्याचे नमूद करण्यात आले असून, ती विमाने ग्राउंड करण्यात आल्याचेही सांगितले आहे. अपघातग्रस्त व्हीटी-एसएसके विमानाने सुमारे ४९१५ उड्डाण तास पूर्ण केले होते. ते पाच हजार तासांच्या अनिवार्य इंजिन 'टाइम बिफोर ओव्हरहॉल' मर्यादेच्या अत्यंत जवळ होते. तरीही कंपनीने व्यावसायिक वापरासाठी विमान चालू ठेवले होते. यामुळे प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला, असे तक्रारीत म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

#### अपघातानंतर विमान कंपनीला ८० कोटींची देयके

अजित पवार यांच्या निधनानंतर, संबंधित विमान कंपनीला राज्य सरकारने तब्बल ८० कोटी रुपयांचे बिल अदा केल्याचा खळबळजनक दावा विधानसभेत केला आहे. अपघातग्रस्त विमानाची मूळ किंमत केवळ १६ कोटी असताना एवढी मोठी रक्कम का दिली, असा सवाल रोहित पवार यांनी विधानसभेत उपस्थित केला. ■

## इराणविरुद्ध कारवाईसाठी हेगसेथचा पुढाकार : ट्रम्प

**वॉशिंग्टन** : इराणविरोधात कारवाई करण्यासाठी संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनीच पुढाकार घेतला, इराणला अण्वस्त्रापासून दूर ठेवण्यासाठी कारवाई करणे गरजेचे असल्याचे हेगसेथ यांनी पटवून दिले, त्यानंतर मी हल्ल्याचे आदेश दिला, अशी माहिती राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी दिली.



इराणच्या वाढत्या दबावाने माघार घेण्याची नामुष्की आल्याने ट्रम्प यांनी युद्धाची जबाबदारी संरक्षण सचिवावर ढकलली. अमेरिकेच्या संरक्षण विभागाची ट्रम्प यांनी बैठक घेतली. त्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले, इराणविरुद्ध लष्करी कारवाईचा सल्ला देणारे हेगसेथ हे पहिले व्यक्ती होते. शेजारी बसलेल्या हेगसेथ यांच्याकडे बोट दाखवत ट्रम्प म्हणाले, 'पीट, मला वाटते की तुम्हीच पहिले होता ज्यांनी पुढे येऊन म्हटले, चला इराणवर कारवाई करूया, त्यांना अण्वस्त्रापासून दूर ठेवण्यासाठी हल्ला करणे गरजेचे आहे, असे तुम्हीच मला पटवून दिले'. हेगसेथ यांच्या शिफारशीमुळे २८ फेब्रुवारी रोजी मी इराणवर हल्ल्याचे आदेश दिला. या मोहिमेला मंजुरी देण्यापूर्वी जनरल केन आणि इतर अनेक महत्त्वाच्या लोकांना फोन केला होता. मध्यपूर्वेत तातडीने कारवाई करण्याचा विचार नव्हता, थोडा काळ थांबून वाटाघाटीने समस्या सोडविण्याच्या बाजूने मी होतो.

# 'एमपीआयडी' कायद्यात सुधारणा होणार

## सहा महिन्यांत प्रकरणांचा निकाल लावणे बंधनकारक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत घोषणा • दोनपेक्षा अधिक वेळा तारखा घेता येणार नाहीत

◆ **मुंबई, २४ मार्च**

आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांमधील गुन्हेगारांवर कठोर वचक बसवण्यासाठी आणि गुंतवणूकदारांचे अडकलेले पैसे जलदगतीने परत मिळवून देण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण (एमपीआयडी) कायद्यात महत्त्वपूर्ण बदल करणार आहे. या नवीन दुरुस्तीनुसार, एमपीआयडी प्रकरणांचा निकाल सहा महिन्यांच्या आत लावणे आता बंधनकारक असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

विधानसभेत सदस्य हेमंत ओगले यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते.




सध्याची एमपीआयडीअंतर्गत असलेली कायदेशीर प्रक्रिया अत्यंत वेळखाऊ असल्याचे मान्य करत मुख्यमंत्री म्हणाले की, जप्त केलेल्या मालमत्तांची विक्री करून ठेवीदारांचे पैसे परत देण्यास विलंब होतो. हा विलंब टाळण्यासाठी कायद्यात दुरुस्ती केली जाणार आहे. यापुढे कोणत्याही परिस्थितीत संबंधित प्रकरणांमध्ये दोनपेक्षा जास्त वेळा तारखा (मुदतवाढ) घेता येणार नाहीत.

**खाजगी सल्लागारांची मदत घेणार**

अनेक प्रकरणांमध्ये जप्त मालमत्तांचे मूल्यांकन प्रलंबित असल्याने लिलाव प्रक्रियेत अडथळे येतात. यावर उपाय म्हणून आता सरकारी यंत्रणेसोबतच खाजगी सल्लागारांची मदत घेण्याचा विचार शासन करत आहे. यामुळे मालमत्तांचे मूल्यांकन तातडीने होऊन त्या लिलावात काढता येतील आणि सर्वसामान्यांचे पैसे परत मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

**फरारी आरोपींविरोधात रेड कॉर्नर नोटीस**

याच विषयावर माहिती देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील सिस पे, ग्रो मोअर, ग्रो इन्व्हेस्टर या कंपन्यांविरोधात गुन्हे दाखल असून तपास सुरू आहे.परदेशात पळून गेलेल्या आरोपींविरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# लष्करी विमान कोसळून ११० सैनिकांचा मृत्यू

### •कोलंबियाच्या पुटुमायो प्रांतातील घटना • मदत-बचाव कार्य सुरू

**बोगोटा, २४ मार्च**

दक्षिण अमेरिकेतील कोलंबियाच्या ॲमझॉनमधील पुटुमायो प्रांतात लष्करी विमानाचा अपघात झाला. यात ११० जवानांचा मृत्यू झाला, तर काही जखमी आहेत. हर्क्युलस सी-१३० विमानात ११० सैनिक आणि ११ कर्मचाऱ्यांसह एकूण १२१ लोक प्रवास करीत होते. सोमवारी रात्री कोलंबियातील पुटुमायो येथील प्युएर्तो लेगुइझामो येथून विमानाने उड्डाण केले. परंतु काही वेळातच ते कोसळले, अशी माहिती वायुदलाने दिली.

कोलंबियाच्या लष्कराचे प्रमुख जनरल ह्युगो अलेहांद्रो लोपेझ बॅरेटो यांनी सांगितले की, या भीषण अपघातात आतापर्यंत ११० जवानांचे मृतदेह आढळून आले, तर १५ जखमींना रुग्णालयात हलविले. अजूनही मदत-बचावकार्य सुरू आहे. प्राथमिक तपासात विमानातील



इंजिनात तांत्रिक बिघाड झाल्याने अपघात झाल्याचे समोर आले. याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याचा निर्देश देण्यात आला. अपघाताचा घातपाताशी संबंध आहे का, याचाही तपास केला जाईल. कोलंबियातील प्युएर्तो लेगुइझामोच्या महापौरांनी अपघाताची माहिती देताना सांगितले की, शहरापासून जवळपास शंभर किमी अंतरावर हा अपघात झाला. डोंगराळ भागालगत विमान अचानक जमिनीवर कोसळले. स्थानिकांनी घटनेची माहिती दिल्यानंतर बचाव पथक अपघातग्रस्त भागाकडे रवाना करण्यात आले. जमिनीवर कोसळल्यानंतर विमानाचा स्फोट झाला, यात लष्कराचे जवान होरपळले.

बहुतांश मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही, त्यामुळे त्यांची डीएनए चाचणी करावी लागेल. दहशतवादी किंवा बेकायदेशीर सशस्त्र गटाने विमानावर हल्ला केल्याचे अद्याप कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे संरक्षण मंत्री पेद्रो सांचेझ यांनी सांगितले.

# गंगेच्या खोऱ्यात १३०० वर्षांतील भीषण दुष्काळ

### • तीव्रतेत ७६ टक्क्यांनी वाढ • मानवी कृतींचा परिणाम



◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**

भारतातील दुष्काळाची समस्या खूप गंभीर झाली आहे. २००९ पासून गंगा खोऱ्यातील काही भाग दुष्काळाचे प्रमुख केंद्र ठरले आहेत. ॲरिझोना विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या मते, हा दुष्काळ केवळ नैसर्गिक नसून, मानवी कृतींचा परिणाम आहे.

सप्टेंबर २०२५ मधील एका अभ्यासानुसार, १९९१ ते २०२० या काळात गंगा नदीच्या खोऱ्यात मागील १३०० वर्षांतील सर्वांत तीव्र दुष्काळ पडला होता. हा दुष्काळ १६ व्या शतकातील दुष्काळांपेक्षा ७६ टक्क्यांनी अधिक तीव्र होता, असे वृक्षांच्या खोडांवरील वलयांवरून दिसून आले. डिसेंबर २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आणखी एका अभ्यासानुसार, १९७१ ते २०२० या काळात पश्चिम आणि मध्यभारत, हिमालय, गंगा खोऱ्यातील मैदानी प्रदेश, द्वीपकल्पीय भारत आणि ईशान्य भारत या सहा प्रमुख प्रदेशांमध्ये दुष्काळ वाढला आहे. 'स्टँडर्डाइज्ड प्रेसिपिटेशन इव्हॅपोट्रान्सपिरेशन इंडेक्स'सारख्या साध्या हवामान निर्देशकांचा वापर यासाठी करण्यात आला. याचे परिणाम धक्कादायक आहेत.

गंगा खोऱ्यातील मैदानी प्रदेश, हिमालय आणि ईशान्य भारतात दुष्काळ झपाट्याने वाढत आहेत. कमी पाऊस आणि वाढत्या तापमानामुळे ही समस्या अधिकच गंभीर झाली आहे. मान्सूनचा पाऊस कमी होत असून, उन्हाळ्यातील बाष्पीभवन वाढले आहे. दिवस आणि रात्र दोन्ही वेळी तापमान वाढत आहे. भूजलसाठ्याचा अतिवापर आणि जास्त पाणी लागणाऱ्या पिकांच्या लागवडीमुळे पाण्याची टंचाई अधिकच गंभीर होत आहे. ईशान्य भारतात पूर्वी मुबलक पाऊस पडायचा, पण आता कमकुवत मान्सून आणि उष्णतेमुळे तिथेही पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. ◀(वृत्तसंस्था)

#### 'जल दिवाळखोरी'त वाढ

**दुष्काळ ही आता केवळ पाण्याची समस्या न राहता, याला जल दिवाळखोरी म्हटले जाते. संयुक्त राष्ट्र विद्यापीठाच्या एका अहवालानुसार, पाणी हा एक राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा झाला आहे. जर त्याचे योग्य व्यवस्थापन केले नाही, तर देशांमध्ये पाण्यावरून संघर्ष निर्माण होऊ शकतो. पृथ्वीवर मानव आणि इतर जीवसृष्टी अस्तित्वात असेपर्यंत पाण्याची टंचाई कायम राहील, असा इशारा अहवालातून देण्यात आला.** ■

# २०२९ च्या लोकसभा निवडणुका ३३ टक्के महिला आरक्षणासह

- **मोदी सरकार संसदेत घटना दुरुस्ती विधेयक आणणार**
- **लोकसभा, विधानसभांतील सदस्य संख्या ५० टक्क्यांनी वाढणार**

**नवी दिल्ली, २४ मार्च**

२०२९ ची लोकसभा निवडणूक ३३ टक्के महिला आरक्षणासह घेण्याच्या दृष्टीने सरकारी पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. यासाठी सरकार चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनातच घटनादुरुस्ती विधेयक आणणार असल्याचे समजते.

२०२३ मध्ये सरकारने महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे नारी शक्ती वंदन विधेयक संसदेत पारित केले होते. मात्र २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू झाले नव्हते. सामान्यपणे जनगणना आणि मतदारसंघाची फेररचना झाल्यानंतरच महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू होऊ शकते. पण जनगणना आणि मतदारसंघांची फेररचना या दोन्ही गोष्टींना भरपूर वेळ लागणार असल्यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीतही महिला आरक्षण लागू होणे शक्य दिसत नव्हते. त्यामुळे सरकारने घटनादुरुस्ती विधेयक पारित करून मतदारसंघांची फेररचना करण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. घटनादुरुस्ती विधेयक पारित झाल्यानंतर ३३ टक्के महिला आरक्षण लोकसभा तसेच राज्य विधानसभेत लागू होणार आहे. लोकसभा तसेच राज्य विधानसभेच्या सदस्य संख्येत आधी ५० टक्के वाढ करण्यात येणार आहे, त्यानंतर ३३ टक्के महिला आरक्षणाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

महिला आरक्षण लागू करण्या संदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक संसदेत पारित करण्याच्या दृष्टीने सरकार कामाला लागले असून गृहमंत्री शाह यांनी राष्ट्रवादी शरद गट तसेच शिवसेना उबाठा गटाच्या नेत्यांशी चर्चा केल्याचे समजते.

## आता एका महिन्यात बुक करता येणार दोन सिलेंडर

**नवी दिल्ली** : देशातील एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकारने एका महिन्यात दोनच सिलेंडर बुक करता येणार असल्याचा नियम लागू केला आहे. या नव्या नियमांचा थेट परिणाम घरगुती गॅस वापरणाऱ्या ग्राहकांवर होणार आहे.



भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने जाहीर केलेल्या नव्या नियमानुसार, आता एका ग्राहकाला महिन्यात जास्तीत जास्त दोनच एलपीजी सिलेंडर बुक करता येणार आहेत. यापेक्षा जास्त सिलेंडर बुक करण्याचा प्रयत्न केल्यास सिस्टमकडून बुकिंग ब्लॉक केली जाऊ शकते किंवा अतिरिक्त तपासणी केली जाऊ शकते. सरकारकडून आर्थिक वर्षात १२ अनुदानित सिलेंडर दिले जातात.

# भोंदूबाबा खरातने दिले पाच नरबळी

### पोलिसांचा न्यायालयात संशय | पाच दिवसांची पोलिस कोठडी

◆ **नाशिक, २४ मार्च**

भोंदूबाबा अशोक खरातने पाच नरबळी दिल्याचा धक्कादायक संशय पोलिसांनी मंगळवारी नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयात पोलिस कोठडीची मागणी करताना केला. न्यायालयाने त्याला पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

न्यायालय परिसरात उपस्थित संतप्त नागरिकांनी खरातच्या वाहनावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

अशोक खरातला न्यायालयाने सुनावलेली २४ मार्चपर्यंतची पोलिस कोठडीची मुदत मंगळवारी संपली. त्यामुळे पोलिसांनी आज त्याला पुन्हा न्यायालयात हजर केले होते.

**१५०० कोटींची मालमत्ता, १०० व्हिडीओ उघडकीस**

स्वयंघोषित बाबा आणि बलात्काराचा आरोप असलेल्या अशोक खरातविरुद्धच्या प्रकरणांचा तपास करणाऱ्या एसआयटीने १,५०० कोटी रुपयांची मालमत्ता आणि १०० आक्षेपार्ह व्हिडीओ उघडकीस आणले आहेत, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने मंगळवारी दिली. ◀(वृत्तसंस्था)

# कायमस्वरूपी नियुक्ती न मिळालेल्या महिला अधिकाऱ्यांनाही पेन्शन

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**

लष्करातील कायमस्वरूपी नियुक्ती न मिळालेल्या महिला अधिकाऱ्यांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे शॉर्ट सर्व्हिस कमिशनवर सेवा करणाऱ्या अनेक महिला अधिकाऱ्यांना न्याय मिळणार आहे.



कायमस्वरूपी नियुक्ती देताना निवड प्रक्रियेत काही प्रमाणात पक्षपात झाला होता. यामुळे २०१९, २०२० आणि २०२१ या वर्षांत निवड मंडळासमोर आलेल्या महिला अधिकाऱ्यांच्या बाबतीत योग्य पद्धतीने विचार केला गेला नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या कालावधीत ज्यांची नावे निवड मंडळापुढे सादर झाली होती, त्या सर्व महिला अधिकाऱ्यांची सेवा २० वर्षे पूर्ण झालेली मानून त्यांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्यात यावा, असा आदेश न्यायालयाने दिला. यासोबतच पूर्वी निवड झालेल्या महिला अधिकाऱ्यांची निवडही कायम ठेवण्यात आली आहे. न्यायालयाने भविष्यातील निवड प्रक्रियेबाबतही महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत दरवर्षी केवळ ठराविक संख्येतील महिला अधिकाऱ्यांनाच कायमस्वरूपी नियुक्ती देण्याची मर्यादा योग्य नसल्याचे सांगत, ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित असावी, असे स्पष्ट केले. सशस्त्र दलांमध्ये कायमस्वरूपी नियुक्ती मिळाल्यास अधिकाऱ्याला निवृत्तीपर्यंत सेवा करण्याची संधी मिळते. मात्र, महिला अधिकाऱ्यांना केवळ अल्पकालीन सेवेत ठेवले जात असल्याने त्यांना निवृत्तीवेतन आणि इतर लाभांपासून वंचित राहावे लागत होते.

या पृष्ठभूमीवर काही महिला अधिकाऱ्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे महिला अधिकाऱ्यांना समान संधी आणि हक्क मिळण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले गेले आहे, असे मानले जात आहे. ◀(वृत्तसंस्था)

# आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी भावनांना मोकळी करुन दिली वाट

### • विधिमंडळ सभागृहात निरोप

**मुंबई, दि. २४ मार्च-**

विधान परिषदेतील आमदार म्हणून माझ्या दुसऱ्या कार्यकाळाचा आज शेवटचा दिवस. यानिमित्ताने सभागृहात झालेल्या निरोप समारंभात मनातील भावना व्यक्त करण्याची संधी मिळाली. विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विधानपरिषदेत मला दुसऱ्यांदा प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळाला; हे माझे मोठे भाग्य आहे, अशा शब्दात आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली.



२००३ साली प्रथम संधी, त्यानंतर राज्यसभेतील कार्यकाळ आणि २०२० पासून विधान परिषदेत आमदार म्हणून काम करताना अनेक अनुभव, शिकण्याच्या संधी आणि लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करता आला. आजवरच्या प्रवासात साथ देणाऱ्या आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जी, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा वहिनी पवार यांचे मनःपूर्वक आभार. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दाखवलेला विश्वास आणि दिलेला पाठिंबा माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. भाजपमध्ये प्रवेशानंतर दिलेली संधी ही नवी जबाबदारी आणि प्रेरणा ठरली त्याबद्दल पक्ष नेतृत्वाचा मी ऋणी आहे. स्व.वसंतदादा पाटील, आदरणीय शरद पवार, स्व.जयंतराव टिळक, शेकापचे जयंतराव पाटील, ना.नितीन गडकरी, रामराजे निंबाळकर, सभापती राम शिंदे यांच्यासारख्या अनेक मान्यवर, अभ्यासू नेत्यांचे मार्गदर्शन या सभागृहाला लाभले आहे.

या वरिष्ठ सभागृहाने राज्याच्या कृषी, सहकार आणि शैक्षणिक क्षेत्राला दिशा देणारी धोरणे घडवली, अनेक योजना राबवल्या आणि जनसामान्यांच्या हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अशा या समृध्द परंपरा लाभलेल्या सभागृहात आमदार म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली, याचे समाधान आणि अभिमान दोन्ही मनात आहेत. माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, सभापती नीलम गोऱ्हे यांचेही मनःपूर्वक आभार मानतो. पुढील काळातही जनतेच्या सेवेसाठी तितक्याच निष्ठेने आणि प्रामाणिकपणे कार्य करत राहीन, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# विचारधारा नव्हे तर वाचकवर्ग केंद्रस्थानी असेल

### योग्य पद्धतीने व्यक्त होणाऱ्यांसाठी मसाप आणि संमेलनाचे व्यासपीठ खुले


◆ **पुणे, २४ मार्च**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या तसेच १०० व्या साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर कोणत्याही विशिष्ट विचारधारेचे वर्चस्व नसून वाचकवर्गाला केंद्रस्थानी ठेवून प्रभावीपणे मांडणी करणाऱ्या प्रत्येकासाठी हे व्यासपीठ खुले असेल, अशी स्पष्ट भूमिका मसापचे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश सोमण यांनी मांडली. 'तरुण भारत'शी साधलेल्या विशेष संवादात त्यांनी साहित्य, राजकारण आणि विचारधारा याबाबतचे आपले मत स्पष्ट केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेत एका विशिष्ट विचारप्रवाहातील व्यक्तींचा प्रभाव वाढणार असल्याची चर्चा सुरू असताना अध्यक्ष योगेश सोमण यांनी यावर स्पष्ट भाष्य केले. डावे-उजवे असे विभाजन परिषदेच्या कार्यात होणार नाही. जो कोणी चांगल्या आणि योग्य पद्धतीने विचार मांडू शकतो, त्याच्यासाठी परिषदेचे व्यासपीठ खुले आहे. साहित्यविश्वाचा मुख्य केंद्रबिंदू हा वाचक असून, त्याला कोणत्याही ठराविक विचारसरणीत अडकवणे योग्य नसल्याचे त्यांनी नमूद केले.

योगश सोमण म्हणाले की, पुस्तक वाचणारा प्रत्येकजण एका विशिष्ट विचाराचा असतोच असे नाही. सर्वप्रथम तो वाचक असतो, नंतर तो आपल्या अनुभवांनुसार आणि पटणाऱ्या विचारांनुसार स्वतःची भूमिका निश्चित करतो. त्यामुळे प्रथम त्याला वाचक म्हणूनच पाहणे योग्य ठरेल.

'तरुण भारत' सोबतच्या विशेष संवादात **योगेश सोमण** यांची स्पष्ट भूमिका



**पूर्वीही संमेलनात राजकारण्यांचा सहभाग मग आताच स्वायत्तेचा प्रश्न का ?**

मसापच्या नवीन कार्यकारणीवर राजकारणाच्या हस्तक्षेपाविषयी आणि मसापच्या स्वायत्ततेविषयी अनेक साहित्यिकांनी प्रश्न उपस्थित केला, यावर उत्तर देत योगेश सोमण म्हणाले की, पूर्वीही साहित्य संमेलनांमध्ये राजकीय व्यक्तींना स्थान देण्यात आले आहे, मात्र तेव्हा या बाबतीत आक्षेप घेतला गेला नाही. ९८ व्या संमेलनाला तुम्हांला शरद पवार चालतात ते राजकारणी नाहीत का? ते मात्र साहित्यावर प्रेम करणारे असू शकतात तर देवेंद्र फडणवीस, उदय सामंत, आशिष शेलार का असू शकत नाही. का ते तर फक्त एका झेंड्याचे आहेत आणि आम्ही फक्त त्यांचीच नाव घेतोय म्हणून तुम्ही मसापच्या स्वायत्तेवर प्रश्न करु शकत नाही. साहित्य परिषद ही स्वतंत्र संस्था आहे, पण शासनाशी संवाद ठेवणे आवश्यक आहे. कारण विविध उपक्रमांसाठी शासकीय मदत आवश्यक असते. कोणतेही सरकार सत्तेत आले, तरी त्यांच्याशी संवाद साधणे आणि सहकार्य घेणे अपरिहार्य आहे, म्हणूनच राजकारण्यांच्या सहभागाला स्वायत्ततेवर धोका म्हणून पाहणे योग्य नाही. ◀(तभा वृत्तसेवा)

#### राष्ट्रीय स्वयंसेवक साहित्यिक होऊ शकत नाही का?

योगेश सोमण म्हणाले, माझ्यावर संघाचे संस्कार झाले आहेत, पण त्यामुळे मी केवळ त्या विषयावरच लिहिले असे नाही. मी लिहिलेल्या ७५ एकांकिकांमध्ये केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचार नाहीत तर विविध विषय हाताळले आहेत. ना. ह. पालकरांनी डॉ. हेडगेवारांवर चरित्र लिहीले मग ना. ह. पालकर चरित्रकार नाहीत का? त्या चरित्राचा जर तिसऱ्या चौथ्या आवृती पर्यंत जाण्याइतका खप होत असेल आणि मग तुम्ही म्हणत असाल की, संघाच्या शाखांवरच जातेय तर खप होणारच पण खप होतोय म्हणजे वाचले जात आहे आणि त्या चरित्रामुळे माणसं संस्कारित होत आहेत हे महत्त्वाचे नाही का ? आता संघाविषयी कोण लिहित आहे किंवा संघाचा माणूस लिहित आहे तर तो साहित्यिक होऊ शकत नाही का ? असा प्रश्न योगश सोमण यांनी उपस्थित केला. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# श्रद्धा ठरू नये कमजोरी...

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांतील सीमारेषा अतिशय धूसर असते. श्रद्धा म्हणजे विचारपूर्वक स्वीकारलेला विश्वास; तर अंधश्रद्धा म्हणजे तर्क, पुराव्याशिवायचा आंधळा विश्वास. अंधश्रद्धेत माणूस कुणाच्या तरी आहारी जातो आणि श्रद्धावंत व्यक्ती श्रद्धेच्या पल्याड स्वयंभू असते. ती सश्रद्ध असतानाही विवेकी असते. श्रद्धा माणसाला नैतिक बळ देते, तर अंधश्रद्धा शोषणाचे कारण ठरते. अशोक खरात प्रकरणातील शोषण आणि त्याची व्याप्ती हे सारे पाहून सारेच अवाक् झाले आहेत. पण, हे असे इतक्या मोठ्या प्रमाणात घडत असताना आपण काय करीत असतो, हाही प्रश्न आहेच. सर्वसामान्य लोक नेहमीच सेलिब्रिटींचे, श्रीमंत-प्रभावशाली लोकांचे आणि राजकीय नेत्यांचे अनुकरण करीत असतात. एखादा मोठा नेता, सेलिब्रिटी किंवा उद्योगपती खरातसारख्या कथित आध्यात्मिक पुरुषाच्या चरणी श्रद्धा वाहताना दिसतो तेव्हा त्याचा प्रभाव नकळत समाजावर पडत असतो. त्यामुळेच खरातसारखे भोंदूबाबा वर्षानुवर्षे समाजाला नासवीत असतात. इतिहासातही अशी उदाहरणे आहेतच. दरवर्षी अशा एका तरी भोंदूचे प्रकरण उघडकीस येत असते आणि तरीही आपले डोळे उघडत नाहीत, हाच आश्चर्याचा विषय आहे.

गेल्या दशकभरात महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्यात भोंदूगिरीची दोनेक हजार प्रकरणे नोंदवली गेली आहेत. आर्थिक फसवणूक, जादूटोणा, चमत्कारांच्या नावाखाली शोषण, लैंगिक अत्याचार अशा अनेक प्रकारांनी ठिकठिकाणचे भोंदूबाबा समाजाला पोखरत आहेत. नोंद न झालेल्या प्रकरणांची संख्या नोंद झालेल्या प्रकरणांपेक्षा कितीतरी पटीने जास्त असणार. भीती, सामाजिक दबावामुळे लोक गप्प राहतात. त्यामुळे अशांचे काहीच बिघडत नाही. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कायदा आहे, असे म्हणतात. पण, तो आहे तर दिसत कसा नाही, असा प्रश्न विचारण्याचा हा प्रसंग आहे. खरात प्रकरणाची तक्रार बरीच आधी झाली होती. परंतु, त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले, असे दिसते. अशाने काळ सोकावतो आणि खरातसारखे भोंदू तर जास्तच सोकावतात. इतिहासाची पाने उलटून पाहिली तर अंगावर काटा आणणारी अनेक उदाहरणे दिसतात. नरबळीची अघोरी प्रथा आणि गुप्तधनाच्या हव्यासापोटी निष्पाप बालकांचे बळी देण्याचे प्रकार घडले आहेत. औषध देण्याच्या नावाखाली किंवा अंगात येण्याच्या प्रकारातून महिलांचे शोषण करण्यात आले. कधी चमत्काराचा बनाव करीत कुणी हवेतून साखळी काढली, तर कधी कुणी अंगारा देऊन कर्करोग बरा करण्याचा दावा केला. आजही देशात आणि राज्यात भोंदूगिरीच्या अनेक घटना घडताना आपण बघत आहोत. त्यातील अनेक घटना समाजाला हादरवून टाकणाऱ्या ठरल्या आहेत. अशा घटनांनी केवळ त्या व्यक्तींचे नुकसान होत नाही; तर समाजाच्या विवेकबुद्धीवर प्रश्नचिन्ह उभे होते. किरकोळ संकट पुढे आले तरी संयमाचे धागे उसवण्याचा हा काळ आहे. अशा काळात आपापल्या समस्येवर अल्प काळात उपाय शोधण्याच्या नादात भोंदूगिरीला सामाजिक बळ मिळते. भविष्य अज्ञात असते. खरे तर त्याच्या तशा असण्यातच मानवी जीवनाची गंमत आहे. पण, काही लोक भविष्याची जास्त चिंता करीत अशा वाईट लोकांच्या डावपेचांना बळी पडतात. आजार, आर्थिक अडचणी, कौटुंबिक समस्यांमुळे माणूस खचतो आणि झटपट उपाय शोधण्याच्या नादात भोंदूगिरीच्या जाळ्यात अडकतो. हे रोखण्यासाठी व्यापक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धाविरोधी कायदा अस्तित्वात आहे. पण, केवळ कायदा करून समस्या सुटत नसतात. अनेक वेळा तक्रारी नोंदवल्या जात नाहीत, पुरावे मिळत नाहीत किंवा साक्षीदार पुढे येत नाहीत. काही प्रकरणांमध्ये राजकीय किंवा सामाजिक दबावामुळेही कारवाई होत नाही. परिणामी, दोषींना शिक्षा होत नाही आणि भोंदूगिरीला आळा बसत नाही. भोंदूगिरीवर नियंत्रण आणायचे असेल, तर कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी लागेल आणि त्यासाठी तक्रारींवर लगेच कारवाई करावी लागेल. सरकारी यंत्रणेकडून एवढीच अपेक्षा आहे.

खरातसारखे भोंदूबाबा हे समाजातील अविवेकी आणि घाबरट संवर्गाचे अपत्य असतात. श्रद्धा बाळगता-बाळगता आपण अंधश्रद्ध होत आहोत, हेच अशा अनेकांना कळत नाही. अशी माणसं हळूहळू कर्मकांडात अडकवली जातात. मग खरातसारखे बाबा सांगतील ते करायला त्यांचे मन तयार होते आणि त्यातून अशा घटना घडतात. आजकालचे भोंदू तर हायटेक झाले आहेत. त्यापैकी अनेक बाबा फेसबुक लाईव्ह आणि युट्यूबच्या माध्यमातून आपल्या शयनकक्षापर्यंत पोहोचले आहेत. भीती, अज्ञान आणि असहायता ही भोंदूबाबांना बळ देणारी ठरते. माणूस स्वतःच्या कष्टांवर, विचारांवर आणि प्रयत्नांवर विश्वास ठेवण्याऐवजी अशा बाबांच्या मागे लागतो तेव्हा फसवणूक होणे अपरिहार्य असते. सर्व आध्यात्मिक स्त्री-पुरुष खरातसारखे नसतात हे खरेच आहे. काही मंडळी आध्यात्मिक शिकवणुकीतून समाजाचे भले करीत आहेत, यात वाद नाही. पण खरातसारखे भोंदूही अनेक आहेत. व्यापक समाजहिताच्या दृष्टीने भोंदूंना रोखलेच पाहिजे. त्यांच्या हालचालींवर नजर ठेवली पाहिजे. भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या अधिकारांच्या तरतुदी आहेत, तशा नागरिकांच्या कर्तव्याच्याही आहेत. आपण अधिकारांबाबत नको तितके जागरूक. कर्तव्याच्या नावावर आनंद. घटनेतीलच एक तरतूद आहे वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याची व तो समाजात व्यापक प्रमाणात प्रसृत करण्याची. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यातील सीमारेषा इथेच महत्त्वाची ठरते. श्रद्धा ही नेहमी वैयक्तिक असते. ती जीवनातील अनिश्चिततेशी सामना करण्याची ताकद देते. पण अंधश्रद्धा ही सामाजिक समस्या बनते. ती विचारशक्ती गिळून टाकते आणि माणसाला इतरांच्या हातातील बाहुली बनवते. खरात प्रकरण हे त्याचे ताजे उदाहरण. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे. त्याला सुधारकी चळवळींचा इतिहास आणि वर्तमान आहे. सामाजिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेले हे राज्य आहे. अशा राज्यात खरातसारखे समाजकंटक निर्माण होतात आणि त्यांचे शोषणाचे धंदे वर्षानुवर्षे बिनबोभाट चालत राहतात, हे अजिबात शोभणारे नाही. आज महाराष्ट्राच्या विकासाची गती प्रचंड आहे. पायाभूत सुविधांमध्ये मोठे बदल होत आहेत, गुंतवणूक वाढते आहे. शहरीकरण मोठ्या प्रमाणात होते आहे. पण समाजात अजूनही अंधश्रद्धा असेल आणि तिला कळत-नकळत पाठिंबा देणारे लोक असतील तर या प्रगतीत कुठेतरी न्यून आहे. कारण अशा घटनांचा परिणाम केवळ त्या व्यक्तींवर होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या प्रतिमेवर होतो. राज्याच्या प्रतिमेवर परिणाम होतो. सर्वत्र एक प्रश्न निर्माण होतो की, जिथे इतकी प्रगती होते आहे, तिथे अजूनही अंधश्रद्धेला एवढे स्थान का?... यावर उपाय करायचे असतील तर सर्वप्रथम, शिक्षण पद्धतीत बदल आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ माहिती देणे पुरेसे नाही. त्यांना विचार करायला शिकवले पाहिजे. प्रश्न विचारणे, तर्क वापरणे आणि पुराव्यांवर विश्वास ठेवणे ही सवय लावली पाहिजे. जिज्ञासू आणि चिकित्सक बुद्धीचे विद्यार्थी घडवणे हा सर्वांत महत्त्वाचा उपाय आहे. कारण त्यातूनच भविष्यातले जागरूक नागरिक घडतील. वर्तमान दुरुस्त करण्यासाठी प्रसिद्ध व्यक्तींनी अंधश्रद्धेला कोणत्याही पद्धतीने प्रोत्साहन देणे थांबवले पाहिजे. माध्यमांनी अंधश्रद्धेचा भंडाफोड वेळच्या वेळी केलाच पाहिजे. आणि शेवटी येते ती प्रत्येक व्यक्तीची स्वतःची जबाबदारी. समोरची व्यक्ती कुणीही असली तरी श्रद्धेचा विषय येताच संशयाने पाहणे शिकले पाहिजे. संशयी मन असणे ही कमजोरी नसते. ती शहाणपणाची सुरुवात असते. असा शहाणपणा नसेल तर काय घडते, हे आपल्याला खरात प्रकरणात दिसून आलेलेच आहे. त्यामुळे आता तरी सर्वांनी जागे झाले पाहिजे. आपले श्रद्धावंत असणे आपली कमजोरी ठरता कामा नये. आपल्या श्रद्धेचा फायदा कुठल्याही भोंदूबाबाला उठविता येणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. आपल्या श्रद्धेतून आपल्याला जे मानसिक बळ प्राप्त होते ते अशा व्यक्तींच्या चिकित्सेसाठीही वापरले पाहिजे आणि सर्वांनी मिळून अंधश्रद्धा व त्यासाठी कारणीभूत असलेल्या सर्व घटकांचा नाश केला पाहिजे.


## विशेष

# रेल्वेस्थानके परिवर्तनाच्या प्रक्रियेत

प्रा. सुखदेव बखळे

भारतातील रेल्वेस्थानकांचा विकास आता केवळ प्रवासी चढ-उतार करण्याच्या ठिकाणांपुरता मर्यादित राहिलेला नाही. आधुनिक शहरी नियोजनाच्या संकल्पनेनुसार ही स्थानके बहुविध वाहतूक केंद्रे (मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब) म्हणून विकसित होत आहेत. या प्रक्रियेमुळे रेल्वे प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक होत असून रेल्वेची प्रतिमाही बदलत आहे. 'मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब' म्हणजे एका ठिकाणी विविध वाहतूक साधनांची प्रभावी जोडणी. रेल्वेस्थानकाला केंद्रबिंदू मानून बस, मेट्रो, टॅक्सी, रिक्षा, सायकल आणि पादचारी मार्ग यांचे एकत्रित नियोजन केले जाते. भारतात या संकल्पनेला चालना देण्यासाठी 'अमृत भारत स्टेशन योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेत देशभरातील १३०० हून अधिक स्थानकांचा टप्प्याटप्प्याने विकास करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत स्थानके केवळ वाहतूक केंद्र न राहता शहरातील महत्त्वाचे सार्वजनिक आणि व्यावसायिक केंद्र बनवण्यावर भर दिला जात आहे. पूर्वी रेल्वेस्थानकातून बाहेर पडल्यावर पुढील वाहतुकीसाठी प्रवाशांना बराच वेळ लागायचा. आता बस, मेट्रो किंवा टॅक्सीची सुविधा स्थानकाच्या परिसरातच उपलब्ध होत असल्यामुळे प्रवास सुलभ झाला आहे. आधुनिक स्थानकांवर वातानुकूलित प्रतीक्षागृहे, स्वच्छ स्वच्छतागृहे, डिजिटल माहिती प्रणाली, फूड कोर्ट, शॉपिंग क्षेत्र, एस्कलेटर आणि लिफ्ट अशा सुविधा उपलब्ध होत आहेत. सीसीटीव्ही, 'स्मार्ट मॉनिटरिंग सिस्टिम', गर्दी व्यवस्थापन तंत्रज्ञान आणि आधुनिक प्रकाशयोजना यामुळे स्थानक परिसर अधिक सुरक्षित झाला आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभता रॅम्प, ब्रेल साईन, लिफ्ट आणि विशेष सुविधा यामुळे दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रवास अधिक सोपा झाला आहे.

आधुनिक स्थानकांमुळे भारतीय रेल्वेची प्रतिमा मोठ्या प्रमाणात बदलत आहे. पूर्वी रेल्वेस्थानक म्हणजे गर्दी, अस्वच्छता आणि अव्यवस्था असे चित्र डोळ्यासमोर येत असे. आता आधुनिक वास्तुकला, स्वच्छ परिसर, डिजिटल सेवा आणि व्यावसायिक व्यवस्थापनामुळे स्थानके आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देणारी ठिकाणे बनत आहेत. या बदलाचे एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे भोपाळमधील राणी कमलापती रेल्वेस्थानक. हे स्थानक विमानतळासारख्या सुविधांसाठी प्रसिद्ध झाले असून आधुनिक रेल्वेस्थानकाचा आदर्श नमुना मानले जात आहे. यामुळे भारतीय रेल्वेची जागतिक स्तरावर सकारात्मक प्रतिमा तयार होत आहे. रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाचा कार्यक्रम देशभर वेगाने पुढे जात आहे. 'अमृत भारत स्टेशन'अंतर्गत शेकडो स्थानकांचे




काम सुरू आहे. अनेक ठिकाणी स्थानकांच्या इमारतींचे आधुनिकीकरण, प्लॅटफॉर्म सुधारणा, पार्किंग व्यवस्था, प्रवेशद्वार आणि वाहतूक व्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील परळ, माटुंगा, चिंचपोकळी, लासलगाव आणि धुळे स्थानकांचा विकास करण्यात आला आहे. पुणे, शिवाजीनगर, हडपसर, खडकी ही रेल्वेस्थानके भविष्यात पूर्ण विकसित 'मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब' बनण्याची अपेक्षा आहे. रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळत आहे. स्थानक परिसरात व्यापारी संकुले, हॉटेल, रिटेल दुकाने आणि कार्यालये विकसित होत आहेत. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत आहे.

भविष्यात रेल्वेस्थानके अधिक स्मार्ट, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित असतील. सौर ऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना आणि पर्यावरणपूरक बांधकाम यावर भर दिला जाणार आहे. स्मार्ट तिकीट प्रणाली, मोबाईल ॲपद्वारे माहिती, 'एआय' आधारित गर्दी व्यवस्थापन आणि डेटा आधारित देखभाल प्रणाली यांचा वापर वाढविण्यात येणार आहे. स्थानकांचा विकास शहराच्या 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांशी जोडून एकात्मिक वाहतूक प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशभरात रेल्वेस्थानके आता बहुविध वाहतूक केंद्रे (मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब) आणि व्यावसायिक संकुले म्हणून विकसित केली जात आहेत. त्यात हवामानानुकूल सार्वजनिक जागांचीही संकल्पना आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय रेल्वे तसेच खाजगी भागीदारांनी मोठ्या प्रमाणावर स्थानक पुनर्विकास कार्यक्रमांना वेग दिला असून, प्रवाशांना उत्तम सेवेचा अनुभव देण्याबरोबरच रेल्वेच्या जमिनीतील व्यावसायिक क्षमता उलगडणे हाही उद्देश आहे. रेल्वेस्थानकांच्या या रूपांतरणामागे डिसेंबर २०२२ मध्ये रेल्वे मंत्रालयाने सुरू केलेली 'अमृत भारत स्टेशन स्कीम' ही राष्ट्रीय योजना प्रमुख प्रेरक शक्ती ठरत आहे. ६ ऑगस्ट २०२३ रोजी या योजनेंतर्गत देशभरातील ५०८ स्थानकांच्या पुनर्विकासासाठी भूमिपूजन करण्यात आले. या योजनेचा हेतू स्थानकांचे केवळ तात्पुरते सौंदर्यवर्धन न करता 'शहर केंद्र' म्हणून विकसित करणे हा आहे.

डिसेंबर २०२५ पर्यंत ठरवलेल्या १,३३७ स्थानकांपैकी १५५ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून या योजनेचा देशव्यापी विस्तार स्पष्टपणे दिसून येतो. मे २०२५ मध्ये या परिवर्तन प्रक्रियेत एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. त्या वेळी देशभरातील १०३ पुनर्विकसित स्थानकांचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये सहारणपूर (उत्तर प्रदेश), ओर्चा (मध्य प्रदेश), परळ (मुंबई) तसेच मुनीराबाद आणि धारवाड (कर्नाटक) या स्थानकांचा समावेश होता. या कार्यक्रमाने रेल्वेने पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाला मिळालेला वेग अधोरेखित केला. वाढीव अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रकल्प अंमलबजावणीतील गती, प्रवासी सुविधा आणि व्यावसायिक विकास यांचा समन्वय साधणारी नव्या प्रकारची दृष्टी यामुळे ही गती शक्य झाली आहे. पुनर्विकसित स्थानकांपैकी राणी कमलापती हे केरळमधील रेल्वे स्टेशन सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या मॉडेलवर उभारलेले जागतिक दर्जाचे उदाहरण मानले जाते. जर्मनीतील हेडलबर्ग या स्थानकाच्या धर्तीवर उभारलेले हे स्थानक भारतातील पहिले 'वर्ल्ड-क्लास' रेल्वेस्थानक म्हणून ओळखले जाते आणि येथे विमानतळासारखा प्रवासी अनुभव मिळतो. काही स्थानके पूर्णपणे नव्याने उभारली जात आहेत, तर अनेक ठिकाणी मध्यम स्तरावरील आधुनिकीकरणाचे काम केले जात आहे. तथापि, या नव्या पिढीतील स्थानकांचे दोन मूलभूत घटक स्पष्टपणे दिसतात. उत्तम सुविधा आणि पायाभूत रचनेद्वारे प्रवासी आराम वाढवणे आणि किरकोळ व्यापार, फूड कोर्ट आणि संरचित पार्किंगद्वारे व्यावसायिक क्षमता वाढवणे. पुनर्विकास कार्यक्रमाचा विस्तार होत असताना त्याच्या यशासाठी शाश्वतता आणि डिजिटलायझेशन यांचे प्रभावी एकत्रीकरण महत्त्वाचे ठरणार आहे. उष्णतेच्या लाटा, पूर आणि पाण्याची टंचाई यासारख्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या देशात हवामान-संवेदनशील स्थानक डिझाईन आता अपरिहार्य बनले आहे. सौर ऊर्जा, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना, नैसर्गिक थंडावा देणारी रचना, पावसाच्या पाण्याचे संकलन, शून्य-निचरा मलनिस्सारण प्रणाली आणि स्थानिक वनस्पतींवर आधारित हरित क्षेत्र याद्वारे पर्यावरणीय परिणाम कमी करता येतील आणि दीर्घकालीन संचालन खर्चही घटू शकतो. एकूणच, भारतातील स्थानक पुनर्विकास हा केवळ इमारती सुधारण्याचा कार्यक्रम नाही, तर भविष्यासाठी सज्ज आणि शाश्वत वाहतूक केंद्रे उभारण्याचा व्यापक प्रयत्न आहे. या परिवर्तनाचा प्रवास पुढे नेताना सर्वसमावेशक, तांत्रिकदृष्ट्या प्रगत, कार्यक्षम आणि देशाच्या व्यापक शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत राहणे अत्यावश्यक ठरणार आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# गो-तस्करीचे 'कोडे' केव्हा उलगडणार?

कायदे अनेक बनविले जातात पण, सर्वच कायद्यांची अंमलबजावणी होतेच असे नाही. केंद्र व राज्य सरकारांनी बनविलेले काही कायदे फक्त कागदावरच असल्याचे आपल्या लक्षात येईल. उदाहरण द्यायचे झाल्यास महाराष्ट्रात गोवंश हत्या, तस्करी, अवैध वाहतूक बंदी आणि गुटखा व पानमसाला बंदी कायदा आहे. पण, या दोन्ही कायद्याचे पालन व अंमलबजावणी होताना कुठेच दिसत नाही. कायद्यातल्या तरतुदीच्या उलट मात्र सर्व काही जोरात होत आहे. गुटखाबंदीचा कायदा २०१२ तर गोवंश हत्याबंदीचा कायदा २०१५ साली लागू झाला. हे कायदे अस्तित्वात येण्याच्या पूर्वीची आणि आताच्या स्थितीत किती बदल झाला हे सांगताच येत नाही. कारण, दिसण्यासारखा बदलच झाला नसल्याने तो सांगणे कोणालाही शक्य नाही. आता तर अनेकांना असे काही कायदे झाले आहेत, याचाही विसर पडला आहे. विदर्भच काय राज्यातल्या अनेक भागांतून गोवंशाची इतकी खुलेआम तस्करी व कत्तल होत असताना व्यवस्था मात्र मूकदर्शक झाली आहे. विशेष म्हणजे हे सर्व देशी गाईंना राज्य शासनाने 'राजमाता-गोमाता' हा दर्जा दिल्यावर होत असल्याने अनेकांचा संताप अनावर होत आहे.

कायदा व त्याचा अंमल करणारी व्यवस्था असताना सुद्धा गोतस्करी होते हे न उलगडणारे कोडे आहे. सुरुवातीला तस्करीवर काही प्रमाणात लगाम होती. पण, यंत्रणा आणि त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचा अभ्यास करून तस्करांनी आपली कार्यपद्धती बदलविल्याने तस्करीचे कोडे दिवसागणिक अवघड होत आहे. मध्य प्रदेशाचे महाराष्ट्राला लागून असलेल्या सीमावर्ती भागातले तालुके आणि याच भागाला लागून असलेले विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला या जिल्ह्यातील तालुके तस्करीचे मुख्य केंद्र आहे. या तालुक्यांमधली काही मोठी गावे गोवंश तस्करीची उपकेंद्रे म्हणून उदयास येत आहेत. तस्करीसाठी मार्ग अनेक आहेत. मेळघाटच्या जंगलातून तर जनावरांना पायदळ नेत तस्करी होते. अलिकडेच एका तस्कराचा वाघाने फडशा पाडला होता. या घटनेवरून आणखी एक बाब स्पष्ट झाली की, वनविभाग कितीही सांगत असला तरी मेळघाटच्या जंगलातून गो-तस्करी होतेच. सांगायचा मुद्दा इतकाच की, पहिले केंद्रित असलेली तस्करी व कत्तल आता विकेंद्रित पद्धतीने होत आहे. गोवंशाची कत्तलीसाठी होणारी वाहतूक पूर्वीसारखी मोठ्या वाहनातून होत नाही. छोट्या वाहनांतून वेगवेगळ्या मार्गाने ती होते. याच पद्धतीने कत्तलही विविध ठिकाणी छोट्या स्वरूपात होते.

या मागचा मुख्य उद्देश कारवाई झाली तरी कमीत कमी नुकसान हा आहे. यात नव्याने अधोरेखित करण्यासारखा मुद्दा म्हणजे तस्करीसाठी आता गरीब हिंदूंना चांगल्या मजुरीचे आमिष दाखवून कामावर घेतले जाते. या मागचा त्यांचा मुख्य उद्देश इतकाच की, या कामात फक्त एकाच धर्माचे नाही तर इतरही धर्माच्या लोकांचा समावेश आहे, हे व्यवस्थेला दाखविणे होय. वेगवेगळ्या क्लृप्त्या करून तस्करी यशस्वीपणे केली जात आहे. शासन व प्रशासन मात्र महात्मा गांधींच्या तीन बंदरांच्या भूमिकेत वावरत आहे. गोवंशाच्या अवैध वाहतुकीविरुद्ध ज्या काही कारवाया होतात, त्या हिंदुत्ववादी संघटनांशी जुळलेल्या गोरक्षकांच्या सर्तकतेनेच होतात. त्यांच्याकडून माहिती मिळाल्यावरच पोलिस कारवाई करते. आता पाठबळ नसल्याने आस्था असूनही त्यांचा उत्साह कमी झाला आहे.

परवा राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी गोवंश तस्करीचा मुद्दा अमरावती पोलिस अधीक्षकांना निवेदन पाठवून प्रकर्षाने मांडला. त्यात त्यांनी तस्करीचे हे काम संघटितपणे कशा पद्धतीने होते, हे उदाहरणासह नमूद करून यात सहभागी सर्वांवर गोहत्या बंदी कायद्यासह मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा) अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी मोर्शी तालुक्यातल्या हिवरखेड येथील नागठाणाचे एक उदाहरण दिले. मध्य प्रदेशचा सीमावर्ती भाग, वरूड, मोर्शी भागातले ते मुख्य केंद्र झाले असून येथेच गोवंश एकत्र करून विविध भागांत कत्तलीसाठी पाठविले जाते. पूर्वीप्रमाणे गोरक्षा दल कार्यान्वित करण्याची सूचना त्यांनी पोलिस अधीक्षकांना केली आहे. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कमी अधिक याच पद्धतीने सर्वत्र गोवंशाची वाहतूक होऊन पुढे कत्तल होते. या धंद्यात सहभागी असणारे आपली पद्धत वेळोवेळी बदलतात म्हणून ते यशस्वी होत आहेत. शासन व प्रशासनाची परिणामकारकता जुन्याच पद्धतीने काम करत असल्याने कमी झाली आहे. कार्यपद्धतीत बदल केल्याशिवाय आवश्यक ते परिणाम समोर दिसणार नाहीत. त्यासाठी गोसेवा आयोगासह समाजातल्या विविध घटकांनी दबाव वाढविण्याची गरज आहे. तेव्हाच गो-तस्करीचे कोडे उलगडेल!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# पद्मपुराण

प्रा. दिलीप जोशी

१८ पुराणात पद्मपुराण अत्युच्च स्थानावर आहे. पद्मपुराण भगवंताच्या पुराण विग्रहाच्या हृदयस्थानी आहे. 'हृदयं पद्मसंज्ञकम्' असे प्रमाण आहे. या पुराणाचा मुख्य प्रतिपाद्य विषय श्रीविष्णू असले, तरी यात भगवान शिव आणि ब्रम्हदेवांचेही प्रतिपादन आहे. या पुराणाच्या श्रवण अथवा पठनाने भगवंताप्रति रती, प्रीती आणि अनुराग उत्पन्न होतो. शास्त्रात याला शुद्धभाव म्हणतात म्हणूनच पद्मपुराण वेदतुल्य आहे.

**'तस्माद्यदि हरेः प्रीतेरुत्पादे धियते मतिः ।**
**श्रोतव्यमनिशं पुंभिः पुराणं कृष्णरुपिणः ॥'**

वेदांनंतर पुराणाचे स्थान आहे. काही वेळा तर या पुराणाचे स्थान वेदांच्याही वर असल्याचे स्वतः पद्मपुराणच सांगते.

**'यो विद्याच्चतुरो वेदान् सांगोपनिषदो द्विजः ।**
**पुराणं च विजानाति यः स तस्माद्विचक्षणः ॥'**

पद्मपुराणातील हा श्लोक याबाबत पुष्टी करतो. पद्मपुराण नैमिषारण्यात शौनकादी ऋषींना लोमहर्षन सुतांचे पुत्र उग्रश्रवा सुतांनी सांगितले. पद्मपुराण ५ खंड आणि ५५ हजार श्लोकांचे असून सृष्टी खंड, भूमी खंड, स्वर्ग खंड, पाताल खंड आणि उत्तर खंड असे ते पाच खंड आहेत.

**'प्रथमं सृष्टीखंडं हि भूमीखंडं द्वितीयकं ।**
**तृतीयं स्वर्गखंडं च पातालं चतुर्थकम् ।**
**पंचमं चोत्तरं खंडं सर्व पापप्रणाशनम् ।'**

काही ठिकाणी याची विभागणी सात खंडातही दिली आहे. या पुराणाचे नाव पद्मपुराण का पडले? तर, भगवान विष्णूंच्या नाभीतून कमळ निर्माण झाले. त्या कमळातून भगवान ब्रह्मदेव उत्पन्न झाले. ब्रह्मदेवांनी सृष्टी निर्माण केली. त्यावेळी भगवान विष्णूंनी सांगितलेला उपदेश पद्मपुराण रूपात ब्रह्मदेवांनी आपला पुत्र मरीची पुलस्त्य आदींना सांगितला. थोडक्यात हे तत्त्वज्ञान आणि तत्त्वकर्ते पद्म म्हणजे कमळातून निर्माण झाले म्हणून या पुराणाला पद्मपुराण म्हणतात.

सृष्टी खंडामध्ये पुलस्त्य महामुनी यांनी हे पुराण भीष्माचार्यांना सांगितले. यात त्यांनी सृष्टीक्रम तथा भगवान विष्णूंचे महात्म्य सांगितले. या पुराणात वराह अवतार कथा, लक्ष्मीची कथा, अमृताची समुद्रमंथनाची कथा विशद केली. सतीचा देहत्याग, दक्षयज्ञ विध्वंस इथे विशेषत्वाने सांगितला. भीष्म आणि पुलस्त्य यांच्या संवादातूनच देवता, दानव, गंधर्व, नाग आणि राक्षस यांची उत्पत्ती कथा सांगितली. मरुद्गण, चौदा मन्वंतर, पृथु चरित्र, सूर्यवंश वर्णन, चंद्रवंश वर्णन, यदुवंश तथा श्रीकृष्ण अवतार वर्णन पद्मपुराणात सांगितले आहे. पुष्कर क्षेत्र आणि सरस्वती प्राकट्य, पुष्कर क्षेत्री भगवान श्रीराम लक्ष्मण सीतामाई यांनी जाऊन केलेला श्राद्ध विधी, श्रीराम द्वारा शंबूक वध कथा या पुराणात आहे. दंडकारण्य उत्पत्ती, तारकासुर जन्म, मदन दहन कथा, गणेश कार्तिकेय जन्म, तारकासुर वध इथे आहे. गरुड चरित्र, रुद्राक्ष उत्पत्ती, गंगा उत्पत्ती इत्यादी सृष्टी खंडात आहे.

पद्मपुराणाचा दुसरा भाग म्हणजे भूमी खंडात शिव शर्मा नामक भक्त आणि त्याचे चार पुत्र यांची कथा, पाप-पुण्य फळ, ययाती कथा, महर्षी च्यवन कथा, विहुंड दैत्य वध आणि पद्मपुराण महात्म्य आहे. पद्मपुराणाचा तिसरा खंड असलेल्या स्वर्ग खंडात भारतवर्षाचे वर्णन ज्यात नर्मदादी, अमरकंटक, कावेरी, यमुना, काशी, प्रयाग वर्णन आहे. कीर्तन महिमा, ब्रह्मचर्य नियम, गृहस्थ नियम, वानप्रस्थ आणि संन्यास नियम या खंडात आहे. पद्मपुराणाचा चौथा खंड म्हणजे पाताल खंडात श्रीराम भगवंताचे श्रीलंकेतून अयोध्या आगमन आणि त्या नंतरचे वर्णन आहे. सीतामातेचे अरण्यात जाणे, लव आणि कुश, भरत, शत्रुघ्न, लक्ष्मण वर्णन इत्यादी इथे आहे. वृंदावन आणि श्रीकृष्ण-राधा, शालिग्राम वर्णन, तुळशी आणि अश्वत्थ महिमा दिला आहे. तुळशीला हरिप्रिया का म्हणतात? तिचे औषधीय महत्त्व, उत्पत्ती इत्यादी बाबी या पुराणात आहेत. पुढील श्लोकावरून लक्षात येईल.

**'तुलस्यामृत जन्मासि सदा त्वं केशव प्रिये!**
**केशवार्थ चिनोमि त्वं वरदा भव शोभनेय ।'**

पद्मपुराणात काही प्रात्यक्षिक बाबींचा विचार दिला आहे. उत्तरखंडात बद्रिकाश्रम आणि नारायण महिमा, अन्नदान, जलदान, वृक्षारोपण महिमा दिला आहे. पाणी आणि वृक्षारोपण किती महत्त्वाचे हे पद्मपुराण सांगते. प्रत्येक महिन्यात दोन एकादशी येतात. त्यांची वर्षाची एकूण २४ नावे जसे मोक्षदा एकादशी, सफला एकादशी, पुत्रदा एकादशी, षट्तिला आणि जया एकादशी, विजया आणि आमलकी एकादशी अशा विविध एकादशीची नावे आणि महात्म्य पद्मपुराणात आहेत. चातुर्मास महात्म्य, श्रीमद्भगवद्गीता महात्म्य, मार्कंडेय जन्म, विविध अवतार कथा या पुराणात आहेत. शिव-विष्णू ऐक्य या पुराणात दिले आहे.

**'शैवम च वैष्णवम लोकमेका रूपं नरोत्तम,**
**द्वयोश्चाप्यन्तरं नास्ति एक रूपं महात्मनोः ।'**

शिवाय

**'विष्णु रूपाय विष्णवे शिव रूपिणे,**
**शिवस्य हृदये विष्णुर्विष्णुर्हृदय शिवः ।'**

या पुराणात शिव, विष्णू आणि ब्रह्मा यांचे तत्त्व मांडले आहे. विष्णुभक्तीची उत्कटता सांगताना जिव्हा तीच जी विष्णू नाम घेते, हृदय तेच जे नारायण नामाने पिघळते हे सांगणारा पुढील श्लोक पहा.

**'सा जिह्वा य हरीं स्तौति तन्मनास्तत्पादानुगम्,**
**तानि लोमानि चोच्यन्तेय यानि तत्रामनि च्योष्ठितम् ।**
कुर्वन्ति तच्च नेत्राम्बु यदाच्युत प्रसन्नतः।'

पद्मपुराण पठन अथवा श्रवण हा भगवत्प्रीतीसाठी मार्गसोपान आहे, हे पद्मपुराणाचे महात्म्य आहे.

**'तस्माद्यदि हरेः प्रीतेरुत्पादे धीयते मतिः ।**
**श्रोतव्यमनिशं पुंभिः पुराणं कृष्णरुपिणः ।'**

या श्लोकातून पद्मपुराण महिमा लक्षात येईल. पद्मपुराण परिपूर्ण पुराण असून सर्वांना उपयुक्त, समजणारे आणि करणीय धार्मिक बाबी सांगणारे पुराण आहे. हे पुराण भारताचा इतिहास आहे. त्यामुळेच हे पुराण प्रासादिक आहे.

९८२२२६२७३५

### पाणपोई नामशेष होण्याच्या मार्गावर

पूर्वी कडक उन्हाळ्यात वाटसरूंची तहान भागावी म्हणून ठिकठिकाणी पाणपोई बांधली जायची. मात्र या आधुनिक युगात ग्रामीण भागात आता पाणपोईचे अस्तित्वच नष्ट होत चालले आहे. पैसे देऊन मिनरल वॉटर विकत घेऊन वाटसरूंकडून आपली तहाण भागवली जात आहे. सध्याच्या बदललेल्या या आधुनिक युगात मिनरल वॉटरचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. प्रवास करताना, नवख्या ठिकाणी जाताना मोठ मोठ्या कार्यक्रमाप्रसंगी शुद्ध व निर्जंतुक केलेले मिनरल वॉटर वापरले जाऊ लागल्याने पाणपोई दुर्लक्षित होऊ लागल्या आहेत. ग्रामीण भागातही मिनरल वॉटर उपलब्ध होत असल्याने सर्वसामान्यांकडून देखील याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

पूर्वी ग्रामीण भागात तसेच शहरी भागातही विविध सामाजिक संस्था, सेवाभावी संस्था, दानशूर व्यक्ती, विविध प्रकारची मंडळे यांच्याकडून गावांतील मुख्य रस्त्यांवर, चौकात, वर्दळीच्या ठिकाणी उन्हाळा सुरू झाल्यानंतर पाणपोई सुरू केली जात होती. यासाठी मातीच्या मोठ्या रांजणामध्ये पिण्याचे पाणी भरून ते एखाद्या झाडाखाली अथवा सावलीच्या ठिकाणी झाकून ठेवले जात होते. पाणी पिण्यासाठी प्याला व त्याबरोबर पाणी घेण्यासाठी ओरगाळे देखील या ठिकाणी ठेवलेले असायचे. उन्हातान्हात थकून-दमून आलेल्या व्यक्तीसाठी ही पाणपोई म्हणजे आपली तहान भागविण्यासाठी मोठा आधार होता. अतिथी देवो भव या उक्तीप्रमाणे भारतीय संस्कृतीत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या या पाणपोईतील पाणी पिऊन तृप्त झालेली व्यक्ती पाणपोई सुरू करणाऱ्याला मनोमन धन्यवाद देऊन कृतज्ञता व्यक्त करत होती. मात्र आता मिनरल वॉटरमुळे पाणपोईचे अस्तित्वच राहिले नाही. ग्रामीण भागातही ठिकठिकाणी मिनरल वॉटरचे उत्पादन करणारे कारखाने सुरू झाले आहेत. त्यामुळेच भारतीय संस्कृतीचे प्रतीक असणारी पाणपोई नामशेषच होण्याच्या मार्गावर असल्याचे लक्षात येत आहे.

**जयदीप सुधीर हिरवे**/पुणे. ९०९६२७६४८३

## वाचक पत्रे

### 'अविरत' शतकाचा प्रवास, विचारांचा अखंड यज्ञ

२१ मार्च २०२६ रोजी प्रकाशित 'अविरत' या शताब्दी विशेष पुरवणीने शंभर वर्षांचा घेतलेला आढावा, हा एका विचारप्रवाहाचा, एका मूल्यपरंपरेचा आणि एका अखंड राष्ट्रनिष्ठ प्रवासाचा जिवंत दस्तावेज वाचकांसमोर ठेवला आहे. ''न मे कर्मफले स्पृहा'' हे ब्रीदवाक्य घेऊन दैनिक 'तरुण भारत'ची वाटचाल खऱ्या अर्थाने अविरत सुरू आहे. कर्मयोगाची ही अखंड परंपरा केवळ आजपर्यंत मर्यादित नाही, तर पुढील शतकानुशतकेही अशीच तेजस्वीपणे सुरू राहील, याबाबत तिळमात्र शंका नाही. ''चले हैं ध्येय पथ पर, चलेंगे ध्येय पथ पर'' या गीतातील भावार्थाप्रमाणे, ध्येयवादी, सातत्यपूर्ण आणि निष्ठेची ही परंपरा या पुरवणीच्या प्रत्येक पानातून जाणवते.

'अविरत'मधील लेख वाचताना स्पष्ट होते की तरुण भारत हे : राष्ट्र प्रथम भूमिका जपणारे दैनिक, एका विचारप्रवाहाचा उत्सव, पत्रकारितेचे प्रेरणास्थान, शताब्दीचा धगधगता यज्ञ, मराठी पत्रकारितेतील सोनेरी पर्व. ही सर्व विशेषणं तरुण भारतला अगदी सार्थ ठरतात. गेली ५८ वर्षे या प्रवासाचा मी स्वतः साक्षीदार आहे. समजायला लागल्यापासून तरुण भारत हे माझ्या जीवनाचा एक अविभाज्य भाग राहिले आहे. विशेषतः स्पंदन पुरवणीमुळे आमच्या संगणक संस्कार केंद्रातील अनेक बालकांना लिहितं करण्याची प्रेरणा मिळाली, एखाद्या रुक्ष क्षेत्रात (जिथे केवळ यंत्रांचे आवाजच कानांवर) राहूनही लिखाणाला स्थान देऊन प्रोत्साहन देणाऱ्या तरुण भारताचे मोठे योगदान आहे. या शताब्दी पुरवणीचे दोन्ही भाग एकत्रितपणे, ऐतिहासिक, आश्वासक आणि देदीप्यमान वाटचाल दर्शवतात. भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांना जोडणारा सेतू निर्माण करतात. समाजाभिमुख दृष्टिकोन ही खास ओळख, मूल्यांची जपणूक आणि देशभक्तीचा जागर, राष्ट्रचेतनेच्या जागृतीचा उत्सव, लोकशाहीचा निर्भीड प्रहरी, माध्यम जगतातील कर्मयोग, समृद्ध व्यक्तिमत्त्व घडविणारे वृत्तपत्र म्हणून तरुण भारतची वैशिष्ट्यपूर्ण ओळख होते. तरुण भारत हा संघ विचारांचा अभिमान बाळगणारा, पण मुखपत्र नसलेला स्वतंत्र विचारांचा मंच आहे ही त्याची सर्वांत मोठी ताकद आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

### पुन्हा चुली पेटल्यात

युद्ध इराण- इस्रायल, अमेरिका यांच्यात सुरू आहे. पण त्याची झळ संपूर्ण जगाला बसली आहे. गृहिणींना धुरांचा त्रास नको म्हणून घरोघरी स्वयंपाकासाठी गॅस वापरला जातो आहे. केरोसिन तर आता मिळतच नाही. कोळसा, लाकडं याचे भाव आकाशात आहे. अचानक गॅस सिलेंडर टंचाई निर्माण झाली. ज्यांच्याजवळ एकच सिलेंडर आहे, ते संपले की दुसरे मिळायला दोन दिवस लागत आहे. युद्धाची झळ तळागाळांपर्यंत पोहोचली आहे. हे सगळं लवकर थांबले पाहिजे. नाहीतर आणखी कशा कशाची टंचाई होईल. अप्रत्यक्ष परिणाम आता होतातच आहे. आपण सगळे प्रार्थना करू शकता.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## जाहिर नोटीस
### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १७/२०२५

१. बुशराबी वजीर पठाण **अर्जदार**
रा. ५२५ बारंगुळे प्लॉट बार्शी
(असल्यास, तर्फे वकील इस्माईल चाँ तांबोळी)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी **गैरअर्जदार**
तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा.५२५ बारंगुळे प्लॉट बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०२ एप्रिल १९९४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ एप्रिल १९९४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
**(एफ. आर. शेख)**
तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १८/२०२५

१. नौशाद महेबुब शेख **अर्जदार**
रा. एकमिनार मस्जिद ५२५ बारंगुळे प्लॉट बार्शी
(असल्यास, तर्फे वकील इस्माईल चाँ तांबोळी)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी **गैरअर्जदार**
तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. एकमिनार मस्जिद ५२५ बारंगुळे प्लॉट बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २० जुन १९७६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २० जुन १९७६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
**(एफ. आर. शेख)**
तहसिलदार बार्शी

# जी.के. सामाजिक संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. प्रसाद चवरे





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

जी.के. बहुउद्देशीय सामाजिक संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नूतन पदाधिकारी निवड करण्यात आली. यावेळी उत्सव अध्यक्ष म्हणून प्रसाद चवरे यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष साहिल शेख, साहिल पठाण, सचिव सोनू लोंढे, कार्याध्यक्ष आदित्य बोराडे, रोहित नगरे, स्टँडिंग प्रमुख समाधान कदम यांची निवड करण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष गोविंद कांबळे, सुरेश पाटोळे, नगरसेवक अमोल शिंदे, ज्ञानेश्वर सपाटे, सुनिल डांगे, बंटी सोनके, पृथ्वीजित सरवदे, ऋषीकेश कांबळे, आकाश बोराडे, निवृत्ती कदम, शहाबाज मुल्ला उपस्थित होते.

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षित हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 151861405 | मालमत्तेवर कर्ज | 1. गंभिरे अनिल दतू<br>2. राजाबाई दत्तात्रय गंभिरे | 14/02/2026 | INR 5,47,172.69/- |

**मालमत्तेचा पत्ता:** महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुका, उंब्रे (वे) येथील मिल्कत क्रमांक ४५२ असलेली निवासी मालमत्ता, जिचे एकूण क्षेत्रफळ ५०६.३१ चौ.मी. आहे आणि जिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: उत्तर: शिवाजी गंभीरे यांचे घर, दक्षिण: मोकळी जागा, पूर्व: रस्ता, पश्चिम: सतीश वेताल यांचे घर. महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुका, उंब्रे (वे) येथील मिल्कत क्रमांक ४५२ असलेली निवासी मालमत्ता, जिचे एकूण क्षेत्रफळ ५०६.३१ चौ.मी. आहे आणि जिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: उत्तर: शिवाजी गंभीरे यांचे घर, दक्षिण: मोकळी जागा, पूर्व: रस्ता, पश्चिम: सतीश वेताल यांचे घर.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 25/03/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**



# शिक्षक संघटनेचे अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनीचा 'अर्धनग्न उपोषणा'चा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च**

अक्कलकोट तालुक्यातील शिक्षकांच्या प्रतिनियुक्तीच्या प्रश्नावरून आंदोलन अधिक तीव्र होत असून, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी प्रशासनाला 'अर्धनग्न उपोषणा'चा इशारा दिला आहे. कट्टीमनी हे २३ फेब्रुवारी २०२६ पासून येथील पुनम गेट परिसरात जिल्हा परिषदेसमोर उपोषणास बसले आहेत. मात्र, अद्याप संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांच्या मागण्यांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अक्कलकोट तालुक्यातील प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांच्या अधिकारांचा वापर करून शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या केल्याचा विरोध संघटनेतर्फे करण्यात येत आहे. या निर्णयाविरोधात सुरू असलेल्या उपोषणाकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअंतर्गत, २५ मार्चपासून अर्धनग्न अवस्थेत उपोषण सुरू करण्यात येणार असून, तरीही मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास ३० मार्चपासून पूर्ण नग्न अवस्थेत आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर

**कार्यालय पत्ता :- 'पंचवटी' १५८/६, वज्रेश्वरी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर. - ४१३००६**

### सोने दागिन्यांची जाहीर लिलावाची नोटीस

पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित., सोलापूर या संस्थेच्या सोनेचे दागिने जिन्नस तारण ठेऊन कर्ज घेतलेल्या थकबाकीदार कर्जदार यांना या जाहीर नोटिसिने कळविण्यात येते की, सोनेचे तरण ठेऊन घेतलेल्या कर्ज खातेची मुदत संपून थकबाकी आलेली आहे. तसेच त्यांनी मुदतीत कर्जाची मुद्दल व व्याज परतफेड केलेली नाही. सदर कर्जदारांना वेळोवेळी कर्जाची परतफेड करण्याबाबत तोंडी व रजिस्टर नोटिसही दिलेली आहे, तरीही त्यांनी कर्जाची परतफेड करून दागिने सोडवून नेलेले नाही. अश्या कर्जदारांनी संस्थेकडे तारण दिलेले दागिने जाहीर लिलावाने विक्री करून संस्थेचे रक्कम वसूल करणे भाग पडले आहे. अश्या कर्जदारांनी दि. १३/०४/२०२६ अगर तत्पूर्वी आपापल्या कर्जाची व्याजासह संपूर्ण रक्कम संस्थेत भरून आपापली कलमे संस्थेच्या कामाच्या वेळी सोडवून न्यावी. तसे न झाल्यास सोने / चांदी कर्ज नियमास अनुसरून तारण दागिनेची जाहीर लिलावाने विक्री संस्थेच्या कार्यालयामध्ये केले जाईल व त्याच्या सर्व खर्चास व परिणामास संबंधित कर्जदार जबाबदार राहतील. तद्नंतर कर्जदाराची कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. सदरचे जाहीर लिलावाने येणाऱ्या रकमेतून सर्व रकमेची परतफेड करून घेतली जाईल. त्यानंतरही जर संस्थेची काही रक्कम येणे राहिल्यास सदरच्या रकमेची जबाबदारी सदर खातेदारवरतीच राहील व ती यांचेकडून वसूल केले जाईल याची नोंद घ्यावी.

**लिलावाचे ठिकाण : पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित., सोलापूर**
**पत्ता :- पंचवटी १५८/६, वजेश्वरी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर, ४१३००६**
**लिलावाची तारीखः १५ / ०४ / २०२६ वार : बुधवार रोजी दुपारी १२.३० वाजता.**

तरी खालील सर्व सोने दागिने तारण दिलेल्या कर्जदारांनी या जाहीर लिलावाचे नोटीसीची दखल घ्यावी व आपली कलमे दि. १३/०४/२०२६ / पूर्वी सोडून घेऊन संस्थेस सहकार्य करावे, अशी विनंती. लिलावाचे नियम व अति शर्ती लिलावाचे वेळी पाहण्यास मिळतील.

**संपर्क अधिकारी ९६७३८८९७७७ / ९१६८८०६४३०.**

| अ. क्र. | खाते नं. | थकबाकीदाराचे नाव | थकबाकी रक्कम दि. १५/०३/२०२६ अखेर + पुढील होणारे व्याज, खर्च व इतर वेगळे |
|---|---|---|---|
| १ | ६००८/८६ | कोरे संतोष चंद्रकांत | ३,९७,७६०/- |
| २ | ६००८/८९ | कोरे संतोष चंद्रकांत | १३,८८,३५६/- |
| ३ | ६००८/९३ | कोरे संतोष चंद्रकांत | ४,४१,५१८/- |
| ४ | ६००८/९५ | कोरे संतोष चंद्रकांत | २,५३,७१८/- |
| ५ | ६००८/९६ | कोरे संतोष चंद्रकांत | ३,२०,५१६/- |
| ६ | ६००८/९७ | कोरे संतोष चंद्रकांत | १६,४५,६०८/- |
| ७ | ६००८/९८ | कोरे संतोष चंद्रकांत | ९,३९,६२२/- |
| ८ | ६००८/९९ | दूधगी गुरुबसप्पा मल्लिकार्जुन | ६,४१,५२३/- |
| ९ | ६००८/१०० | दूधगी गुरुबसप्पा मल्लिकार्जुन | ४,५०,४५३/- |
| १० | ६००८/१०१ | दूधगी गुरुबसप्पा मल्लिकार्जुन | ६,१४,७०६/- |
| ११ | ६००८/१०२ | सोनसळे प्रीतम रविंद्रकुमार | २,८७,३५५/- |
| १२ | ६००८/१०३ | सोनवणे संजय चंद्रहास | ३,३७,४२७/- |
| १३ | ६००८/१०४ | सोनसळे प्रीतम रविंद्रकुमार | ३,२०,७३६/- |
| १४ | ६००८/१०५ | सोनवणे संजय चंद्रहास | २,८७,३५५/- |
| १५ | ६००८/१०६ | सोनसळे प्रीतम रविंद्रकुमार | ३,२०,७३६/- |
| १६ | ६००८/१०७ | दूधगी श्रध्दा गुरुबसप्पा | ३,३८,०३३/- |
| १७ | ६००८/१०८ | दूधगी श्रध्दा गुरुबसप्पा | ३,०४,५१७/- |
| १८ | ६००८/१०९ | दूधगी श्रद्धा गुरुबसप्पा | ५,५४,६९९/- |
| १९ | ६००८/११० | पाटील ओंकार राजेंद्र | ५,८५,७८९/- |
| २० | ६००८/१११ | पाटील ओंकार राजेंद्र | ६,३६,०११/- |

**टीप :**
१. लिलावाचे अटी व नियम संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.
२. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीने अनामत रक्कम रु. २,००० लिलाव सुरु होण्यापूर्वी भरावी लागेल. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
३. लिलावाच्या वेळी सर्वात जास्त बोली बोलणाऱ्यांचे नावे ३ वार पुकारून लिलाव संपविला जाईल.
४. लिलावासंबंधी सर्व अधिकार सी.ई.ओ / मॅनेजर यांना राहील.
५. सोने जिन्नस ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत त्याचा लिलाव केला जाईल. यासंदर्भात कोणतीही तक्रार केलेले चालणार नाही.
६. लिलावातून सोने तारण कर्जाची संपूर्ण रक्कम मुद्दल, व्याज, दंडव्याज, खर्चासह वसूल न झाल्यास उर्वरित राहिलेले रक्कम सहकार कायदा कलम १०१ अन्वये दावा दाखल करून मुद्दल, व्याज व खर्चासह वसूल केले जाईल याची कर्जदारांनी नोंद घ्यावी.

(शिक्का)

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित., सोलापूर**

# भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) नुसार अधिसुचना

**क्र./एलएक्यू/एसआर/वेताळवाडी/०१/२०१७**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग, कुर्डूवाडी दि. १२/०३/२०२६**

ज्या अर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस-११/२०१४/सी.आर.७७ (पार्ट-२)/ए-२ दि.११ सप्टेंबर २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई 'मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापार करुन असेल अधिसुचीत केले आहे की सदर अधिनियमाच्या कलम ३(झ अ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत भूसंपादना संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, **'समुचित शासन'** असल्याचे मानण्यात येईल.

त्या अर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्या अर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायदद्याच्या कलम ११ उपकलम ४ अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतूदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकलम ५ व भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २००४ चे कलम ५० उपकलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे कान हाती घेईल.

आणि ज्या अर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन असल्याने **उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डूवाडी** यांना जिल्हाधिकारी यांचेवतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

## परिशिष्ट १
### जमिनीचे वर्णन

**गावाचे नाव** : वेताळवाडी **तालुका** :- माढा **जिल्हा** :- सोलापूर

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | अ.क्रं. | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४६ पै | ०.२० | २ | ५० पै | ०.२० |
| ३ | ५१ पै | ०.१२ | ४ | ५२/१ पै, ५२/२ पै | ०.०८ |
| ५ | ५३ पै | ०.०३ | ६ | ५४ पै | ०.०८ |
| ७ | ५५ पै | ०.०७ | ८ | ५६ पै | ०.११ |
| ९ | ५७ पै | ०.१८ | १० | ५९ पै | ०.०६ |
| ११ | ६० पै | ०.०८ | १२ | ६१ पै | ०.०५ |
| १३ | ६३ पै | ०.१२ | १४ | ६६ पै | ०.१० |
| १५ | ६७ पै | ०.०५ | १६ | ६८ पै | ०.०५ |
| १७ | ६९ पै | ०.०८ | १८ | ७३ पै | ०.११ |
| १९ | ७४ पै | ०.१४ | २० | ७५ पै | ०.१२ |
| २१ | ७९ पै | ०.१८ | २२ | ८० पै | ०.०५ |
| २३ | ८३ पै | ०.०७ | २४ | ८५ पै | ०.०५ |
| २५ | ८६ पै | ०.०६ | २६ | ८७ पै | ०.०६ |
| २७ | ८९ पै | ०.१३ | २८ | ९३ पै | ०.१३ |
| २९ | ९६ पै | ०.२१ | ३० | ९७ पै | ०.११ |
| ३१ | १०१ पै | ०.०४ | **एकूण** | | **३.१२** |

## परिशिष्ट २

**प्रकल्पाचे नाव :-** सीना-माढा उपसा सिंचन योजना उजवा कालवा वितरीका क्र. १ करीता मौजे वेताळवाडी ता. माढा, जि. सोलापूर

**प्रकल्पाचे विवरण :-** सीना-माढा उपसा सिंचन योजना उजवा कालवा वितरीका क्र. १ करीता मौजे वेताळवाडी ता. माढा, जि. सोलापूर

**सामाजिक फायदे :-** जलसिंचन
(सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

## परिशिष्ट ३
### पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण

**गावाचे नाव** : वेताळवाडी **तालुका** :- माढा **जिल्हा** :- सोलापूर

| अ.क्रं | स.नं/गट नं. | क्षेत्र (हे-आर) |
|---|---|---|
| | लागू नाही. | |

## परिशिष्ट ४
### सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा
### अनुसूची - चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शसन यांचेकडील क्रमांक संकीर्ण-२०२५ प्र.क्र.४७/अ-३, दिनांक १६ संप्टेंबर २०२५ अन्वये सदर प्रकल्पाचे काम संपादन मडंळाने ताबा घेऊन पूर्ण झाले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाला असल्याने विधी व न्याय विभागाने अन्य प्रकरणी दिलेल्या अभिप्रायानुसार भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १० (क) नुसार सदर प्रस्तावास पूर्वलक्षी प्रभावाने SIA सूट देता येऊ शकत नाही.

## परिशिष्ट ५
### प्रशासक नियुक्तीचे विवरण

**१) प्रशासकाचे पदनाम :-** लागू नाही
**२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :-** लागू नाही
**३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे :- लागू नाही**

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुडूवाडी यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**नोट - प्रस्तूत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उपविभागीय अधिकारी माढा विभाग, कुर्डूवाडी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.**

**स्थळः- कुर्डूवाडी**
**दिनांक :- १२/०३/२०२६**

**जिमाका/सो/जाहि/४०६/२०२५-२६**

**सही/-**
**(जयश्री आव्हाड)**
**उपविभागीय अधिकारी**
**माढा विभाग, कुर्डूवाडी**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘खेलो इंडिया’ स्पर्धेत १३०० खेळाडूंचा सहभाग

## नऊ क्रीडा प्रकार, १०६ सुवर्ण पदके ● आजपासून स्पर्धांचा थरार

◆ **रायपूर, २४ मार्च**

बुधवारपासून सुरू होणाऱ्या खेलो इंडिया वनवासी खेळांमध्ये देशभरातील अंदाजे १,३०० खेळाडू १०६ सुवर्ण पदकांसाठी नऊ स्पर्धांमध्ये भाग घेणार आहेत. हे खेळ छत्तीसगडमधील तीन ठिकाणी (रायपूर, जगदलपूर आणि सुरगुजा) आयोजित केले जातील.

ओडिशाने १२५ खेळाडूंसह सर्वांत मोठा संघ पाठवला आहे, तर यजमान छत्तीसगड (१२१), झारखंड (१०७) आणि आसाम (१०६) यांचाही मोठा सहभाग असेल. तिरंदाजी, ॲथलेटिक्स, फुटबॉल, हॉकी, जलतरण, वेटलिफ्टिंग आणि कुस्ती या खेळांमध्ये पदके पणाला लागतील, तर मल्लखांब आणि कबड्डीसारखे पारंपरिक खेळ प्रात्यक्षिक स्पर्धा म्हणून आयोजित केले जातील.

खेळाडू, प्रशिक्षक आणि अधिकारी यांच्यासह अंदाजे ३,८०० सहभागी या स्पर्धेत भाग घेतील. स्पर्धा ३ एप्रिलपर्यंत सुरू राहील. वनवासी समाजातील माजी दिग्गज हॉकीपटू आणि हॉकी इंडियाचे सध्याचे प्रमुख दिलीप तिर्की यांनी साई (भारतीय क्रीडा प्राधिकरण) माध्यमांना सांगितले, ही माझ्यासाठी आणि आम्हा सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे की ही स्पर्धा देशात पहिल्यांदाच आयोजित केली जात आहे. वनवासी समाजातील तरुण आणि खेळाडूंना त्यांची प्रतिभा दाखवण्यासाठी, क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी आणि देशासाठी खेळण्याची ही एक उत्तम संधी आहे.

ते पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ध्येय भारताला एक क्रीडाप्रेमी राष्ट्र बनवणे आहे. सर्व तरुणांनी क्रीडा क्षेत्रात सहभागी व्हावे आणि कोणता ना कोणता खेळ खेळावा, अशी त्यांची इच्छा आहे.

ॲथलेटिक्समध्ये सर्वाधिक ३४ सुवर्णपदके आहेत. जलतरण (२४), कुस्ती (१८), वेटलिफ्टिंग (१६) आणि तिरंदाजी (१०) या खेळांमध्येही दुहेरी अंकी पदके आहेत.

हॉकी आणि फुटबॉल सांघिक स्पर्धा रायपूरमध्ये, ॲथलेटिक्स जगदलपूरमध्ये आणि कुस्ती सुरगुजामध्ये आयोजित केली जाईल.

तिर्की म्हणाले, क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांचीही इच्छा आहे की आपल्या खेळाडूंनी, विशेषतः वनवासी समाजातील खेळाडूंनी, उत्तम कारकीर्द घडवावी, आपले जीवनमान सुधारावे आणि खेळाच्या माध्यमातून देशाचे प्रतिनिधित्व करावे. माझा ठाम विश्वास आहे की प्रत्येक वनवासी मुलाचे एक स्वप्न असते. मी स्वतः एका वनवासी कुटुंबातून आलो आहे आणि खेळामुळे, विशेषतः हॉकीमुळे, मी आज या स्थानापर्यंत पोहोचलो आहे. माझा विश्वास आहे की या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व मुलांचे भविष्य उज्ज्वल आहे. (वृत्तसंस्था)

### अनिमेश कुजूर यांच्याकडून कौतुक

**१०० आणि २०० मीटर धावण्याच्या शर्यतीतील राष्ट्रीय विक्रमवीर अनिमेश कुजूर यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले, देशातील अनेक भागांमध्ये खेळाची संधी मर्यादित आहे, त्यामुळे वनवासी प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा एक उत्तम संधी आहे.**

# लक्ष्य सेन, सात्त्विक-चिराग, सिंधू यांची थॉमस, उबेर चषक अंतिमसाठी निवड





◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**

भारतीय बॅडमिंटन असोसिएशनने २४ एप्रिल ते ३ मे या कालावधीत हॉर्सन्स, डेन्मार्क येथे होणाऱ्या २०२६ थॉमस आणि उबेर कप फायनलसाठी अनुभवी आणि फॉर्ममध्ये असलेल्या तरुण खेळाडूंची निवड केली आहे. यात लक्ष्य सेन, किदाम्बी श्रीकांत आणि सात्त्विक-चिरागचे पुरुष सहकारी खेळाडू आहेत. सिंधू आणि उन्नती हुड्डा महिला संघाचे नेतृत्व करत आहेत.

पुरुष संघाने २०२२ मध्ये भारताचे ऐतिहासिक थॉमस चषक विजेतेपद मिळविलेल्या संघाचे केंद्र कायम राखले आहे. लक्ष्य सेन, किदाम्बी श्रीकांत आणि प्रणॉय यांनी एकेरीमध्ये आघाडी घेतली आहे, तसेच सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या प्रस्थापित दुहेरी जोडीसह युवा शटलर आयुष शेट्टीने सीनियर सर्किटवर सातत्यपूर्ण कामगिरी केल्यानंतर प्रथम क्रमांकाची कमाई केली आहे. महिलांच्या स्पर्धेत, पी. व्ही. सिंधू, गायत्री गोपीचंद आणि त्रिशा जॉली या अव्वल दुहेरी जोडीसह भारताच्या आव्हानाचे नेतृत्व करेल, कारण संघ आपल्या मागील उपांत्य फेरीतील अंतिम फेरीत अधिक चांगल्या प्रकारे उतरण्याचा प्रयत्न करीत आहे. देविका सिहाग, ईशारानी बरुआ आणि किशोरवयीन तन्वी शर्मा यांच्यासह फॉर्मात असलेल्या तरुणांचा एक गट हुड्डासोबत सामील झाला आहे. खेळाडूंची निवड १० मार्चपर्यंतच्या क्रमवारीवर आधारित होती. ज्यामध्ये अव्वल पाच एकेरी खेळाडू आणि अव्वल दोन दुहेरी जोड्यांचा समावेश होता. ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टोसारख्या खेळाडूंनी दुहेरी स्वरूपातील त्यांच्या अनुभवामुळे स्पॉट कमावत असताना सांघिक संयोजन लक्षात घेऊन अतिरिक्त समावेश करण्यात आला.

आमच्याकडे दोन्ही संघांमध्ये युवक आणि अनुभव यांचे चांगले मिश्रण आहे. वरिष्ठ खेळाडू स्थिरता आणतात आणि युवा खेळाडू उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. त्यांनी दाखवून दिले आहे की ते या स्तरावर पोहोचू शकतात, ज्यामुळे आम्हाला स्पर्धेत जाण्याचा आत्मविश्वास मिळतो, असे भारतीय बॅडमिंटन संघटनेचे सरचिटणीस संजय मिश्रा म्हणाले.

पुरुषांच्या संघात एम. आर. अर्जुनचे पुनरागमन देखील आहे. त्याने दुखापतीतून पुनरागमन करत सातत्यपूर्ण निकालांसह, हरिहरन अम्साकरुननसह दुहेरीची क्रमवारी मजबूत केली आहे. ध्रुव कपिला दुहेरीत मदत आणि अनुभव जोडतो तर किरण जॉर्ज एकेरीत सखोलता वाढवतो. महिला संघात, देविकाची निवड या वर्षाच्या सुरुवातीला थायलंड मास्टर्समध्ये तिच्या विजेतेपदानंतर झाली आहे, तर इशारानी ऑर्लिन्स मास्टर्समध्ये उपांत्य फेरीत स्थान मिळवल्यानंतर आहे.

**पुरुष संघ** : लक्ष्य सेन, आयुष शेट्टी, किदाम्बी श्रीकांत, एच. एस. प्रणॉय, किरण जॉर्ज, सात्त्विकसाईराज रँकिरेड्डी, चिराग शेट्टी, हरिहरन अमसाकरुनन, एम.आर. अर्जुन, ध्रुव कपिला.

**महिला संघ** : पी. व्ही. सिंधू, उन्नती हुड्डा, तन्वी शर्मा, देविका सिहाग, ईशारानी बरुआ, त्रिशा जॉली, गायत्री गोपीचंद पुलेला, कविप्रिया सेल्वम, सिमरन सिंघी, तनिषा क्रास्टो. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शस्त्रक्रियेनंतर अधिक सावध : मयंक यादव



**लखनौ** : मी पूर्वी आपल्या शरीराकडे फारसे लक्ष देत नसे, परंतु कारकीर्दीला धोका निर्माण करणाऱ्या दुखापतीनंतर आणि शस्त्रक्रियेनंतर माझ्या विचारसरणीत लक्षणीय बदल झाला आहे, असे भारतीय वेगवान गोलंदाज मयंक यादवने म्हटले आहे. दुखापतीतून सावरत असताना मला वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहसोबत झालेल्या संभाषणाने पुनरागमनासाठी खूप मदत केली. मयंक यादव दुखापतींमुळे अनेक वेळा संघाबाहेर राहिला आहे. आयपीएल २०२४ दरम्यान त्याला मोठा धक्का बसला होता. त्याला दुखापतींचा सामना करावा लागला आणि आयपीएल २०२५ हंगामाच्या सुरुवातीच्या सामन्यांनंतर तो संघाबाहेर गेला होता. आता, बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पुनर्वसन पूर्ण केल्यानंतर, तो लखनौ सुपर जायंट्स संघाकडून इंडियन प्रीमियर लीगमध्ये पुनरागमन करण्यास सज्ज आहे. शस्त्रक्रियेनंतर माझ्यासाठी सर्व काही बदलले आहे. पूर्वी मी स्वतःची काळजी घेत नव्हतो. मी ते टाळायचो आणि अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष करायचो. पण आता मी रिकव्हरी, पोषण आणि झोपेकडे खूप लक्ष देतो. मी एनसीएमध्ये जसप्रीत बुमराहला भेटलो. त्याच्यावरही अशीच शस्त्रक्रिया झाली होती.

### राष्ट्रीय इनडोअर चॅम्पियनशिपची आशियाई खेळांसाठी मदत

**भुवनेश्वर** : धावपटू अनिमेश कुजूर आणि तिहेरी उडीपटू प्रवीण चित्रवेल यांच्यासह अव्वल भारतीय खेळाडूंना आशा आहे की, मंगळवारपासून सुरू झालेली पहिली राष्ट्रीय इनडोअर चॅम्पियनशिप त्यांना या वर्षीच्या आशियाई खेळांसाठी तयारी करण्यास मदत करेल. कुजूरच्या नावावर १०० मीटर आणि २०० मीटर मैदानी स्पर्धांमध्ये राष्ट्रीय विक्रम आहेत. तो ३३ सदस्यीय ओडिशा संघाचा भाग म्हणून इनडोअर स्पर्धेत पदार्पण करत आहे आणि दोन दिवसीय चॅम्पियनशिपमध्ये ६० मीटर शर्यतीत भाग घेणार आहे. तिहेरी उडीतील राष्ट्रीय विक्रमवीर चित्रवेल तामिळनाडूचे प्रतिनिधित्व करेल, परंतु तो लांब उडीत स्पर्धा करेल. २०२५ च्या जागतिक चॅम्पियनशिप (मैदानी) स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचलेला उंच उडीपटू सर्वेश कुशारे हा देखील कलिंगा स्टेडियम संकुलातील अत्याधुनिक इनडोअर सुविधेत आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सुमारे ३०० खेळाडूंमध्ये आहे. या हंगामातील आपल्या पहिल्याच स्पर्धेत भाग घेणारा कुजूर म्हणाला, ही माझी पहिली इनडोअर स्पर्धा आहे आणि ६० मीटरच्या शर्यतीत तुमची क्षमताच महत्त्वाची ठरते.

### पाँटिंगचा खेळाडूंना आत्मविश्वास मिळविण्याचा सल्ला

**नवी दिल्ली** : मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंगने पंजाब किंग्सच्या खेळाडूंना शारीरिक, तांत्रिक आणि मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्याचा आणि गेल्या वर्षीच्या त्यांच्या प्रभावी कामगिरीतून आत्मविश्वास मिळवण्याचा सल्ला दिला आहे. पंजाब किंग्स गेल्या वर्षी एका दशकानंतर आयपीएलच्या अंतिम फेरीत पोहोचला होता, परंतु विजेतेपदाच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून पराभूत झाल्यामुळे आयपीएल विजेता बनण्याचे त्यांचे स्वप्न भंगले. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील संघाने दाखवलेली वर्चस्वपूर्ण खेळण्याची शैली कायम ठेवल्यास, पंजाब किंग्स यावर्षी आयपीएलमधील सर्वांत बलाढ्य संघांपैकी एक बनू शकतो. पाँटिंगने म्हटले की, हा सराव आहे, ही तयारी आहे. ३१ तारखेच्या पहिल्या सामन्यासाठी स्वतःला शारीरिक, तांत्रिक आणि मानसिकदृष्ट्या तयार करणे महत्त्वाचे आहे. पंजाब किंग्स ३१ मार्च रोजी मुल्लानपूर येथे हंगामातील आपल्या पहिल्या सामन्यात गुजरात टायटन्सशी सामना करेल.

### आयपीएल कर्णधारांची आज बैठक

**मुंबई** : इंडियन प्रीमियर लीगच्या १९व्या हंगामाच्या तयारीसाठी, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ बुधवारी येथे सर्व फ्रँचायझी कर्णधारांची एक महत्त्वपूर्ण बैठक घेत आहे. या बैठकीत इम्पॅक्ट सब्स्टिट्यूट नियम आणि आचारसंहिता यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली जाईल. बीसीसीआयसोबत कर्णधारांची ही बैठक एक परंपरा बनली आहे, ज्यामध्ये खेळाडूंना नियम आणि त्यांच्या अंमलबजावणीबद्दल माहिती दिली जाते. यावेळी, सामन्याचे पंच आणि रेफरी पॅनेलचे प्रमुख असलेले भारताचे माजी खेळाडू जवागल श्रीनाथ आणि नितीन मेनन संबोधित करतील.

### केकेआरच्या उपकर्णधारपदी रिंकू सिंग

**कोलकाता** : तीन वेळच्या विजेत्या कोलकाता नाईट रायडर्सने २०२६ च्या आयपीएल हंगामापूर्वी संघ व्यवस्थापनाने तडाखेबंद फलंदाज रिंकू सिंगची उपकर्णधारपदी नियुक्ती केली असून, अजिंक्य रहाणे कर्णधारपदी कायम राहील हे स्पष्ट केले आहे. रिंकूला उपकर्णधारपदी नियुक्त करण्याच्या निर्णयावरून असे दिसते की, फ्रँचायझीने दीर्घकालीन नेतृत्व योजनेसह पुढे वाटचाल केली आहे.

# अजिंक्यपदासाठी भारतीय संघ मालदीवमध्ये

### पहिला सामना पाकिस्तानशी

◆ **माले, २४ मार्च**

भारताचा २० वर्षाखालील पुरुष फुटबॉल संघ सॅफ चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होण्यासाठी येथे पोहोचला असून गुरुवारी पहिला सामना पाकिस्तानशी खेळेल. या सामन्यानंतर भारतीय संघ २८ मार्च रोजी ब गटात बांगलादेशविरुद्ध खेळणार आहे. दोन्ही सामने नॅशनल स्टेडियमवर होतील.

अ गटात मालदीव, श्रीलंका, नेपाळ आणि भूतानचा संघ आहे.



दोन्ही गटांतील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत खेळतील जी १ एप्रिल रोजी होणार आहे. अंतिम सामना ३ एप्रिल रोजी होईल. भारताच्या २० वर्षांखालील मुख्य प्रशिक्षक महेश गवळी म्हणाले, ही एक अतिशय महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची स्पर्धा आहे. सर्व संघ खूप स्पर्धात्मक आहेत आणि आम्हाला आमची सर्वोत्तम कामगिरी करायची आहे.

**भारतीय संघ** : गोलरक्षक : अलसाबित एसटी, प्रणव सुंदरमन, सूरज सिंग

**बचावपटू**: बूंगसन सिंग टी, जोडेरिक ब्रँचेस, करिश सोराम, मलेमांगंबा सिंग थोकचोम, मोहम्मद कैफ, रोशन सिंग थंगजाम, उषम सिंग, याफरेम्बा चिंगाखाम.

**मिडफिल्डर** : अनिकेत यादव, डॅनी मीतेई लैश्राम, गुरनाझ सिंग ग्रेवाल, मोहम्मद अर्बश, ऋषिकांत मेतेई लैश्राम, ऋषी सिंग एन

**फॉरवर्ड** : उमंग दोडूम, प्रशन जाजो, रोहेन सिंग, विशाल यादव, सॅमसन ए, तनबीर डे (वृत्तसंस्था)

# आकाशदीप आणि एडवर्ड्सच्या जागी दुबे आणि पेन

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**

२८ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएल स्पर्धेपूर्वी, कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) यांनी दुखापतग्रस्त आकाश दीप आणि जॅक एडवर्ड्स यांच्या जागी सौरभ दुबे आणि डेव्हिड पेन यांचा संघात समावेश केला आहे.

भारतीय वेगवान गोलंदाज आकाश दीप दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर आहे. तो बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाच्या देखरेखेखाली राहील.

आयपीएलच्या एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, डावखुरा वेगवान गोलंदाज सौरभ केकेआरमध्ये आकाश दीपची जागा घेईल. तो ३० लाख रुपयांना केकेआरमध्ये सामील होईल. विदर्भातील २८ वर्षीय सौरभने अद्याप आयपीएलमध्ये पदार्पण केलेले नाही. तो यापूर्वी एसआरएच संघाचा भाग होता.

### कर्मवीर महाविद्यालयाच्या दोघींची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड





**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.२४ मार्च -**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयातील चंद्रिका बाबर (बी.एस्सी. भाग ३) आणि निर्जला माळी (बी.एस्सी. भाग ३) या विद्यार्थिनींनी आंतर विद्यापीठ राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पंजाब येथील लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी येथे होणाऱ्या स्पर्धेत त्या भाग घेतील. या विद्यार्थिनींनी आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविल्यामुळे त्यांची ही निवड झाली. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले व मनोज प्रा. मनोज खपाले यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.





# ऑर्किड अभियांत्रिकीमध्ये स्मॅशचा जल्लोष

## आठ क्रीडा प्रकारांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

प्रज्ञा निकेतन संस्था संचलित एन. के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय येथे स्मॅश वार्षिक क्रीडा महोत्सवास जल्लोषात सुरुवात झाली.

याचे उद्घाटन प्राचार्य डॉ.बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ श्रीनिवास मेतन, उपप्राचार्य डॉ विनायक पत्की यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. क्रीडा मार्गदर्शक प्रा सचिन गायकवाड यांनी खेळाडूना क्रीडा शपथ दिली. यावेळी ट्रेनिंग प्लेसमेंटचे प्रमुख डॉ. आर. आर. पाटील, क्रीडा समन्वयक प्रा. जामदार, प्रा. ऋचा श्रीराम, विभाग प्रमुख प्रा. डॉ. जाधव संतोष, प्रा डॉ. विपुल बाक, प्रा. डॉ सतीश मोरे, प्रा. सूर्याजी काळे, प्रा डॉ मिथुन पाटील, प्रा. एस. एस. धोत्रे, आर अँडडी, डॉ. श्रीकांत जहागिरदार, इन्फ्रा हेड प्रा गिरीश कुलकर्णी, रजिस्टर एस. एस. शेळके, विद्यार्थी क्रीडा सचिव ओम गुंजाळ, सहसचिव प्रतीक डांगे, सौरभ पांढरभिसे, शेजल पवार उपस्थित होते

यावेळी तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात आठ खेळ होणार आहेत. ४५० विद्यार्थी खेळाडूंनी गणवेशात आपल्या विभागाचा ध्वज घेऊन विभागप्रमुखासह मार्च पास करत अतिथींना मानवंदना दिली. आंतर विद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेत यशस्वी व सहभागी खेळाडूंनी ब्लेझर मध्ये मशाल घेऊन मैदानात दौड करत अतिथींना प्रदान केली. प्रा यू के जाधव यांनी समालोचन केली.

यावेळी फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ, टेबल टेनिस, बास्केटबॉल टग ऑफ वॉर, डॉजबॉल, क्रिकेट या क्रीडा प्रकारात टर्फ ग्राउंडवर मुले व मुलींनी सहभाग नोंदवला.

या स्पर्धा पार पडण्यासाठी प्रा. विजय सांगोलगी, प्रा. सालीमठ, प्रा. तेग्पी, प्रा. भुयार, प्रा. नेवाळे, प्रा. धनशेट्टी, प्रमोद लिगाडे, सचिन मोरे, महेश गोटे, रेवण पवार यांचेसह शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभत आहे.

# आत्मविश्वासामुळे वातावरण शांत राखण्यास मदत

## शुभमन गिलचे मत

◆ **अहमदाबाद, २४ मार्च**

मी जो शांत आणि संयमी स्वभाव दाखवतो, तो माझ्या आत्मविश्वासामुळे आणि संघात मला जाणवणाऱ्या सुरक्षित व आत्मविश्वासपूर्ण वातावरणामुळे आहे, असे मत इंडियन प्रीमियर लीगच्या आधी, गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलने व्यक्त केले.



टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघात नसलेला गिल, आता गुजरात टायटन्सकडून टी-२० क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. हा संघ २०२२ चा विजेता आणि २०२३ चा उपविजेता असून, आपल्या एकमेव विजेतेपदात आणखी एका विजेतेपदाची भर घालण्यास उत्सुक असेल.

मी फक्त स्वतःसारखाच वागत आहे आणि माझ्या खेळात व माझ्या संघात असलेला आत्मविश्वास आणि सुरक्षितता मला शांतता राखण्यास मदत करते, असे गिलने सांगितले.

गुजरात टायटन्स आपल्या मोहिमेची सुरुवात ३१ मार्च रोजी गेल्या वर्षीच्या उपविजेत्या पंजाब किंग्सविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर करेल. गिल म्हणाला, कोणत्याही परिस्थितीत शांत राहिल्याने तुम्हाला एक व्यापक दृष्टिकोन मिळतो. तुम्ही वर्तमानापलीकडे पाहू शकता. हीच शांतता संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि भारताचे माजी वेगवान गोलंदाज आशिष नेहरा यांचीही सर्वांत मोठी ताकद असल्याचे गिलने सांगितले.

गेल्या हंगामात गुजरात टायटन्स संघ एलिमिनेटरमध्ये मुंबई इंडियन्सकडून पराभूत झाला होता. नेहरा म्हणाले की, यावेळी संपूर्ण लक्ष केवळ विजेतेपद जिंकण्यावरच असले पाहिजे. या हंगामात वेगळा विचार करण्याची गरज नाही. खरं तर, मला विचार करण्याची गरज नाही; खेळाडूंना आहे. त्यांना खेळायचे आहे, मी बाहेर बसणार आहे. आमचा विचार पहिल्या दिवसापासून स्पष्ट आहे. आम्ही इथे जिंकण्यासाठी आलो आहोत, केवळ सहभागी होण्यासाठी नाही. नवीन संघाला वेळ लागेल असा विचार करणे सोपे असते, पण आमचा दृष्टिकोन कधीच तसा नव्हता. हा विश्वास केवळ माझा नाही, तर संपूर्ण संघाचा आहे. (वृत्तसंस्था)

# आयएमएस समर्थ, रॉयल्स संघाची विजयी सलामी

## इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग-१६ स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग-१६ स्पर्धेत आयएमएस समर्थ व रॉयल्स संघाने विजयी सलामी दिली. येथील रेल्वे मैदानावर झालेल्या सलामीच्या सामन्यात आयएमएस समर्थ ११ संघाने विशाल संघावर २४ धावांनी मात केली. समर्थ संघाने १२ षटकात ४ बाद १२८ धावा केल्या. प्रतिउतोरात विशाल संघास १२ षटकात ६ बाद १०४ धावाच करता आल्या. सामनावीर इम्तियाज अत्तार ठरला.

दुसरा सामन्यात रॉयल्स या संघाने शिवशंभू संघावर ७ गडी राखून विजय मिळविला. शिवशंभू संघाने १२ षटकात ७ बाद ६६ धावा केल्या. विजयी लक्ष्य रॉयल्स संघाने ८.४ षटकात ३ बाद ६९ धावा करीत गाठले. बालाजी बोल्ली सामन्याचा मानकरी ठरला.

श्री अरुणोदय मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्रायोजित केलेली ही स्पर्धा ११ एप्रिल पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम, रेल्वे मैदान येथे होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन ग्रामीण पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, इंडियन मॉडेल स्कूलचे सचिव अमोल जोशी, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर अचिंत कुमार, मॅनेजर रिशू कुमार, सुरेखा काटगांव,



व्यंकेटेश पटवारी स्पर्धा समितीचे अध्यक्ष शरणप्पा पासोडी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या स्पर्धेचे हे १६ वे वर्ष असून १५ संघ १९५ पालक खेळाडू सहभागी आहेत. या स्पर्धा रात्रीच्या प्रकाश झोतात लेदर बॉलवर १२ षटकांमध्ये खेळल्या जातील. उपांत्य फेरीतील व अंतिम फेरीतील सामने १५ षटकांचे राहतील. या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण विविध रंगातील गणवेश धारण केलेले खेळाडू, एल. ई. डी बेल्स आधुनिक ॲपच्या माध्यमातून स्कोअरिंग ही या स्पर्धेची वैशिष्ट्ये आहेत. या स्पर्धेतील विजयी व उपविजयी संघास अनुक्रमे १५ व ११ हजार रुपयाचे पारितोषिक व चषक देण्यात येणार आहे. या स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, यष्टीरक्षक व मालिकावीर तसेच प्रत्येक सामन्यातील सामनावीरांना स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमप्रसंगी स्पर्धा आयोजन समिती सदस्य राजकिरण वडनाल, प्रितीश कुलकर्णी, अहमद शेख, सुधांशु भालेराव, हाजी तांबोळी, डॉ. सातपुते, राघवेंद्र जोशी, गणेश जाधव, सोनू केसवाणी, महादेव वरळे, विशाल गायकवाड, शंकर गुरव, अमित काबणे, सुगंधराज कुलकर्णी, अजित डोंगरकर, सैपन शेख आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव वरळे यांनी केले. विशाल गायकवाड यांनी आभार मानले. या स्पर्धा यशस्वी करण्याकरिता सचिन ढवाण, अक्षय माने, राजकुमार माने, अजय चाबुकस्वार, प्रमोद म्हेत्रे हे परिश्रम घेत आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/





# महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिल निवडणूक शांततेत

## सोलापूर जिल्ह्यात उत्स्फूर्त मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या प्रतिष्ठेच्या निवडणुकीची प्रक्रिया आज शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शहरासह ग्रामीण भागातील वकील बांधवांनी मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला. विविध तालुक्यांमध्ये चांगल्या प्रतिसादासह मतदान झाले.

मिळालेली अधिकृत आकडेवारी अशी की, बार्शी येथे ५५० पैकी ३७२, मोहोळ येथे १९५ पैकी १२६, माढा येथे ३८५ पैकी २४८, पंढरपूर येथे ७५० पैकी ५५३, माळशिरस येथे ५४५ पैकी ३६१, सांगोला येथे २८८ पैकी २१२, मंगळवेढा येथे १७९ पैकी ११८, अक्कलकोट येथे ७६ पैकी ४४, करमाळा येथे २०८ पैकी १४०, तर सोलापूर येथे २४४५ पैकी १५९५ वकिलांनी मतदान केले.

एकूणच, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडली असून कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. मतदानाच्या टक्केवारीवरून यंदा वकील वर्गामध्ये निवडणुकीबाबत विशेष उत्सुकता दिसून आली.

# वेळापूरात श्री अर्धनारी नटेश्वर यात्रा उत्सवाची तयारी

**धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांनी रंगणार यात्रा; भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण**

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. २४ मार्च-**

वेळापूर नगरीचे आराध्य दैवत श्री अर्धनारी नटेश्वर यांच्या यात्रा उत्सवाची तयारी आमदार उत्तमराव जानकर, पंचायत समिती सदस्या सौ विमलताई उत्तमराव जानकर, जि.प.सदस्या सौ मीनाक्षी मिलिंद सरतापे यांच्या मार्गदर्शनाखाली अंतिम टप्प्यात आली असून गावात सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यात्रा कमिटी, ग्रामपंचायत तसेच ग्राम स्थांच्या सहकार्याने हा उत्सव धार्मिक विधी, विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येणार आहे.

बुधवार, २५ मार्च रोजी मध्यरात्री १२ वाजता श्रींचा शाही विवाह सोहळा संपन्न होणार असून या निमित्ताने सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, २ एप्रिल रोजी मध्यरात्री १२ वाजता श्रींचा साडे वाजत व पालखी सोहळा पार पडणार आहे. सायंकाळी ११ ते पहाटे १ वाजेपर्यंत साड्यांचा कार्यक्रम व आकर्षक दारूकामाची आतषबाजी होणार



असून भाविकांसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार आहे. यात्रेनिमित्त विविध स्पर्धा व मनोरंजनपर कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. ३ एप्रिल रोजी आमदार उत्तमराव जानकर यांच्या वतीने दिवसभर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले आहे तसेच ३ एप्रिल रोजी शुक्रवारी गजी ढोल कार्यक्रम होणार आहे.

शनिवार, ४ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता महादेव मंदिर येथे सवंद्यावाद्य स्पर्धा होणार आहे. रविवार, ५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता बाजार तळ, ज्योतिबा मंदिर येथे महिलांसाठी 'होम मिनिस्टर' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच सोमवार, ६ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता पालखी मैदान येथे श्वान शर्यत होणार आहे. यात्रेची सांगता मंगळवार, ७ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता बाजार तळ येथे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असून मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकारांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम रंगणार आहे.

या यात्रा उत्सवात भाविकांनी सहभागी होऊन कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, ग्रामपंचायत सर्व सदस्य, यात्रा कमिटी अध्यक्ष काशिनाथ आडत उपाध्यक्ष एडवोकेट विठ्ठल मंडले उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, सेक्रेटरी विजय पवार, सदस्य मनोहर माने, ग्रामस्थ आदींनी केले आहे.



# 'बीग्सी'चा कार्तिक कोथलकर आंतरराष्ट्रीय पातळीवर अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी कार्तिक कोथलकरने आंतरराष्ट्रीय पातळीवर अव्वल कामगिरी केली आहे.

लंडन येथील रिव्हरसाइड अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय हॅकथॉन २०२६ या २४ तासांच्या ऑनलाइन जागतिक स्पर्धेत कार्तिकने अव्वल क्रमांक पटकाविला. ही स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने झाली. कार्तिकने सादर केलेला K-Reducer Pro - An AI-Integrated Image Compression application हा प्रकल्प उत्कृष्ट तांत्रिक अंमलबजावणी आणि प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांच्या विशेष लक्षात आला. या यशामध्ये विभागप्रमुख प्रा. आनंद ग्यानबोटे यांचे मार्गदर्शन, तांत्रिक सहाय्य लाभले. त्याचे संस्थेचे चेअरमन इंजी. रवींद्र गायकवाड सेक्रेटरी अनामिका आर. गाायकवाड व प्राचार्य डॉ. अनिल के. देशमाने यांनी अभिनंदन केले.

## महत्वाचे...

### बेकायदेशीर कोठडीमुळे उच्च न्यायालयाचे तत्काळ सुटकेचे आदेश

**सोलापूर सायबर फसवणूक प्रकरण**

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

सिद्धेश्वर साखर कारखान्याचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक पाटील यांच्या पत्नीची २०२४ मध्ये शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल ६२ लाख ६५ हजारांची फसवणूक करण्यात आली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी परदेशातून ऑनलाइन फसवणूक करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणात आरोपी ग्लेन (अल्बर्ट) पर्सी सिक्केरा (वय ४७, रा. कासा बेला फेज १, पलावा सिटी, डोंबिवली, कल्याण-ठाणे) याच्याविरुद्ध लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली होती. तो ७ फेब्रुवारी रोजी अहमदाबाद विमानतळावर उतरल्यावर पोलिसांनी त्याला अटक केली. मात्र, अटकेनंतर त्याला ९ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयासमोर हजर न करता पोलिस कोठडीत ठेवण्यात आल्याचे समोर आले. तपासात उघड झाले की, आरोपी ग्लेन हा २०२२ पासून लाओस येथे वास्तव्यास होता. तेथे त्याने काही चायनीज फसवणूकदारांच्या साथीने आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑनलाइन फसवणुकीचे जाळे उभारले होते. विविध देशांतील युवकांना 'ऑफिस बॉय' किंवा 'संगणक डेटा एंट्री' नोकरीचे आमिष दाखवून बोलावले जाई. मात्र, तेथे पोहोचल्यानंतर त्यांच्या पासपोर्टची जप्ती करून त्यांना जबरदस्तीने ऑनलाइन फसवणूक करण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप आहे. या आरोपीविरुद्ध सोलापूर सायबर पोलिसांकडे २२ ऑनलाइन तक्रारी दाखल झाल्या आहेत. पोलिसांनी त्याला यापूर्वी नोटीस बजावली होती; मात्र तो सुमारे अडीच वर्षे तपासास हजर झाला नव्हता. १० फेब्रुवारी रोजी आरोपीला येथील कनिष्ठ न्यायालयात हजर करण्यात आले. त्या वेळी आरोपीच्या वतीने ॲड ओंकार पाटील यांनी अटक बेकायदेशीर असल्याचा युक्तिवाद करण्यात आला; मात्र न्यायालयाने तो अर्ज फेटाळून लावला. त्यानंतर आरोपीच्या वकिलांनी या आदेशाविरुद्ध उच्च न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठासमोर दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणीदरम्यान, आरोपीला २४ तासांपेक्षा अधिक काळ बेकायदेशीरपणे कोठडीत ठेवण्यात आल्याचा मुद्दा मांडण्यात आला. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत, अटकेची प्रक्रिया चुकीची असल्याचे नमूद केले तसेच आरोपीच्या घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट केले. परिणामी, आरोपीची कोठडी बेकायदेशीर ठरवून त्याला तत्काळ मुक्त करण्याचे आदेश सोलापूर सायबर पोलिसांना देण्यात आले.या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. सुनिता खंडाळे सालसिंगीकर, ॲड. ओंकार पाटील यांनी तर उच्च न्यायालयात ॲड. प्रवीण फळदेसाई आणि ॲड. नेहा देशपांडे यांनी बाजू मांडली.

### 'त्या' घरफोडीतील चोरटे वाहनातून आल्याचा पोलिसांचा अंदाज

**मंगळवेढा, दि. २४ मार्च-**

दामाजीनगर हद्दीतील त्या घरफोडी प्रकरणातील चोरट्यांचा डम डाटा पोलीसांनी तपासणीसाठी वरिष्ठ कार्यालयास पाठविला आहे. दरम्यान चोरटे हे चोरी करुन सोलापूर हायवे रोडकडे गेल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले. या घटनेची हकीकत अशी,यातील फिर्यादी अश्विनी राजेंद्र हजारे (वय३२ वर्षे) ह्या कारखाना रोडवरील दामाजीनगर हद्दीत रहावयास असून दि.१७ मार्च रोजी रात्री २.१५ च्या दरम्यान अनोळखी तीन चोरटे फिर्यादीच्या राहत्या घराचा किचनचा आतून बंद असलेला दरवाजा बाहेरुन जोराने ढकलून त्याची कडीकोयंडा तोडून घरामध्ये प्रवेश केला फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा शिवाजी याला चाकूचा धाक दाखवून फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याचे दागिने व कपाटातील रोख रक्कम, चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ६ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरुन नेला होता. याचा तपास पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे हे करीत असून त्यांनी येथील डमडाटा संकलीत करुन सोलापूर येथे पाठविल्याचे सांगण्यात आले. तसेच चोरट्यांचा मागोवा काढण्यासाठी सोलापूरातून डॉग पथक मागविण्यात आले होते. मात्र कुटूंबियांनी तेथील साहित्याला स्पर्श केल्यामुळे डॉगला वास व्यवस्थित न मिळाल्यामुळे डॉग तिथेच घुटमळत राहिल्याचे सांगण्यात आले. चोरटे हे वाहनातून आल्याचा पोलीसांचा कयास असून ते सोलापूर हायवे मार्गाकडे गेल्याचे तपासात आढळून आल्याचे सांगीतले. चोरट्यांना कुटूंबियांना चाकूचा धाक दाखवून जबरी चोरी केल्यामुळे या परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे.

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME - ASHPAK SAIPAN SHAIKH HAS BEEN CHANGED TO NEW NAME - ASHAPAK SAIPAN SHAIKH KINDLYE NOTE THE SAME.



# वाघमारे कुटुंबाकडून श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा उत्साहात

**सोलापूर :** उद्धव नगर भाग- दोन परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी २० मार्च रोजी श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा पार पडला. या कार्यक्रम सोहळ्यात प्रथमत श्रीस्वामीच्या मूर्ती व पादुका अभिषेक करण्यात आले. हालचिंचोली व दिंडूर भजनी मंडळ यांचे कीर्तन व भारूड कार्यक्रम, स्वामींची महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास सुरेश हसापुरे, राजशेखर बिराजदार, दीपक जमादार, महेश देवकर, शिवाजी पाटील, धर्मपाल सांगळे व इतर मान्यवरांची उपस्थिती लाभले.संपूर्ण नियोजन प्रभाकर व महानंदा वाघमारे यांनी केले.

# रेशन दुकानातून एप्रिल, मे अन् जूनचे एकत्रच मिळणार मोफत धान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

आधीच इराण युद्धामुळे गॅस सिलिंडर महाग झाला आणि घरातल्या चुली पेटल्या. महागाईचा भडका उडाला असताना आता सर्वसामान्य लोकांना दिलासा देणारी एक बातमी आहे. केंद्र सरकारने रेशनबाबत एक महत्त्वाची अपडेट दिली आहे. ज्यांच्या घरात रेशनचं धान्य येतं त्यांना तीन महिन्यांचं धान्य एकत्र मिळणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली.

सरकारच्या या निर्णयामुळे कोट्यवधी कुटुंबाना मोठा दिलासा मिळणार आहे. दर महिन्याला रेशन दुकानावर जाणं, तिथं रांगेत उभं राहून रेशन भरण्याची कटकट आता संपणार आहे. शिवाय महागाईत रेशनवर मिळालेलं



धान्य म्हणजे सर्वात मोठा आधार मिळेल.

एप्रिल २०२६ मध्ये रेशन कार्डधारकांना दिलासा देत, केंद्र सरकारने तीन महिन्यांचे धान्य (गहू, तांदूळ) एकाच वेळी (एप्रिल मध्ये) उचलण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पावसाळा आणि पूरपरिस्थिती विचारात घेऊन, लाभार्थ्यांना वारंवार रेशन दुकानात जावे लागू नये, यासाठी हा आगाऊ धान्य वितरणाचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. सरकारच्या या निर्णयामुळे मजुरीवर जाणाऱ्यांना फायदा होणार आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना, जिथे रेशन दुकान घरापासून खूप लांब आहे, त्यांच्यासाठी ही सर्वात मोठी सोय असेल. एप्रिल २०२६ च्या रेशन वाटपात, ३० तारखेपर्यंत हे वितरण पूर्ण करण्याचे आदेश आहेत. रेशन कार्डधारकांनी ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे.

**प्रति कार्ड मिळणार ३ लिटर रॉकेल**

गॅस टंचाईवर मात करण्यासाठी शासनाकडून पुन्हा रॉकेल वितरणाचा विषय समोर आला आहे. प्रति कार्ड ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. रॉकेल लवकरच प्राप्त होणार असून, ग्रामीण भागात त्यानुसार सर्व निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांची बैठक घेऊन सूचना केलेल्या आहेत. रॉकेल वितरण ऑफ लाईन पध्दतीने होणार आहे.

# कृषी धान्य महोत्सवात मंद्रूपचा हुरडा तेजीत

## महोत्सवाचा आज शेवटचा दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत आयोजित जिल्हा कृषी धान्य महोत्सवात मंद्रुपच्या हुरड्याने चांगलाच भाव खाल्ला असून, या हुरड्याची चांगलीच उलाढाल झाली.

कृषी विभागातर्फे हुतात्मा स्मृती मंदिरात कृषी धान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्यात मंद्रूपच्या मळसिद्ध कोकळगी यांना हुरड्याचा स्टॉल मिळाला आहे. कृषी विभागाने महोत्सवाच्या उद्घाटनाच्या सत्रातच उपस्थित पाहुण्यांना हुरड्याचा आस्वाद दिला. यंदा अति पावसामुळे रब्बी हंगाम लांबल्यामुळे हुरडा उशिरापर्यंत टिकून आहे. दक्षिण सोलापुरातील



मंद्रूप, अकोले मंद्रूप, कंदलगाव मोहोळ तालुक्यातील कामती परिसरात हुरड्याचे प्लॉट शेतकऱ्यांनी तयार केले आहेत.

मंद्रूप येथील मळसिद्ध कोकळगी यांनी गेल्या तीन वर्षापासून हुरड्याचे मार्केटिंग केले आहे. त्यामुळे कृषी विभागाने या महोत्सवात कोकळगी यांना हुरड्याचा स्टॉल लावण्याची संधी दिली. या महोत्सवाला येणाऱ्या पाहुण्यांना हुरड्याचा आस्वाद दिला. पहिल्याच दिवशी सुमारे दोन क्विंटल हुरड्याची विक्री झाली. २०० ते २५० रुपये किलोने हुरड्याची विक्री झाली. उपस्थित लोकांनी कोकळगी यांच्या स्टॉलला चांगली पसंती दिल्याबद्दल कृषी विभागातर्फे प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. उद्घाटनानंतर लगेच हुरडा संपला. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशीही हुरड्याला लोकांनी चांगलीच मागणी नोंदवली. या महोत्सवात सेंद्रिय गुळ, काकवी, गुळाचा चहा, मंगळवेढ्याची प्रसिद्ध ज्वारी, हुरडा, जांभूळ कुल्फी, ज्वारीचे बिस्किटे, केळी, शेवगा पावडर, मध, वाळवन पदार्थ, वाळवलेला भाजीपाला, मल्टीमीलेट आटा, ज्वारी व बाजरीची कडक भाकरी, शेंगाची चटणी, खारोटे, बार्शीचा शाळू, काळी कुसळी सोना मोती गहू, घाण्यावरील करडई तेल, हळद, शेवया खीर, कच्च्या केळांची पावडर, गुलकंद आवळा कोरफड, मोरावळ, सेंधव मीठ आदी खाद्यपदार्थाचे स्टॉल मांडण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना लागणारे टोकन यंत्रही मांडण्यात आली आहेत.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

शहर सोलापूर येथील तमाम जनतेस विशेषतः शहर सोलापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डिव सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. २३१ यांसी नवीन सर्व्हे नं. २७/२/२अ याचे क्षेत्र १२०० चौरस फुट इतकी आहे. यापूर्वी दि. ३१/१२/१९९९ रोजी जागेचे मुळ मालक महादेव बाबुराव परळकर यांनी कुलमुखत्यार धारक म्हणून श्री. पांडूरंग रेवण्या परळकर यांना सदर वर नमूद सर्व्हे नंबर मधील ३ हे. ४ आर या जागेबाबत सर्व कामे करण्याकरिता म्हणजे दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल करणे, जागेबाबत खरेदी विक्री करणे, वकील नेमणे वकील फी भरणे, वकीलपत्रावर सह्या करणे, कोर्टाचा निकाल लागलेला असेल तर वरच्या कोर्टात अपिल करणे हि सर्व कामे करण्याकरिता महादेव बाबुराव परळकर यांनी पांडूरंग रेवप्पा परळकर यांनी सोलापूर येथील दुय्यम निबंधक कार्यालय सोलापूर उत्तर येथे रजि. क्र. सांक्षा ३०२/९९ अन्वये दि. ३१/१२/१९९९ रोजी दोन साक्षीदारांसमवेत दिलेला होता व आहे. त्यानंतर यातील आमचे अशिल श्री. दत्तात्रय विठ्ठल गज्जम यांना वर नमूद सर्व्हे नंबर मधील प्लॉट नं. ३२६ पूर्व पश्चिम २० फुट दक्षिण-उत्तर ६० फुट असे एकूण १२०० चौ. फुट ५ रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर दि. १६/०३/१९८४ रोजी श्री. आशाप्पा व्यंकप्पा करली यांनी रक्कम रू.२५१/- घेऊन आमच्या अशिलास सभासद करून घेतलेले आहे. त्यानंतर सदर सर्व्हे नंबरचे कुलमुखत्यारधारक पांडूरंग रेवप्पा परळकर यांनी आशाप्पा व्यंकप्पा करली यांना सदर नियोजीत निलम श्रमजीवी नगर गृहनिर्माण सहकारी सोसायटीची प्रमोटर म्हणून नेमणूक केलेले आहे. त्यानंतर यातील पांडूरंग रेवप्पा परळकर हे आमच्या अशिलास सदर वर नमूद जागेचे रजि. खरेदीखत देण्यास मान्य व कबुल केलेले आहे. वरील नमूद मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याने व तसेच सदर वर नमूद मिळकतीचे मालकांनी तसा विश्वास दाखविल्याने आमचे अशिल दत्तात्रय विठ्ठल गज्जम यांनी वरील मिळकत मजरेवाडी सोलापूर हि मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे सदरील मिळकतीवर इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ४ (चार) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे दिनांक २४/०३/२०२६.

सही/-
अशिल
दत्तात्रय विठ्ठल गज्जम

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. नितीन नागनाथ लोंढे
बी.ए., एम.एस.डब्ल्यु., एलएल.बी.,
प्लॉट नं. २८, राघवेंद्र नगर,
एम.आय.डी.सी. सोलापूर
मो.नं. ९७६४४१०९२१

**जाहीर नोटीस/समन्स**

कि. दि. अर्ज नं १६/२०२५
पुढिल नेमलेली तारीख १६/०४/२०२६
नि. २१

**बार्शी येथील मे. सि. ज. सि. डि. साहेब, यांचे कोर्टात**

१) **साखरबाई उर्फ साळू पोपट साळुंके,**
धंदा घरकाम, रा. कुई, ता. माढा, जि. सोलापूर
२) **मनिषा उर्फ मनु विकास ढाणे,**
वय - ३८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर
३) **रावसाहेब अक्रूर यादव, (मयत वारस)**
**३-अ) लक्ष्मी रावसाहेब यादव,**
वय - ३२, धंदा - घरकाम,
रा. करंबा, दक्षिण सोलापूर
**३-ब) पायल रावसाहेब यादव,**
वय - ९, धंदा - काही नाही
अपाक आई लक्ष्मी रावसाहेब यादव
— **अर्जदार**

विरूध्द

१) **संगीता वैजीनाथ शिंदे,**
वय - ५५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **केशरबाई अक्रूर यादव**
वय - ७५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर
३) **शोभा अक्रूर यादव**
वय - ६५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर
— **सामनेवाला**

ज्याअर्थी, सदर प्रकरणी यातील अर्जदार यांनी सा.वालाविरुध्द अक्रूर रावसाहेब यादव यांचे पश्चात अर्जदार नं. ३ रावसाहेब अक्रूर यादव यांचे पश्चात अर्जदार नं. १ ते ३ (ब) व सा.वाला नं. १ ते ३ हे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारसप्रमाणपत्र मिळावे म्हणून वारसप्रमाणपत्र मिळणेचा अर्ज दाखल केलेला आहे. यातील सा.वाला नं. ३ शोभा अक्रूर यादव यांना वरील पत्त्यावर म्हणजेच रा. नारी ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणावर अनेकवेळा समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. प्रतिवादी नं. ३ हे, सदर पत्त्यावर आढळून येत नाही व सदर सा.वाला नं. ३ ही कोठे राहत आहे हे माहिती नाही. तसेच प्रतिवादी नं. ३ हिचा कायमचा पत्ता वरील पत्याशिवाय अर्जदाराकडे नाही.

त्या अर्थी तरी सा.वाला नं. ३ शोभा अक्रूर यादव यांना या जाहीर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की, हि जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अथवा पुढील नेमलेली तारीख दि. १६/०४/२०२६ रोजी नेमलेल्या तारखेस सदर अर्जात सा.वाला नं. ३ त्याचे प्रतिनिधी अथवा जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता अर्जात हजर करावा.

वरील प्रमाणे. सा.वाला नं. ३ शोभा अक्रूर यादव, यांनी सदर अर्जात हजर न झाल्यास अर्जदार यांच्या अर्जातील मागणीप्रमाणे सा.वाला नं. ३ यांचे विरोधात अर्जदारांच्या हक्कात सदर अर्जाचा हुकूम होईल. कळावे याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस/समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. १७/०३/२०२६

सही/-
कनिष्ट लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक,
दिवाणी न्यायालय व. स्तर बार्शी

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**शुध्दिपत्रक**

**'सोलापूर तरुण भारत'** (मराठी) वृत्तपत्राच्या **सोलापूर आवृत्तीमध्ये दिनांक २४/०३/२०२६** रोजी प्रकाशित झालेल्या, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**च्या आर्थिक मालमत्तेचे प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम २००२ च्या कलम १३(२) अन्वयेच्या सूचनेच्या जाहिरातीच्या संदर्भातः सर्व वाचकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, सदर सूचनेच्या जाहिरातीमध्ये अनुक्रमांक १ (कर्ज खाते क्रमांक १३२६९२९०४) अंतर्गत, नावांचा उल्लेख चुकीने **१. अशोक निवृत्ती पाखरे, २. शैला अशोक पाखरे असा करण्यात आला आहे; वास्तविक तो १. आबासो सदाशिव मुडे, २. संगीता सदाशिव मुडे, ३. सदाशिव शामराव मुडे, ४. शिवाजी शामराव मुडे** असा असणे आवश्यक होते.

सूचनेमधील इतर सर्व मजकूर यथावत (कोणताही बदल न करता) राहील.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)

दिनांक : 25/03/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर**
द्वारा नटराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर
**ताबा नोटीस - नमुना 'Z' नोटीस**
म.स.सं. नियम १९६० मधील नियम १०७ (११) ड-१

**स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा (Symbolic) घेतल्या बाबतची नोटीस**

भी खाली सही करणार वसूली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर द्वारा **नटराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोनापूर** ज्याअर्थी मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६० कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर यांच्या कडून प्राप्त झालेला कलम १०१ च्या दाखल्यानुसार खालील नमूद कर्जदार / जामीनदारास नियमानुसार मागणी व जप्ती नोटीस पाठवून त्यांच्या राहत्या घरी जाऊन जंगम मालमत्तेचा निरंक पंचनामा केलेला आहे. त्यानंतर त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचा १०७ (१०) नुसार जप्ती आदेश देलेला आहे. संस्थेकडे गहाणखत / जप्त असणारी / जप्त केलेली स्थावर मालमत्ता नियम १०७ चे (नियम ११ ड १) नुसार नमुना 'झेड' नोटीस देऊन सदरील मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसीद्वारे सावध करण्यात येते कि, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी, विक्री, गहाण-दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करु नये. या उपर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो **नटराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर** यांचे खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज व वसुली खर्चास कायदेशीररीत्या अधीन रहावे लागेल याची नोंद घ्यावी. त्याची खालील नमूद स्थावर मालमत्ता तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृष्ण किड्स वेअर प्रो.प्रा. जयवंत वसंतराव कोरे यांचे हिस्सा पुरते | १०१/८२/२०२४ | मौजे - नेहरु नगर, ता. उ.सोलापूर, जि. सोलापूर | ७/१ पैकी | १,९८,८८७/- |

ही उद्‌घोषणा प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत आपली थकबाकी, त्यावरील पुढील होणारे व्याज व इतर खर्चासह थकबाकी रक्कम संस्थेकडे भरणा करून त्याची रितसर पावती घेऊन तसेच कर्ज खाते बेबाक प्रमाणपत्र घ्यावे अन्यथा कायद्यातील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केली जाईल, म्हणजेच आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा / कब्जा पत्यक्ष घेण्यासाठी मा. जिल्हादंडाधिकारी साहेब तथा मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे रितसर प्रकरण दाखल करून व पुढील योग्ताय ती कारादेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**ताबा / कब्जा घेतल्याची नमुना 'झेड' नोटीस प्रसिध्द केली.**
**हि नोटीस दिनी दिनांकः २३/०३/२०२६**

शिक्का

स्वाक्षरीत/-
एन.ए.एकबोटे
वसूली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी
सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर
द्वारा - योगीनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

महापालिका अंदाजपत्रक विभागनिहाय आढावा बैठक

# आरोग्य विभागात डॉक्टरांची वानवा, बंद अवस्थेतील घंटागाड्या

## मंडई, कोंडवाडा, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन विभागांचा लेखाजोखा

## कचऱ्यांची समस्या गंभीर; हद्दवाढ भागात नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

महापालिकेच्या अंदाजपत्रकाच्या नियोजनासाठी आयोजित विभागनिहाय आढावा बैठकीत आज मंडई, कोंडवाडा आणि आरोग्य अन् घनकचरा व्यवस्थापन विभागांचा लेखाजोखा मांडण्यात आला. आरोग्य विभागात डॉक्टरांची वानवा आहे. बंद अवस्थेतील घंटागाड्यांमुळे कचरा साचून राहत आहे. हद्दवाढ भागातील घंटागाड्या मिनिटाला बंद पडतात. याकडे नगरसेवकांनी लक्ष वेधले.



या बैठकीस महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्यासह नगरसेवक, नगरसेविकांची उपस्थिती होती. महापालिकेच्या आरोग्य विभागामध्ये प्रसुतीगृहात औषधे नाहीत. ॲम्बुलन्स सेवाही उपलब्ध केली जात नाही. पाच कोटीचा निधी पोर्टा केबिनसाठी मिळाला. मात्र या केबिन जिथे आवश्यकता आहे त्या ठिकाणी न बसवता आरोग्य केंद्र असलेल्या परिसरातच बसवण्यात आल्या आहेत. केवळ निधी खर्च घालण्याचा प्रयत्न झाला असल्याचा आरोप करण्यात आला.

वास्तविक पाहता या केबिन झोपडपट्टी परिसरात लावणे आवश्यक आहे मात्र जिथे दवाखाने आहेत त्याच ठिकाणी विनाकारण गुंतवण्यात आले आहेत. शहरात एका ठिकाणी दवाखान्यासाठी जागा देणगीपोटी दिली असतानाही त्याठिकाणी दवाखाना अद्याप सुरु केला नाही. महापालिका दवाखाना आणि प्रसुतीगृहामध्ये आवश्यकतेनुसार डॉक्टर्स, भूलतज्ज्ञ उपलब्ध नाहीत. प्रसूतीगृहामध्ये रात्रीच्या वेळी महिला रुग्णांना इतर दवाखान्यात पाठविण्यात येते. चांगले तज्ज्ञ डॉक्टर्स ऑन कॉल उपलब्ध करण्याची गरज आहे. नियुक्त केलेले डॉक्टर्स उपलब्ध नसतात. हद्दवाढ भागात घंटागाड्या व्यवस्थित पोहोचत नाहीत. त्यामुळे कचरा संकलन नियोजनपूर्वक होत नाही. प्रभाग २६ मध्ये तर मिनिटाला घंटागाड्या बंद पडतात. नागरिकांना त्या ढकलाव्या लागतात.

मंडई विभागाकडे वसुली समाधानकारक नाही. लायसन फेरी परवानाची माहिती समाधानकारक दिली नाही, यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या आढावा चर्चेवेळी या विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांच्या कामाचे कौतुक करण्यात आले. आजच्या चर्चेत अनंत जाधव, संजय कोळी, किसन जाधव, सत्यजित वाघमोडे, दीपक जमादार, प्रशांत पल्ली, श्रीदेवी फुलारे आदी नगरसेवकांनी भाग घेतले होते.

### २८ तारखेपर्यंत होणार विविध विभागवार चर्चा

बुधवार, दि.२५ मार्च २०२६ रोजी नगर अभियंता तथा संचालक नगर रचना (बांधकाम परवाना विभाग), विद्युत विभाग, सामान्य प्रशासन, उद्यान विभाग. गुरुवार, दि.२६ मार्च २०२६ रोजी सार्वजनिक आरोग्य अभियंता, विभागीय कार्यालय क्रमांक १ ते ८. शुक्रवार, दि.२७ मार्च २०२६ रोजी परिवहन विभाग, प्राथमिक शिक्षण मंडळ. शनिवार, दि.२८ मार्च २०२६ रोजी महिला व बाल कल्याण, मुख्यलेखापरीक्षक, नगरसचिव, पशुवैद्यकीय व दिव्यांग कल्याण विभाग असे विविध विभागवार चर्चा होणार आहे.



# गाव ते विश्व-समृध्द महाराष्ट्र संकल्पनेला बळ देण्याचा निर्धार

● विश्वमंगल मराठी फाउंडेशनची राज्यस्तरीय बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या राज्यस्तरीय बैठकीत गाव ते विश्व-समृध्द महाराष्ट्र संकल्पनेला बळ देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. खोपोली येथे झालेल्या या बैठकीस माजी मंत्री तथा विद्यमान आ.सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्रसह देश-विदेशातील मराठी बांधवांना एकत्र आणून एक सक्षम, व्यापक आणि प्रभावी संघटन उभारण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. जगभरातील मराठी मंडळांशी संपर्क वाढवून जागतिक स्तरावर मजबूत नेटवर्क उभारण्यावर भर देण्यात आला. गाव ते विश्व या संकल्पनेतून प्रत्येक गाव ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत फाउंडेशनचे जाळे निर्माण करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त झाला. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, उद्योजकता क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्याबरोबर स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, नवउद्योजक व स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे, आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्याचे ठरविण्यात आले. दर्जेदार शिक्षणासाठी मराठी शाळांकडे विशेष लक्ष देण्याचे ठरविण्यात आले. जिल्हा परिषद शाळांचे लोकसहभागातून आधुनिकीकरण, डिजिटल सुविधा उपलब्ध करून देणे, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र शासनाचे सचिव संजय कटकर, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, राज्य सेवाकर विभागाचे उपायुक्त बाळासाहेब देशमुख यांच्यासह अजित येलमार, रणजित पाटील, राजकुमार आडकर, अमित जैन, मोहन अनपट, प्रमोद कमलाकर, शिवाजीराव पवार, कोकरे, सीताराम राणे, संतोष बागल उपस्थित होते.



वामन अवतार : पूर्व विभाग श्रीराम मंदिराच्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त मंगळवारी प्रभु श्रीरामास वामन अवताराने अलंकृत करण्यात आले होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी १४ एप्रिल रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त रखुमाई सभागृह पोलीस संकुल, पंढरपूर येथे शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती पंढरपूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दरवर्षी उत्साहात साजरी केली जाते. जयंती निम्मित शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, टी.वाय.मुजावर, रेखा घनवट, सहा. पोलीस निरिक्षक योगेश लंगुटे, नगर अभियंता केसकर उपस्थित होते. या बैठकीत डॉ. आंबेडकर जयंती डिजेमुक्त, शांततामय आणि उत्साही वातावरणात साजरी करावी. जयंती अनुषंगाने लावण्यात येणारे पोस्टर, बॅनर, झेंडे हे परवानगी घेऊन व योग्य ती खबरदारी घेऊन लावावे तसेच ते आक्षेपार्ह असू नयेत याची दक्षता घ्यावी, मिरवणूक काढण्यापूर्वी किमान तीन दिवस मंडळानी पारंपरिक वाद्याचा वापर करावा तसेच सामाजिक उपक्रम राबवावेत अशा मंडळांना पोलीस प्रशासनातर्फे पारितोषिक देण्यात येणार आहे. आगामी पार्श्वभूमीवर मिरवणुकीचा मार्ग, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच पोलिसांना सहकार्य करण्याबाबत उत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

# संग्रामनगर येथे श्रीराम नवमी उत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २४ मार्च-**

श्री साईबाबा सेवा ट्रस्ट संग्रामनगर यांच्यावतीने श्री साई प्राणप्रतिष्ठा २९ वा वर्धापन दिनानिमित्त श्रीराम नवमी उत्सवाचे आयोजन केले असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.





संग्रामनगर येथील श्री साईबाबा मंदिरात गुरुवार दिनांक २६ रोजी रामनवमी निमित्ताने मंदिरात सकाळी ६ वाजता अभिषेक व महापूजा डॉ. धवलसिंह मोहिते पाटील व उर्वशीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते होणार असून यावेळी श्रीमती पद्मजादेवी मोहिते पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी ८ वाजता विनय उंट यांच्या हस्ते यज्ञ प्रज्वलन करण्यात येऊन सकाळी १० वाजता शिवशंभो भजनी मंडळाचे सामुदायिक भजन होणार आहे. दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव व महाआरती सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील व सुलक्षणादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते संपन्न होत असून यावेळी आ. रणजितसिंह मोहिते पाटील व मान्यवर हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. दुपारी १२-३० ते २-३० पर्यंत महाप्रसाद वाटप होणार असून यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

सायंकाळी ७ वाजताची आरती खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते होत आहे. सायंकाळी मंदिर परिसरात ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळ माळीनगर व ओंकार महिला भजनी मंडळ शंकरनगर यांच्यावतीने भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

# कंटेनरच्या धडकेत मोटर सायकलस्वाराचा मृत्यू

**मंगळवेढा, दि. २४ मार्च-**

मंगळवेढा ते उमदी मार्गावर वाहतूकीस अडथळा निर्माण होईल अशा रितीने रस्त्यात उभा केलेल्या कंटेनरवर मोटर सायकल आदळून झालेल्या अपघातात मयत कलाप्पा लक्ष्मण ढाणे (वय २५,रा.शिवणगी) याचा जागीच मृत्यू झाला असून या प्रकरणी अज्ञात कंटेनर चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

दि.२३ रोजी रात्री ८.३० वाजता मंगळवेढा ते उमदी जाणाऱ्या मार्गावरील सोड्डी गावच्या शिवारात रोडवर ओम ट्रेडर्स दुकानाजवळ यातील कंटेनर क्रमांक डी.एन.०९ यू ९०१० हा रस्त्याच्या परिस्थितीचा विचार न करता वाहतूकीस अडथळा निर्माण होईल अशा पध्दतीने वाहन उभे केल्याने यातील मयत मोटर सायकलस्वार कलाप्पा लक्ष्मण ढाणे याने त्याच्या ताब्यातील एच.एफ डिलक्स मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ डी.झेड.२६५३ ची कंटेनरला पाठीमागून जोराची धडक बसल्याने सदर मोटर सायकलस्वाराच्या डोकीस चेहर्यास मार लागून गंभीर जखमी होवून तो मयत झाला असल्याची फिर्यादी नागन्नाथ ढाणे यांनी दिल्यावर अज्ञात कंटेनर चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला.

## भिमजल्लोष प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी प्रभाकर बोंगे

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त भिमजल्लोष प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी प्रभाकर बोंगे यांची निवड करण्यात आली.



अन्य पदाधिकारी याप्रमाणे; उपाध्यक्ष-अनिल जेटीथोर, संतोष सोनकांबळे, सचिव-अतिश चौधरी, सहसचिव-अभिजित गायकवाड, खजिनदार-प्रकाश रणपिसे, सहखजिनदार-प्रमोद साबळे, आशुतोष चौधरी, विशाल माने, सदस्य-महेश गायकवाड, महेश कसबे, भारत देडे.

# तक्रार प्रलंबित प्रकरणी पालिकेतील ५९ अधिकारी, कर्मचाऱ्यांना दंड

## २८ हजार ९०० रुपये दंडाची केली आकारणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अखेर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेने एकूण ५९ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड ठोठावला असून एकूण २८ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिले आहेत.

महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, बांधकाम परवाना, विविध झोन कार्यालय, आरोग्य विभाग तसेच इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार विविध विभागातील एकूण ५९ कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

या कर्मचाऱ्यांना एकूण २८ हजार ९०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. हा दंड त्यांच्या मार्च २०२६ पेड इन एप्रिलच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून काम काजातील निष्काळजीपणामुळे लोकसेवेवर परिणाम होत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास कारवाई अटळ असल्याचा कडक इशारा महापालिका उपायुक्त लोकरे यांनी दिला आहे.



# सोलापूर विद्यापीठाकडून अतिविलंब शुल्क माफ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर आकारण्यात येत असलेल्या अवाढव्य अतिविलंब शुल्क माफ करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. याबाबत अभाविप अर्थात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने ठिय्या आंदोलन केले होते. यानिमित्ताने त्यांच्या या आंदोलनास यश आले आहे.

विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क उशिरा भरल्यास आकारण्यात येणारे जादा दंडात्मक शुल्क हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी मोठे ओझे ठरत होते. या अन्यायकारक शुल्कामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. याबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आवाज उठविला होता. ठिय्या आंदोलनात प्रदेश सहमंत्री आदित्य मुस्के, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य ओम इंगळे, महानगर मंत्री अनघा जाधवसह विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि शिक्षण सुलभ करण्यासाठी अभाविप सदैव कटिबद्ध आहे, असे यावेळी सांगण्यात आले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



## ▶▶ थोडक्यात

### गच्चीवरुन घरात शिरत १ लाख १४ हजारांचा ऐवज केला लंपास

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

घराच्या गच्चीवरून आतील बाजूस असणाऱ्या जिन्यातून घरात प्रवेश करुन १ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना जुना विडी घरकुल परिसरातील भारत नगर येथे २२ मार्च रोजी घडली. अंबादास मधुकर पल्ली (वय ३९, रा.१४४ भारत नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर) यांच्या रुमच्या दरवाजाचे कुलूप चोरट्याने कशाचे तरी साह्याने उचकटून घराच्या आतील रुममध्ये असलेले लोखंडी कपाटाचा एक दरवाजा तोडून कपाटाच्या आतील लॉकर उचकटून, लॉकर मधील ४८ हजार रुपयांचे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील झुबे, ३० हजार रुपयांचे ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, १८ हजार रुपये ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील झुबे, १८ हजार रुपये रोख रक्कम असे एकूण १ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज व रोख चोरून नेला आहे. याबाबत दि. २३ मार्च रोजी एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मस्के करत आहेत.

### फॅशन प्लस दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

हिरो कंपनीची फॅशन प्लस ग्रे रंगाची २५ हजार रुपयांच्या किमतीची मोटरसायकल क्रमांक एमएच १३ ईएच ५९६६ ही दि. १९ मार्च रोजी सॅमसंग मच्छिंद्र काळे वय ६२, ७३/७ उत्तर सदर बाजार, १४ नंबर शाळेजवळ, सोलापूर यांची विको प्रोसेस सिद्धिविनायक चहा कॅन्टीन समोर हँडल लॉक करून चहा पिण्याकरिता हॉटेलमध्ये गेले असता अज्ञात चोरट्याने हँडल लॉक तोडून चोरून नेली. याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात दि. २३ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास शेख करत आहेत.

### विवाहितेचा छळ; पती व सासऱ्या विरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

संसार उपयोगी सामान दिले नाही, सोने पैसे दिले नाहीत, योग्य मानपान केला नाही, तुझी पगार दे तसेच घरातील किरकोळ कारणावरून शाकेरा यांना घालून पाडून बोलून नोव्हेंबर २०१३ ते २८ डिसेंबर २०२५ च्या दरम्यान फयाज खान पती, अब्दुल सलाम खान सासरे, दोघे रा. १०६ हाजी हजरत खानचाळ, रामलाल चौक, सोलापूर यांनी शाकेरा फैयाज खान वय ३३, सध्या रा. १२८/२ एकरा संकुलच्या बाजूस, अमन चौक, नई जिंदगी सोलापूर यांना चरित्रावर संशय घेऊन अपमानित करून अर्वाच शिवीगाळ केली. कर्ज फेडण्यासाठी दोन लाख रुपये घेऊन ये असे म्हणून हाताने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. त्रास देऊन शारीरिक मानसिक व आर्थिक त्रास देऊन छळ केला. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात पति व सासरे विरोधात दि. २३ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास शिंदे करत आहेत.






### कार पलटी झाल्याने डोक्यास गंभीर दुखापत; एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

मारुती कंपनीची स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एच ४७ एबी ४७३८ यामधून अक्कलकोट येथून सोलापूर शहरात दि. १९ मार्च रोजी नावेद अमित नागनाळीकर वय २०, रा. कारंजा चौक, मौलाली गल्ली, ता. अक्कलकोट जि. सोलापूर व त्याचे मित्र अल्लाउद्दीन मेहबूब शेख, अल्ताफ असिफ शेख, निहाल फैज अहमद नागुरे असे मिळून रमजान सणाचे सामान खरेदी करता आले होते. पहाटे साडेतीन वाजता लांबोटी येथील जयशंकर हॉटेलमध्ये चहा पिण्यास गेले. चहा पिऊन थोड्यावेळाने पहाटे सव्वा पाच वाजता परत घरी अक्कलकोट कडे जाण्याकरिता निघून पुणे तुळजापूर हायवे वरून मार्केट यार्ड कडे जात असताना रघोजी ट्रान्सपोर्ट समोर आले असता कारचालक अल्ताफ असिफ शेख याने त्याच्या ताब्यातील वाहन हायगयने, अविचाराने, निष्काळजीपणाने, रस्त्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करत भरधाववेगात चालवून रस्त्याच्या दुभाजकास धडक दिली. कार पलटी झाल्याने त्यात अल्लाउद्दीन मेहबूब शेख, निहाल फैज अहमद नागुरे यांना मार लागला. कारचे नुकसान झाले. यामुळे अल्ताफ असिफ शेख रा. महालक्ष्मी स्टील दुकान समोर, गॅस गोडाऊन ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांच्या विरोधात दि. २३ मार्च रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाडीकर करत आहेत.

# जिल्हा परिषदेतील विविध समित्यांच्या सभापतीपदासाठी सव्वा वर्षाचा फॉर्म्युला?

## ● जि.प.सदस्य लावताहेत 'गॉडफादर'द्वारा फिल्डिंग
## ● जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये मुख्य स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांप्रमाणे विविध समित्यांच्या सभापतीदासाठीही सव्वा वर्षाचा फॉर्म्युला राहणार आहे. सभापती पदांसाठी जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये मुख्य स्पर्धा आहे. 'सभापती'वर आरुढ होण्यासाठी इच्छुक असलेले जि.प.सदस्य आपापल्या 'गॉडफादर'द्वारा फिल्डिंग लावत असल्याचे दिसून येत आहे.


एआय इमेज

सोलापूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शुक्रवार, २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेत या पदांची निवड करण्यात येणार आहेत. सभापती पदांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गोरे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा निर्णय अंतिम राहणार आहे. दीपक वैद्य यांच्या रुपाने बार्शी तालुक्याला अध्यक्षपद, इंद्रजीत पवार यांच्या रुपाने उत्तर सोलापूर तालुक्याला उपाध्यक्षपद तर रश्मी बागल यांच्या रुपाने करमाळा तालुक्याला पक्षनेतेपद मिळाले आहे. त्यामुळे माढा, मंगळवेढा, अक्कलकोट, माळशिरस आणि दक्षिण सोलापूर या पाच तालुक्यांमध्येच मुख्य स्पर्धा रंगण्याची चिन्हे आहेत. अध्यक्षांकडे प्रशासन, ग्रामपंचायत, जलसंधारण, पाणीपुरवठा, ग्रामीण विकास आणि स्वच्छता या सहा विभागांची, उपाध्यक्षांकडे अर्थ-बांधकाम किंवा शिक्षण-आरोग्य यापैकी दोन विभाग आणि महिला व बालकल्याण विभाग महिला सदस्याकडे तर समाजकल्याण विभाग मागासवर्गीय सदस्याकडे देण्याची आजवरची परंपरा आहे.

### अशी वर्तविली जात आहे शक्यता

दक्षिण सोलापूर किंवा अक्कलकोट तालुक्याला महिला व बालकल्याण, माळशिरस तालुक्याला समाजकल्याण, मंगळवेढा तालुक्याला कृषी व पशुसंवर्धन, माढा तालुक्याला शिक्षण-आरोग्य किंवा अर्थ-बांधकाम समितीचे सभापतीपद मिळण्याची शक्यता आहे.

### या निर्णयाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष

उपाध्यक्ष इंद्रजीत पवार हे स्वतःकडे अर्थ व बांधकाम समिती ठेवणार की शिक्षण व आरोग्य विभागाची जबाबदारी स्वीकारणार? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या निर्णयाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात

# नवीन एमआरआय मशीन होणार उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

श्रीछत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयासाठी नवीन एमआरआय मशीन उपलब्ध होणार आहे. आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

श्री छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयात सध्या असलेली एमआरआय मशीन कालबाह्य झालेली आहे. या मशीनच्या विक्री बाबतची निविदाही डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने काढली आहे. सोलापूर शहर-जिल्ह्यासह परिसरातील जिल्हे आणि विविध राज्यातील रुग्ण याठिकाणी उपचारासाठी येत असतात. मात्र एमआरआय करुन घेण्याकामी रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे धाडले जाते. याचा आर्थिक व वेळेचा फटका बसत आहे. ही बाब लक्षात घेवून श्री छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयात नव्या तंत्रज्ञानासह एमआरआय (टेस्ला-३) ही यंत्रणा तातडीने उपलब्ध करुन देण्याची मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी फडणवीस यांच्याकडे केली होती.

#### स्व.अजितदादांशीही झाली होती सकारात्मक चर्चा

काही महिन्यांपूर्वी पुणे येथे झालेल्या विभागीय बैठकीत सोलापूरच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयात नवीन एमआरआय मशीन बसवण्याबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली होती.

#### पाठपुराव्याला यश

'एमआरआय'साठी खासगी रुग्णालयांकडे जावे लागते. गोरगरीब, कष्टकरी वर्गांना ही बाब परवडणारी नाही. याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरेमार्फत आ.देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

## भाजी विक्रेत्यांना क्यूआर कोडप्रणाली ओळखपत्र द्या


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

शहरातील सर्व भाजी विक्रेत्यांची अधिकृत नोंदणी करुन त्यांना क्यूआर कोड आधारित ओळखपत्र देण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांनी महापालिकेच्या अंदाजपत्रकीय सभेत बोलताना केली.शहरातील अनेक ठिकाणी भाजी विक्रेते रस्त्यावर व्यवसाय करत असले तरी त्यांची अधिकृत नोंद नसल्याने महापालिकेला अपेक्षित महसूल मिळत नाही. त्यांना क्यूआर कोड दिल्यास महापालिकेला महसूल मिळून तिजोरीत भर पडण्यास मदत होईल.

प्रत्येक विक्रेत्याची माहिती डिजिटल स्वरुपात उपलब्ध राहणार असून, परवाना तपासणी सुलभ होईल. अधिकृत व अनधिकृत विक्रेत्यांमध्ये स्पष्ट फरक करता येईल, ज्यामुळे अतिक्रमणावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. भाजी विक्रीसाठी स्वतंत्र झोन करण्याचीही मागणी करण्यात आली. यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन स्वच्छता राखण्यास मदत होईल, असेही नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांनी सांगितले.

# ग्रामविकास विभागाकडून २९ कोटी २२ लाखांचा निधी

### पालकमंत्र्यांकडून मिळाली अनोखी भेट





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला भरघोस मताने सत्ता मिळवून दिल्यास ग्रामविकास विभागाकडून केंद्रीय वित्त आयोगातून जिल्हा परिषदेसाठी १४ कोटी ६१ लाख तर ११ पंचायत समितीसाठी १४ कोटी ६१ लाख असे एकूण २९ कोटी २२ लाख रुपये देण्याचे अभिवचन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी निवडणूक काळात दिले होते. नुकताच ग्रामविकास विभागाकडून हा निधी मिळाला असून पालकमंत्री गोरे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेसह त्या-त्या पंचायत समित्यांना दिलेली अनोखी भेट असल्याचे सांगण्यात येते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्री गोरे यांनी त्यांच्याकडे असलेल्या महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडून दि २३ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्रीय वित्त आयोगाचे अनुदान सोलापूर जिल्हा परिषदेस १४ कोटी ६१ लाख इतका निधी तसेच जिल्ह्यातील ११ पंचायत समिती एकुण १४ कोटी ६१ लाख असे एकुण तब्बल २९ कोटी २२ लाख रुपये दिले आहेत.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास या विभागाकडून विविध योजनांना मोठ्या प्रमाणावर जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामिण क्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला. त्यामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, अहिल्यादेवी होळकर तिर्थक्षेत्र विकार मातोश्री ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम योजना, २५१५, ग्रामीण मार्ग, जिल्हा मार्ग, रस्ते विकास योजना, ग्रामीण भागातील पुल बांधणे इत्यादी योजनामधून जिल्ह्यासाठी भरघोस निधी प्राप्त होणार आहे.

### नूतन सदस्यांनी मानले पालकमंत्र्यांचे आभार

सदर निधी हा जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणात खर्च होणार असल्याने नूतन पदाधिकारी-सदस्य आणि सर्वसामान्य जनतेने पालकमंत्री गोरे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

### या निधीतून खालीलप्रमाणे होणार कामे

या विकास निधीमधून पाणी पुरवठा, स्वच्छता विषयक कामे, गांव अंतर्गत गटारी, रस्ते, शाळा, अंगणवाडीची कामे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीची कामे, ग्राम पंचायत इमारतीची दुरुस्तीची कामे, स्मशानभुमीची कामे, जोडरस्तेची कामे, पथदिवे, विद्युतीकरणाची कामे इत्यादी मुलभुत व अत्यावश्यक कामे हाती घेता येणार आहेत. त्यामुळे त्या त्या भागाचा कायापालट होणार आहे.

# कला, क्रीडा व संगणक शिक्षक भरतीला गती



एआय इमेज

### १७०० हून अधिक पदांसाठी ८० कोटींची तरतूद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

राज्यातील शाळांमध्ये कला, क्रीडा आणि संगणक विषयांच्या शिक्षकांची दीर्घकाळ प्रलंबित असलेली भरती प्रक्रिया आता मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

शिक्षण मंत्र्यांनी याबाबत महत्त्वपूर्ण घोषणा करत सुमारे १७०० हून अधिक शिक्षकांची भरती करण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे ८० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आल्याची माहिती दिली आहे. सध्या पवित्र पोर्टलमार्फत शासकीय व खासगी संस्थांमध्ये शिक्षक भरती सुरू असताना, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये कंत्राटी पद्धतीने होणाऱ्या भरतीमुळे अनेक अडचणी निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने आश्रमशाळांमध्येही कायमस्वरूपी शिक्षक भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांनी यासंदर्भात आदेश काढले आहे.

राज्यातील अनेक आश्रमशाळांमध्ये कला, क्रीडा व संगणक शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या भरती प्रक्रियेत कला, क्रीडा व संगणक विषयांसाठी प्रत्येकी सुमारे ५१० पदे भरली जाणार असून, एकूण संख्या १७०० पेक्षा अधिक आहे. त्यामुळे आश्रमशाळांना आवश्यक शिक्षक मिळून शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यास मदत होणार आहे. राज्यातील खासगी, सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शाळांमध्येही संच मान्यतेनुसार कला, क्रीडा, कार्यानुभव व संगणक शिक्षकांची रिक्त पदे तत्काळ भरावीत, अशी मागणी विविध शिक्षक संघटनांकडून होत आहे.सोलापूर जिल्हा परिषद, माध्यमिक विभाग तसेच खासगी शाळांमध्ये ५०० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक या निकषानुसार हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याचे चित्र आहे.

या पदभरतीबाबत अपेक्षित गती नसल्याने शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पवित्र पोर्टलप्रमणेच या शिक्षकांचीही नियमित भरती झाल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल. तसेच आश्रम शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मोठी मदत होईल. अशी प्रतिक्रिया स्पर्धा परीक्षा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी दिली आहे.

#### कौशल्ये व कलागुण विकसित करण्याची संधी मिळणार

कला, क्रीडा व संगणक शिक्षकांची कायमस्वरूपी नियुक्ती झाल्यास विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान, क्रीडा कौशल्ये व कलागुण विकसित करण्याची संधी मिळणार आहे. तसेच, अनेक वर्षांपासून अल्प मानधनावर काम करणाऱ्या शिक्षकांना स्थैर्य मिळून त्यांच्या रोजगाराचा प्रश्नही मार्गी लागणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील शाळांना मोठा दिलासा मिळणार आहे.



## लोकमंगल महाविद्यालयाची दक्षिण भारतात शैक्षणिक सहल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दक्षिण भारतातील कर्नाटक येथे आयोजित केली होती.

या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी शिरसी, याना, विभूती धबधबा, गोकर्णा, मालपे बीच, श्री क्षेत्र मुरूडेश्वर, कायाकिंग, उडुपी श्रीकृष्ण मंदिर, श्री मंजुनाथस्वामी मंदिर धर्मस्थळ, बंदाजे धबधबा ट्रेक, मैसूर पॅलेस, चामुंडेश्वरी मंदिर, श्री वेणुगोपाळस्वामी मंदिर, वृंदावन गार्डन, जागतिक वारसा स्थळ विजयनगर साम्राज्याची राजधानी असलेल्या हंपी येथील विरूपाक्ष मंदिर, विठ्ठल मंदिर व रथ, अंजनाद्री मंदिर आदी पर्यटन व धार्मिक स्थळांना भेट दिली. या सहलीसाठी प्रा. आशिष सरकाळे यांचा सहभाग होता.

या शैक्षणिक सहलीसाठी मंजुनाथ कुंभार, नक्षत्रा कांबळे, अभिजीत तनपुरे व तृप्ती जाधवर यांनी विद्यार्थी समन्वयक म्हणून कार्य पार पाडले. या सहलीसाठी संस्थेचे अध्यक्ष रोहन देशमुख, सचिव डॉ. अनिता ढोबळे, महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन व सर्व प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# भविष्याची चिंता मानसिक आजाराला निमंत्रण : मुनीश्री वीरसागरजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

ज्या व्यक्तीचे मन स्वस्थ असते, त्याचे शरीरही निरोगी राहते. जो माणूस मनाने सतत आजारी असतो, तो शरीरानेही आपोआप आजारी पडतो, असे परखड मत संत शिरोमणी आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महाराज यांचे शिष्य निर्यापक श्रमण मुनीश्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी व्यक्त केले.




बाळीवेस येथील गांधी नाथा रंगजी जैन बोर्डिंगच्या मैदानावर आयोजित केलेल्या ध्यान शिबीरात बोलताना ते पुढे म्हणाले, प्रत्येकाच्या जीवनात चिंता असतेच. मात्र, भविष्याची अतिचिंता केल्यास मानसिक आजार जडू शकतात. एक भविष्याची चिंता आणि दुसरी शरीरात होणाऱ्या बदलांची चिंता यामुळे माणूस त्रस्त होतो. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात संकटे येतात, वास्तवापासून पळून काहीही साध्य होत नाही. जे घडणार आहे, त्याचा सामना करावाच लागेल. जगातील सामर्थ्यवान व्यक्तीही देवाकडे जाताना माझ्या आयुष्यात दुःख नसावे, कुटुंबात शांतता लाभावी आणि मला कधीच कष्टाचा सामना करावा लागू नये, अशी प्रार्थना करते.

मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी ध्यानाची नितांत गरज आहे. ध्यान केल्याने आपले मन इतके मजबूत होईल की त्याला कधीही आजारपण येणार नाही. मन खंबीर असेल तर हृदयविकार किंवा कोमासारख्या गंभीर समस्यांपासूनही रक्षण होऊ शकते. या धकाधकीच्या जीवनात स्वतःला वाचवण्यासाठी मन मजबूत करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

**ध्यान, प्रवचन व पाठशाळेचा लाभ घ्या :** दररोज सकाळी १०.३० वाजता बाळीवेस येथील गांधी नाथा रंगजी जैन बोर्डिंगच्या मैदानावर, सकाळी ८.१५ वाजता शुक्रवार पेठेतील महावीर सांस्कृतिक भवन येथे मुनीश्री वीरसागरजी महाराज यांचे प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुनीश्री १०८ वीरसागरजी महाराज संघस्थ धवलसागरजी महाराज हे दररोज संध्याकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत पाठशाळा घेत आहेत. सर्व समाज बांधवांनी आपल्या पाल्यांसहित लाभ घ्यावा, असे आवाहन श्री आदिनाथ महाराज दि.मंदिर ट्रस्ट व सकल जैन समाज सोलापूर यांनी केले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३९२

**कीं तूं एक वधिता आणि सकळ लोकु हा मरता**
**ऐसी भ्रांति झणे चित्ता येवों देसी**

मृत्यू हा शब्द कोणालाही अजिबात आवडणारा शब्द नाही. तरीपण माणूस या शब्दाचा उच्चार अनेकवेळा सहज करीत असतो. थोडासा राग आला तरी मारीन बघ. अपघातासारखे थोडेसे संकट आले तरी मेला असतास की ? चिंता, ताण, राग वाढला की, अशा जगण्यापेक्षा मेलेले बरे, असे माणूस म्हणतो. दुसऱ्याला भिती घालण्यासाठी त्याला मारण्याची किंवा स्वत: मरण्याची धमकी माणूस देतो ? अर्थात मृत्यू हा शब्द आवडत नसतांनाही माणूस मृत्यू या शब्दाचा उच्चार केल्याशिवाय राहात नाही. मृत्यूचा अनुभव मात्र माणसाला आयुष्यात एकदाच येतो. हा आलेला अनुभव त्याला दुस-याला सांगण्याची संधी मात्र निसर्गाने ठेवलेली नाही. युध्द म्हणजे मरणच मरण. दोन्ही पक्षातील कोण, केव्हा मरतील हे सांगणे कठीण असते. आपण दुस-याला मारायला गेलेलो असतो अगदी तसाच दुसराही आपणाला मारायला आलेला असतो. हे सत्य असले तरीही आपण म्हणतो की त्याला मी मारीन. कारण मी पणाचं वलय आपल्या भोवती आपण असं गुरफटून घेतो की, आपण अमरच राहाणार ईथपर्यन्त आपली मानसिकता आपण निर्माण करतो. मी मरणारच नाही, असेही अनेकांना वाटत असते.



मृत्यू हा कधीना कधी येणारच आहे, हे जरी निश्चित असले तरीही तो केव्हा, कसा, कोणाकडून होणार हे मात्र अनिश्चित आहे. अर्थात, मृत्यूच्या बाबतीत निश्चित व अनिश्चित हे दोन्हीही शब्द अत्यंत महत्वाचे व सत्य आहेत. गर्व, अभिमान, मीपणा अशा अनेक कारणांमुळे आपण दुसऱ्याला मारु व आपण जगू असा समज अनेकांना होतो. याप्रमाणे मोहग्रस्त अर्जुनालाही वाटते की, मी कौरवांना मारणार आहे. हे माझ्या हातून मरणार आहेत. माझे गोत्रज असल्याने या युध्दात मी त्यांना मारुन पाप माझ्या डोक्यावर घेणार नाही. खरे म्हणजे या युध्दात अर्जुन मरणार नाही कशावरुन ? त्याचबरोबर त्याच्याच हातून हे मरतील कशावरुन? पण आपल्या सारखीच त्याचीही मानसिकता झालेली आहे. यांना मी कसा मारु, हे अर्जुनाच्या तोंडून ऐकल्यानंतर भगवान श्रीकृष्णांना आश्चर्य वाटले. श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, कीं तूं एक वधिता आणि सकळ लोकु हा मरता ऐसी भ्रांति झणे चित्ता येवों देसी. तू एकमात्र मारणारा आणि बाकी हे सगळे मरणारे आहेत असा भ्रम तुला होण्याचे काही कारण नाही. कारण तुझ्याच हातून हे मरणार कशावरुन? हे विश्व अनादी कालापासून निर्माण होत आहे व नियमाप्रमाणे लयासही जात आहे. त्यामुळे तुझ्या मारतो म्हणण्याने किंवा मारणार नाही म्हणण्याने या विश्वात काही फरक पडणार नाही. आपणालाही बऱ्याच वेळा मी केले तरच हे होईल, अन्यथा होणार नाही. मी होतो म्हणूनच हे झाले, मी नसतो तर हे झालेच नसते. असा गैरसमज आपणाला होत असतो. आपल्या येण्या-जाण्याने या विश्वात काही फरक जरी पडत नसला तरीही आपण सद्सदविवेक बुध्दीला स्मरुन, निती नियमाला अनुकूल असे वर्तन करीत राहाणे हितावह असते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. २५ मार्च २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - रौद्र
मास - फाल्गुन शु. सप्तमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- मृगशीर्ष (१७.३३)
योग - सौभाग्य (२६.०९)
करण - विष्टी (२४.४७)
राहू काल : मंगळवार
स. ३.०० ते ४.३०

दिनविशेष : ✽ गुलाम व्यापारातील बळींचा आंतरराष्ट्रीय स्मरण दिन.
१९३२: वसंत पुरुषोत्तम काळे (व. पु. काळे) प्रसिद्ध लेखक व कथाकथनकार यांचा जन्म.
१९३३: हवामानशास्त्रज्ञ आणि पद्मभूषण पुरस्कार विजेते वसंत गोवारीकर यांचा जन्म.
१९५६: ग्वाल्हेर घराण्याचे गायक मुकूल शिवपुत्र यांचा जन्म.
२०१४: भारतीय चित्रपट अभिनेत्री नंदा यांचा जन्म.



## श्री कालिका देवी चैत्र शुध्द पंचमी महोत्सव उत्साहात

### विश्व ब्राह्मण समाज कालिका सेवा मंडळ ट्रस्टचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

विश्व ब्राह्मण समाजकारिता सेवा मंडळ ट्रस्ट, सोलापूर यांच्या वतीने आयोजित श्री कालिका देवी चैत्र शुद्ध पंचमी महोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवात समाजबांधवांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला.

विश्व ब्राह्मण समाज कालिका सेवा मंडळ ट्रस्ट, सोलापूर यांच्या वतीने आयोजित श्री कालिका देवी चैत्र शुद्ध पंचमी महोत्सव यंदाही उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. रविवारी सकाळी ८ वाजता उत्सव मूर्ती स्थापना व ग्रंथपूजा करण्यात आली. त्यानंतर दुपारी श्री दुर्गा सप्तशती पाठ मार्गदर्शन प्रतिभा महामुनी, शैलजा कुरुलकर आणि रेखा जोशी यांनी केले. दररोज सकाळी ८ वाजता नित्य पूजा नागेश वसंतराव कुरूलकर यांच्या हस्ते पार पडली तसेच शुक्रवारी कुंकुमार्चन, सोमवारी रुद्राभिषेक आणि रविवारी नवचंडी यांसारखे विविध धार्मिक कार्यक्रमही उत्साहात झाले.

सोमवारी श्री कालिका देवीची पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महाआरती श्री व सौ. प्रसाद बाळासाहेब कुमठेकर यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष उमेश कुरुलकर, उपाध्यक्ष सचिन आष्टीकर, खजिनदार नागेश कुरुलकर, सेक्रेटरी कालिदास कुंभारीकरसह सेक्रेटरी सत्यजित कुरुलकर, विश्वस्त पुरुषोत्तम कुरुलकर, विश्वस्त प्रसाद कुमठेकर, जितेंद्र वेदपाठक, संतोष कळमनकर, प्रसाद चोळचगुड्डू उपस्थित होते.

# शिक्षण विभागातील रिक्त पदांवरुन संताप

## मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख पदे तातडीने पदोन्नतीने भरण्याची शिक्षक संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

जिल्हा परिषद शिक्षण विभागातील पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुखांची मोठ्या प्रमाणात रिक्त असलेली पदे तातडीने पदोन्नतीने भरावीत, अशी ठाम मागणी शिक्षण सहकार संघटनेने केली आहे. याबाबत प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना निवेदन देण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून प्राथमिक शिक्षण विभागात विविध महत्त्वाची पदे रिक्त असल्यामुळे शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण देण्यासाठी तसेच तालुका स्तरावरील शिक्षण व्यवस्थापन सुरळीत ठेवण्यासाठी ही पदे तातडीने भरणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रश्नाची दखल घेत माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजित पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी रिक्त पदे लवकरच भरली जातील, असे आश्वासन दिले होते.

तथापि, अद्याप या पदांच्या भरतीबाबत ठोस निर्णय न झाल्याने शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनापूर्वीच पदोन्नतीद्वारे रिक्त पदे भरावीत, अशी संघटनेची भूमिका आहे.

या मागणीवेळी राज्य सरचिटणीस नीलेश देशमुख, अनिल कुलकर्णी आदी पदाधिकारी उपस्थित होते. शिक्षण विभागातील रिक्त पदांचा प्रश्न तातडीने सोडवला गेला नाही, तर शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीतीही यावेळी व्यक्त करण्यात आली.

## २० वर्षीय तरुण बेपत्ता; विजापूर नाका पोलिसांत तक्रार दाखल

**तभा वृत्तसेवी**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**



विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतून प्रभाकर प्रकाश माने (वय २०) हा तरुण बेपत्ता झाला आहे. दि. १० मार्च रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास तो आपल्या राहत्या घरातून कोणास काहीही न सांगता निघून गेला असून अद्याप घरी परतलेला नाही. प्रभाकर हा गोकुळ नगर परिसरातील वाघमोडे यांच्या घरी भाड्याने राहतो. त्याचे शिक्षण नववीपर्यंत झाले असून तो मराठी भाषेत संवाद साधतो. बेपत्ता झाला त्यावेळी त्याने अंगात निळ्या रंगाचा रेघाळी शर्ट आणि बदामी रंगाची पँट परिधान केली होती. त्याचा रंग: गोरा, उंची: ५ फूट ६ इंच आहे. याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. पोलीस हवालदार मणुरे हे या प्रकरणाचा तपास करत आहेत. अंमलदार राठोड यांनी या गुन्ह्याची नोंद केली आहे.



## जनमंगल फाउंडेशन पतसंस्थेकडून महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

जनमंगल फाउंडेशन व जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. रंगभवन चौक येथील समाजकल्याण केंद्रात हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात होते. जनमंगल पतसंस्थेच्या चेअरमन सविता थोरात यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.या प्रसंगी डॉ. उमा विजय झाड, दीपा उमेश भोसले-चव्हाण, लता दत्तात्रय साठे, कु. श्वेता सुनील बनसोडे, सुरेखा मल्लिकार्जुन केदार व आरती संजय शेटे यांचा सन्मानचिन्ह व तुळशीचे रोप देऊन गौरव करण्यात आला.

सूत्रसंचालन दीक्षा गुर्रम यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहसचिव मनीषा मोरे यांनी केले.

## पद्मा भुतडा यांनी पंतप्रधान मोदींना दिले स्वहस्ताक्षरातील श्री रामचरितमानस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

नीलकंठ बँकेच्या उपाध्यक्षा आणि सोलापूरातील सामाजिक कार्यकर्त्या पद्मा विठ्ठलदास भुतडा यांनी स्वहस्ताक्षरात लिहिलेले श्री रामचरित मानस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट म्हणून पाठवले आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विजय झाला तर स्वहस्ताक्षरात श्री रामचरितम नस लिहिण्याचा संकल्प पद्मा भुतडा यांनी केला होता. हा संकल्प आता पूर्णत्वास गेला आहे.

भुतडा यांनी श्री रामचरितम नस मधील संपूर्ण नऊ पारायणे आणि सात सोपान मोठ्या आकाराच्या वहीत स्वहस्ताक्षरात उतरवली आहेत.



यात बालकांड, अयोध्या कांड, अरण्य कांड, किष्किंधा कांड, सुंदर कांड, लंका कांड आणि उत्तरकांडाचा समावेश आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकी वेळीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विजय मिळाल्यास श्री ज्ञानेश्वरी लिहिण्याचा संकल्प पद्मा भुतडा यांनी केला होता. त्यानुसार भुतडा यांचे श्री ज्ञानेश्वरीचे स्वहस्ताक्षरातील लिखाण देखील सुरू आहे.

### श्री ज्ञानेश्वरीचेही करत आहेत लिखाण

श्री ज्ञानेश्वरीची ही प्रत देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्याची भुतडा यांची मनीषा असून त्याकरिता पद्मा भुतडा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून भेटीची वेळ देखील मागितली आहे. सोमवारी पद्मा भूतडा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्वहस्ताक्षरातील श्री रामचरितमानसची प्रत पाठवली. याप्रसंगी विठ्ठलदास भुतडा, नगरसेवक श्रीनिवास दायमा उपस्थित होते.

# मराठा समाजाच्या नगरसेवकांचा वीज क्षेत्रातील समाज बांधवांतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

वीज क्षेत्रात कार्यरत असलेल्या समाज बांधवांच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेत निवडून आलेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोलापूर येथील गोपाबाई दमानी ब्लड बँकेच्या सभागृहात नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरण कंपनीचे सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता मारुती फंड होते.

कार्यक्रमाचे आयोजन विलास कोले, मोहन पाटील, बालाजी चौरे, विजय अडसूळ, बाबा पाटील, अक्षय देशमुख त्रिपद शिंदे आणि सहकाऱ्यांनी केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.



यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक अमोल शिंदे, जयकुमार माने, विनोद भोसले, प्रियदर्शन साठे, मनोरमा सपाटे, श्रद्धा पवार, मृण्मयी गवळी, वैशाली चालुक्य आणि कल्पना कदम यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

आपण ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि समाजाभिमुख कामातून आम्ही समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा आम्ही सर्व सत्कारमूर्ती निश्चितपणे प्रयत्न करू आणि भविष्यात समाज बांधवांना कोणतीही अडचण असेल तर आम्ही खंबीरपणे त्यांच्या पाठीशी नक्की उभा राहू, असे सत्काराला उत्तर देताना अमोल शिंदे यांनी सांगितले.

श्री शिंदे यांच्या बरोबरच कार्यक्रमाला उपस्थित सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी समाजाने केलेल्या या सत्काराबद्दल ऋण व्यक्त करून संयोजकांना धन्यवाद दिले. या नवनिर्वाच नगरसेवकांबरोबरच महावितरण पारेषणचे कार्यकारी अभियंता एन टी चव्हाण, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता शरावती लाम काने, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप कदम, वर्कर्स फेडरेशनचे राज्य उपसरचिटणीस विलास कोले, शंभूराजे युवा संघटनचे नितीन चव्हाण, बार असोसिएशनचे बाबा माने, मोहन पाटील, मोहन अलाट, बाळासाहेब सुरवसे आदी मान्यवरांचा पण सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास कोले यांनी केले. सूत्रसंचालन विजय अडसूळ यांनी केले.

## शिक्षणाधिकाऱ्यांच्या व्हॉट्सअ‍ॅपवर सायबर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या व्हॉट्सअ‍ॅप खात्यावर सायबर गुन्हेगारांनी हल्ला करत त्यांच्या संपर्कातील शेकडो जणांना बनावट 'लग्नाच्या आमंत्रणाचा' मेसेज पाठवल्याची घटना रविवारी उघडकीस आली. सायबर पोलिसांच्या मार्गदर्शनानंतर संबंधित 'एपीके' फाईल तत्काळ डिलीट करण्यात आली असून, नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सचिन जगताप यांच्या मोबाईलवर इंग्रजीत लग्नाचे आमंत्रण असल्याचा मेसेज आला होता. ओळखीच्या व्यक्तीचा कार्यक्रम असेल, असा समज करून त्यांनी मेसेजखालील फाईल उघडली. मात्र, हीच फाईल 'एपीके' स्वरूपातील घातक अ‍ॅप निघाली. ते अ‍ॅप डाऊनलोड होताच सायबर गुन्हेगारांनी त्यांचे व्हॉट्सअ‍ॅप खाते हॅक केले आणि त्यांच्या संपर्कातील अनेकांना तोच मेसेज आपोआप पाठवला गेला.

या मेसेजमध्ये, कृपया तपशीलांसाठी जोडलेले आमंत्रण डाऊनलोड करा, असा मजकूर होता. त्याखाली संशयास्पद 'एपीके' फाईल जोडलेली होती. ही बाब लक्षात येताच सचिन जगताप यांनी तात्काळ सोलापूर सायबर पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी आवश्यक मार्गदर्शन करत संबंधित अ‍ॅप त्वरित डिलीट करण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी अ‍ॅप हटवून आपल्या सर्व संपर्कांना सावधतेचा मेसेज पाठवला.

## डॉ. मिलिंद शहा यांना पर्थ ऑस्ट्रोलिया येथे मार्गदर्शनासाठी आमंत्रित

**सोलापूर, दि.२४ मार्च-**



पर्थ, ऑस्ट्रोलिया येथे प्रसुतीपूर्व प्रसुती दरम्यान व प्रसुतीनंतर येणाऱ्या बाळांच्या समस्या या विषयावर होणाऱ्या परिषदेमध्ये बाळाच्या मेंदूवर होणारे दुष्परिणाम कमी किंवा मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये कसे टाळता येतील यावर मार्गदर्शन करण्यासाठी सोलापुरातील प्रसिध्द स्त्रीरोगतज्ञ डॉ. मिलिंद शहा यांना मार्गदर्शनासाठी व भाषणासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.डॉ. मिलिंद शहा सोलापूर व मुंबई येथे गेली जवळजवळ ३५ वर्षे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. शहरातील विविध रुग्णालयांमध्ये ते आपली सेवा देतात. आजवर जवळजवळ ३० देशांमध्ये त्यांना स्त्रीरोग शास्त्रावरील विविध विषयावर बोलण्यासाठी त्यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

# 'वालचंद'च्या ६२ विद्यार्थ्यांना प्राकृतची शिष्यवृत्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

केंद्र शासनातर्फे पुरस्कृत केंद्रीय संस्कृत विद्यापीठाच्या माध्यमातून दुर्मिळ भाषांच्या जतनासाठी अभ्यास करणाऱ्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामध्ये यावर्षी वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स कनिष्ठ महाविद्यालय विभागातील २१ तर वरिष्ठ महाविद्यालय विभागातील ४१ विद्यार्थ्यांना शासनाची ही शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. संतोष कोटी, प्राकृत विभाग प्रमुख डॉ. महावीर शास्त्री यांनी मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी, अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक जीवराज कस्तुरे, डॉ. के. आर.



राव यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पुणे बोर्डात दोन विद्यार्थ्यांनी अर्धमागधी विषयात प्रथम क्रमांक पटकावून यावर्षी २१ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत असे आभार माधुरी शास्त्री यांनी सांगितले. श्रुती येले, नंदिनी जाधव, नागमणी लोकुर्ते, सानिया सलगर, पूजा व्हंडरे, आकांक्षा तुनकी, ओंकार शिकातोलु, अंबादास चव्हाण, वर्षा जगनकर, इंद्रकुमार म्हेत्रे या विद्यार्थ्यांनी सलग तीन वर्षे स्वर्ण-शिष्यवृत्ती मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# अध्यक्ष-उपाध्यक्षांना कार्यकर्त्यांकडून 'शेती अवजारांची' अनोखी भेट

### हार-फुलांना नकार; शेतकऱ्यांच्या साधनांना मान, झेडपीत सत्काराची अनोखी परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

नूतन सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी आपल्या सत्काराला फार तुरे पुष्पगुच्छ न आणता शेती अवजारे तसेच शैक्षणिक साहित्य आणावे, असे आवाहन कार्यभार सांभाळल्यानंतर सर्व कार्यकर्त्यांना तसेच कर्मचाऱ्यांना केले होते. त्याच आवाहनाला कार्यकर्त्यांसह कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांना शेती अवजारे तसेच शैक्षणिक साहित्य भेट देऊन त्यांचा सन्मान केला.



सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये नूतन अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या सत्कारावेळी यंदा एक वेगळे आणि सकारात्मक चित्र पाहायला मिळाले. पारंपरिक हार-तुरे, बुके यांना फाटा देत शेतकऱ्यांच्या दैनंदिन वापरातील कुदळ, फावडे, विळा आणि टोपली यांसारख्या वस्तूंनी सत्कार करण्यात आला. या अभिनव उपक्रमामुळे संपूर्ण जिल्हा परिषदेत याची जोरदार चर्चा रंगली आहे.

उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या चेंबरमध्ये सध्या पुस्तकं, वह्या, पेन यांसह कुदळ, फावडे, टोपली, विळा अशा वस्तूंचा संग्रह पाहायला मिळत आहे. उत्तर सोलापूर तालुक्याचे कृषी अधिकारी धनंजय शेटे यांनी या कृषी साहित्याद्वारे पवार यांचा सत्कार करून उपक्रमाला वेगळी दिशा दिली. तसेच, भागाईवाडीचे माजी सरपंच शिवाजी घोडके पाटील यांनी वह्या व पेन देत अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष पवार यांचा सत्कार केला.

यावेळी बांधकाम विभागातील दिव्यांग वरिष्ठ सहाय्यक संतोष निळ, लेखा विभागातील रोहित घुले आदींनी अध्यक्ष दीपक वैद्य यांना खोऱ्या देऊन त्यांचा सत्कार केला.या उपक्रमामुळे केवळ दिखाऊ खर्चाला आळा बसत नाही, तर शेतकरी आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मदत होण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. परिणामी, सोलापूर झेडपीतील हा सत्काराचा नवा पायंडा समाजासाठी आदर्श ठरत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# 'गुढीपाडवा पट वाढवा' अंतिम आकडेवारी आज होणार जाहीर

## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पाच तालुक्यांची नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढवण्यासाठी राबविण्यात आलेल्या 'पट वाढवा' अभियानाला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत पाच तालुक्यांतील नोंदणीची आकडेवारी जाहीर झाली असून, सर्वाधिक नोंदणी माढा तालुक्यात झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सुमारे ८० टक्के सर्वेक्षण व गृहभेटी पूर्ण झाल्या असून, प्रवेशाची अंतिम आकडेवारी २५ मार्चपर्यंत स्पष्ट होणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

### तालुकानिहाय नोंदणी स्थिती (एकूण प्रवेश, प्रलंबित या क्रमाने)

करमाळा : १८८७ (१३९४)४५३
माढा : ३२१० (१४८५)१७२५
मोहोळ : २६९३, (१९२५) ७६८
मंगळवेढा : १७३४, (३२७ ) १४०७
बार्शी : १७०० (१०५८) ६४२

दि. ६ ते २५ मार्च या कालावधीत नियोजनबद्ध पद्धतीने हे अभियान राबविण्यात आले. पूर्वतयारीच्या टप्प्यात (६ ते ११ मार्च) गावांतील सहा वर्षे पूर्ण झालेल्या मुलांची यादी तयार करण्यात आली.

अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या व ग्रामसेवक यांच्या सहकार्याने ही माहिती संकलित करण्यात आली. यानंतर शिक्षकांच्या बैठका घेऊन जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना अभियानाची सविस्तर माहिती देण्यात आली. दि.१० ते १३ मार्चदरम्यान जनजागृती मोहीम राबवून घरभेटी, बॅनर, पोस्टर, भिंतलेखन, दवंडी आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून पालकांपर्यंत संदेश पोहोचविण्यात आला. दि.१४ ते १६ मार्च या कालावधीत प्रवेश प्रक्रियेची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली.

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. नव्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिलीच्या प्रवेश नोंदणीला प्रारंभ झाला असून विद्यार्थ्यांना पेन, वह्या व फुले देऊन प्रोत्साहित करण्यात आले. दरम्यान, आज या उपक्रमाची अंतिम आकडेवारी कळणार आहे.

# शिंगणापूर यात्रेसाठी जिल्हातून ९० बसेस

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २४ मार्च-**

**अकलूज आगर प्रमुख प्रमोद शिंदे यांची माहिती**

अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत असण्याऱ्या शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवाची यात्रा सुरु झाली असून २९ मार्च,व ३० मार्च यात्रेचे प्रमुख दिवस असून या यात्रेसाठी सोलपुर जिल्ह्यातून ९० एसटी बसेस तैनात करण्यात आल्याची माहिती अकलूज आगर प्रमुख प्रमोद शिंदे यांनी दिली.

या यात्रेसाठी सोलापूर आगार १२,पंढरपूर आगार १४,बार्शी १८,अक्कलकोट ४, करमाळा १२,अकलूज ११,सांगोला ५,कुर्डूवाडी ६,मंगळवेढा ८ अश्या ९० एसटी बसेस यात्रेसाठी तैनात करण्यात आल्या आहेत. नातेपुते बस स्थानकात सकाळी सहा ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतूक नियंत्रक असणार आहे.तसेच नादुरुस्त एसटी दुरुस्त करण्यासाठी दोन पाळ्या मध्ये कर्मचारी तैनात ठेवण्यात येणार आहेत .तसेच शिंगणापूर येथेही दुरुस्तीसाठी कर्मचारी व एस स्वतंत्र बस ठेवण्यात येणार आहे.यात्रेकरूंची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात असल्याची माहिती शिंदे यांनी दिली.



# भोंदू बाबा अशोक खरातचा प्रतिकात्मक एन्काऊंटर

## फाशीची शिक्षा द्यावी किंवा इन्काऊंटर करा; महिलांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

महिलांच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी भोंदू बाबा अशोक खरात याच्या प्रतीकात्मक पुतळ्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने चार हुतात्मा चौकात जोडे मारून व महिला भगिनींच्या हस्ते गोळ्या घालून प्रतीकात्मक स्वरूपात एन्काऊंटर करण्यात आले. अनेक महिलांवर अत्याचार करणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात याला फाशीची शिक्षा द्यावी किंवा सरकारने तात्काळ त्याचा इन्काऊंटर करावा अशी मागणी करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष म िनलदास, मनीषा कोई, सोनाली सगर, संजीवनी सलबत्ती, गणेश कदम, बाबासाहेब सपाटे, तेजस शेळके, रमेश भंडारे, फिरोज सय्यद, इर्षद नागोरे, जैनुद्दीन नदाफ, संतोष सुरवसे आदी उपस्थित होते.

# ग्रामीण रुग्णालय मंगळवेढ्यात ४४ कुपोषित बालकांचे तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २४ मार्च-**

ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे जागतिक क्षयरोग दिनानिमित्त क्षयरोग पथक मंगळवेढा व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने कुपोषित बालकांचे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसाहेब जानकर व वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिरात वैद्यकीय अधिकारी बालरोगतज्ञ डॉ. सुरज साठे यांनी सुमारे ४४ बालकांची आरोग्य तपासणी केली. यावेळी बालकांचे एक्स-रे, रक्त तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. साठे यांनी क्षयरोगाची लक्षणे, निदान व उपचार याबद्दल माहिती सांगून लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवक यांनी निश्चय मित्र बनवून क्षयरुग्णांना पोषण आहार किट देऊन टीबी मुक्त भारत अभियानात आपला सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक प्रल्हाद नाशिककर यांनी २४ मार्च ते १८ ऑगस्ट यादरम्यान अति जोखमीच्या गावांमध्ये शंभर दिवसांचे अभियान राबविण्यात येणार असून आयुष्यमान आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आल्याचे सांगितले. या विशेष अभियानात संशयितची मोफत थुंकी तपासणी, एक्स-रे काढणे, रक्तदाब, मधुमेह आदी तपासण्या करण्यात येणार असल्याचे सांगितले.

शिबिरासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण माने, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ.अनिल चौगुले, डॉ. धनश्री केंदुळे डॉ. ऋतुजा गायकवाड डॉ. स्नेहा गंदगे, अधिपरिचारिका सुवर्णा सगरे, वैशाली शिंदे, औषध निर्माण अधिकारी अविनाश पट्टणशेट्टी, रेश्मा सरडे, विवेकानंद कसबे, परिचारिका सुरेखा खरात, सुनिता सातालोलू, प्रयोगशाळा तंत्रज्ञ निकिता कोंडा, सीमा मुलगे, अतुल अवघडे, समुपदेशक आबासाहेब नागणे, एनएमए वीरभद्रेश्वर दसरे यांनी परिश्रम घेतले.

# पैशाच्या वादातून युवकास मारहाण; दाम्पत्याविरुद्ध तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ मार्च-**

तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे पैशाच्या जुन्या वादातून एका युवकास मारहाण केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी संबंधित दाम्पत्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिर्यादी रणजित विजयसिंह पाटील (वय ३२, रा. श्रीपतपिंपरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन, त्यांच्या वडिलांचा आणि गावातील पप्पू इनिस्टर पवार यांच्या पत्नी रंजना पवार यांच्यात काही दिवसांपूर्वी पैशाच्या देवाणघेवाणीवरुन वाद झाला होता. २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास रणजित पाटील हे गावातून आपल्या घरी जात असताना पवार यांच्या घरासमोर आले. त्यावेळी रंजना पवार यांनी पैशाच्या कारणावरुन शिवीगाळ करण्यास सुरुवात केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, त्यानंतर पप्पू इनिस्टर पवार हे तेथे येऊन शिवीगाळ करत वाद घालत त्यांनी जवळच पडलेल्या लाकडी काठीने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या दंडावर व पाठीवर मारहाण केली. तसेच रंजना पवार यांनीही हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेच्या वेळी तेथे उपस्थित असलेल्या काही ग्रामस्थांनी हस्तक्षेप करत दोन्ही बाजूतील वाद सोडवला. मारहाणीत जखमी झालेल्या रणजित पाटील यांनी घरी जाऊन कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली. जखमी अवस्थेमुळे आणि रात्री उशीर झाल्याने त्वरित पोलिसांत जाणे शक्य न झाल्याचे फिर्यादीने सांगितले आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी बार्शी ग्रामीण रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर त्यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात अधिकृत फिर्याद दाखल केली.

मारहाणीच्या घटनेनंतर संबंधितांनी आपल्यावर खोटा ट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीने आपल्या तक्रारीत केला आहे. या प्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात पप्पू इनिस्टर पवार व रंजना पवार या दोघांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले विधानसभेचे कामकाज

## आमदार अभिजीत पाटील यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च-**



पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी नुकतीच विधान भवनात अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज प्रेक्षक गॅलरीतून प्रत्यक्ष पाहून लोकशाही प्रक्रियेचा अनुभव घेतला. सभागृहातील कामकाज कश्या पद्धतीने चालते, लोकप्रतिनिधी जनतेचे प्रश्न कसे मांडतात? राज्याच्या विकासासाठी निर्णय कसे घेतले जातात. यांची मुलांना माहीती देखील सांगितल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

जिल्हा परिषद शाळेतील मुलांच्या मुंबई भेटीबद्दल माहिती देताना आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले की, प्रत्येकालाच मुंबईचं आर्कषण आहे, आयुष्यात एकदा तरी मुंबईला जावं; हि प्रत्येकाच्या मनातील इच्छा असते. अशा शहरात आल्यावर यातूनच त्यांच्या विचारांना, नव्या स्वप्नांना देखील पंख फुटतात, मोठी ध्येय ठेवण्याची प्रेरणा मिळते आणि आयुष्यात काहीतरी मोठे करण्याची मनात जिद्द होते.

पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील मुलं जेव्हा पहिल्यांदाच मुंबईसारख्या मोठ्या शहरात पाऊल ठेवतात, तेव्हा त्यांच्या डोळ्यांत दिसणारा आनंद, उत्साह आणि मोठी स्वप्ने खरोखर प्रेरणादायी वाटतात. विद्यार्थ्यांनी मोठं होऊन सभागृहात उच्च अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी म्हणून कामकाज पहावं अशा शुभेच्छा देखील यावेळी विद्यार्थ्यांना दिल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.यासोबतच गावाकडची जुनी म्हण म्हणजे; जीवाची मुंबई लहानग्या मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद खूप काही सांगून जात होता. त्यांच्या देखील आयुष्यातील कधीच न विसरणारा क्षण असून त्यांच्या आनंदात खूप समाधान मिळाल्याचं देखील आमदार पाटील यांनी सांगितले.

**मुंबईत या ठिकाणी दिल्या भेटी**

गेट वे इंडिया, मंत्रालय, राजकीय नेत्यांची शासकीय घर, उद्योजकांचे बंगले, अभिनेत्यांची घरे, खाऊगल्ली, नरिमन पॉईंट, वानखेडे स्टेडियम. मोठमोठ्या इमारती बघून मुलांच्या चेहऱ्यावर जणू प्रश्नचिन्हच उभा राहिले होते.

# आत्मविश्वास देणारे भारत विकास परिषदेचे दिव्यांग शिबीर

## २०४ दिव्यांगांना मॉड्युलर हात आणि पाय मोफत बसविले

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ मार्च-**

येथील सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात लोकोपयोगी समाजसेवा करणाऱ्या भारत विकास परिषद शाखा पंढरपूर यांच्या वतीने रविवारी (दि.२२ मार्च गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे २०४ दिव्यांगांना मॉड्युलर हात आणि पाय मोफत बसवून देण्यात आले.

या मोफत दिव्यांग शिबिरात राज्यभरातून दिव्यांग बांधव सहभागी झाले होते.वसमत, जालना, धुळे, जळगाव, लातूर, इचलकरंजी, सोलापूर जिल्ह्यातील लोक या शिबिरात आले होते. या शिबिरात सर्व दिव्यांग व त्यांच्या सोबतच्या सहकाऱ्याची भोजनाची सोय करण्यात आली होती. याआधी दि.१४ फब्रुवारी रोजी या दिव्यांग लाभार्थी रुग्णांच्या हात-पायाची मापे घेण्यात आली होती. सुमारे पन्नास हजार रुपये किंमतीचे हात पाय असून आधुनिक पद्धतीने बनविण्यात येतात आता या लोकांना इतर सर्वसामान्य लोकांप्रमाणे हात, पाय वाकविता येतील. या दिव्यांग शिबिराचे आयोजन पुणे येथील गेल महाराष्ट्र नॅचरल गॅस एजन्सी, पुणे दिव्यांग केंद्र, भारत विकास परिषद यांच्या वतीने करण्यात आले होते. भारत विकास परिषद शाखा पंढरपूरचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेन्द्र काणे, अध्यक्षा स्मिता कोर्टीकर, सचिव मंदार केसकर, कोषाध्यक्ष सुनील परळीकर, दिव्यांग केंद्र पुणे चे विनय खटावकर, डॉ.वर्षा काणे, पुणे येथुन राजशेखर अभ्यंकर, सुधीर कुलकर्णी उपस्थित होते. याप्रसंगी शिबिरास सहकार्य करणाऱ्या कर्मयोगी नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी व पुणे येथील स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला.

### जिद्द कधी दिव्यांग नसते

भारत विकास परिषदेच्या वतीने आयोजित केलेले मोजमाप व वाटप शिबिरातून आम्ही दिव्यांगांना हात-पाय नव्हे तर एक आत्मविश्वास देऊ शकलो ही भावना सर्व सदस्यांच्या मनात उत्पन्न झाली. शिबिरातून परत जाणाऱ्या अनेक दिव्यांगांच्या मनात मर्यादा शरीरात असतात पण जिद्द कधी दिव्यांग नसते ही भावना दिसून आली.



### दिव्यांग बांधवाच्या हस्ते उद्घाटन

या मोफत दिव्यांग शिबिरासाठी वसमत येथील एक दिव्यांग व्यक्ती पहाटे तीन वाजता आले होते, याच दिव्यांग बांधवांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

### जान्हवीचे डोळे पाणावले

या शिबिरात पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथील केवळ दहा वर्षांची शेतकरी कुटुंबातील चिमुरडी जान्हवी रघुनाथ येळे या मुलीचा हात ती केवळ तीन वर्षांची असताना कडबा कुट्टी मशीनमध्ये गेला आणि तिने हाताचा पंजा गमावला, कोर्टि येथील भारत विकास परिषद सदस्य प्राथमिक शिक्षक मनोज कुलकर्णी यांनी या मुलीच्या पालकांना या दिव्यांग शिबिराची माहिती दिली होती, या मुलीला तिचा हात या शिबिरात परत मिळाला. जान्हवी हिने डोळ्यात आनंदाश्रू आणून भारत विकास परिषद शाखा पंढरपूरचे आभार मानले.

## महत्वाचे...



### श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयात क्रांतिकारकांना अभिवादन

**बार्शी, दि. २४ मार्च-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयात शहीद दिनानिमित्त दि. २३ मार्च रोजी सकाळी भारतमातेचे थोर वीर सुपुत्र शहीद भगतसिंग, सुखदेव,राजगुरु यांच्या प्रतिमेचे पुजन व विनम्र अभिवादन वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, ऑ.सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक प्रमोद भंडारी यांचे हस्ते करण्यात आले. या सर्वांनी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन संचालक प्रमोद भंडारी यांनी केले. वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, सहा. ग्रंथपाल शितल लुकडे, क्लार्क विराज पतंगे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



### अशोक कामटे विचारमंचतर्फे शहीदांना अभिवादन

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

तुळतापुरवेस बलिदान चौक या ठिकाणी शहीद अशोक कामटे विचारमंचतर्फे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वःताच्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद भगतसिंग,राजगुरू, सुखदेव यांच्या स्मरणार्थ देशभरात शहीद दिवस साजरा केला जातो. २३ मार्च रोजी इंग्रजांनी घटसिंग राजगुरू आणि सुखदेव या भारत मातीच्या वीर जवानांना फाशी दिली होती त्यांच्या या बलिदानामुळे भारतीय स्वातंत्र आणायला नवीन दिशा मिळाली त्यामुळे आजचा दिवस शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. याप्रसंगी बलिदान चौक या ठिकाणी शहीद भगतसिंग, सुखदेव राजगुरू या विरांना स्मरण करून पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी शहीद अशोक कामटे विचारमंच मंचचे अध्यक्ष योगेश कुंदुर, आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, एमएसईबीचे अधिकारी विलास कोले, आस्था सामाजिक संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, दिपक उपळकर, व्यास, गिरीष विजापुरे, विकास कुंदुर, मुद्दसर तांबोळी, संतोष गायकवाड उपस्थित होते.



### नवले सिंहगड महाविद्यालयात पालक सभा उत्साहात

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले. जनरल सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही सभा सर एम. विश्वेश्वरय्या सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाली. या कार्यक्रमात प्रथम वर्षाच्या सेमिस्टर-१ विद्यापीठ परीक्षेतील उल्लेखनीय निकालाची माहिती पालकांना देण्यात आली. परीक्षेत ८ विद्यार्थ्यांनी १० पैकी १० एसजीपी मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले, तर ५७ विद्यार्थ्यांनी 'O' ग्रेड प्राप्त केली. तसेच २ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या पहिल्या दहा गुणवंतांमध्ये स्थान मिळवले. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा विद्यापीठ निकालात लक्षणीय सुधारणा झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमाला कॅएणणम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. एस. डी. नवले, सीआरटीडीचे संचालक डॉ. एस. एच. पवार, डॉ. के. एस. पाटील, डॉ. ए. ए. कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



### पंढरपूर अर्बंन बँकेच्या मुख्यकार्यकारी अधिकारीपदी उमेश विरधे

**पंढरपूर, दि.२४ मार्च -**

येथील पंढरपूर अर्बंन बँकेच्या मुख्यकार्यकारी अधिकारीपदी उमेश विरधे यांना तिसऱ्यांदा मुदत वाढ देण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या बँकेच्या सर्वसाधारण सभेत बँकेच्या प्रगतीसाठी श्री.विरधे हे पुन्हा एकदा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून या पुढील तीन वर्षांसाठी अर्थात सन २०२९ पर्यंत आपली सेवा देणार असल्याचे बँकेचे सर्वेसर्वा तथा माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी जाहीर केले. यावेळी बँकेच्या वतीने विरधे यांचा सत्कार देखील करण्यात आला. बँकिंग क्षेत्रातील व सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि संस्थेप्रतीची निष्ठा पाहून पंढरपूर अर्बंन बँकेचे सर्वसर्वो तथा माजी आमदार प्रशांत परिचारक, बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, तसेच पंढरपूर अर्बन बँकेचे सर्व संचालक मंडळ यांनी पुन्हा एकदा विरधे यांच्यावर विश्वास दाखवला आहे. यावेळी बँकेचे अध्यक्ष सतिश मुळे, पांडुरंग कारखान्याचे माजी अध्यक्ष दिनकर मोरे उपस्थित होते.

आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# गाडेगांव येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर



**बार्शी, दि. २४ मार्च-**

तालुक्यातील गाडेगांव येथे मातृभूमी प्रतिष्ठान संचलित भगवंत नेत्रालय यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्योजक विकास भालके यांच्या पुढाकारातून व नियोजनातून हे शिबीर पार पडले. शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, एकूण ७१ नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीनंतर १३ रुग्णांना डोळ्यांच्या शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान झाले असून या सर्व रुग्णांची शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी व डोळ्यांच्या आजारांचे लवकर निदान व्हावे, या सामाजिक उद्देशातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी माजी उपसभापती अविनाश मांजरे, नेत्रालय समितीचे अध्यक्ष प्रा. किरण गाढवे, उद्योजक विकास भालके, सरपंच कौसर मुलाणी, उपसरपंच गजानन बोराडे, सोसायटी चेअरमन विक्रम जगताप, माजी उपसभापती अविनाश मांजरे, तसेच डॉ. अमित भालके, अनिकेत भालके व अक्षय भालके उपस्थित होते.



## महत्त्वाचे



### पिलीव येथील आरोग्य, रक्तदान शिबीरात १६३ जणांचे रक्तदान

**पिलीव दि २४ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १६३ जणांनी रक्तदान तर ४०० पेक्षा जास्त नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. योवळी ७०० जणांना आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी दहा हजार आयुष्यमान भारत कार्ड वाटप करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. स्व. ज्ञानेश्वर पडळकर फाऊंडेशन यांच्यावतीने भाजपचे नेते सचिन पडळकर यांच्या पुढाकाराने व महालक्ष्मी ग्रामविकास पॅनल तसेच पिलीव भाजपा शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले होते. याचे उद्घाटन जि.प. सदस्य चंद्रकांत जाधव, पंचायत समिती सदस्या नम्रता पुकळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिन पडळकर, उमेश सरवदे, भजनदास चोरमले, शिवराज पुकळे, संजय पाटील, गणेश देशमुख, अतुल नष्टे, नितीन कपने, सचिन भैस, निशांत बगाडे, प्रवीण वाघमारे, योगेश देशमुख, अंकुश भैस, फिरोज शेख, निलेश कांबळे, संकेत देशमुख, दामोदर लोखंडे, निसार मुलाणी, फिरोज शेख उपस्थित होते.



### वेळापूर ग्रामपंचायतीकडून पाच टक्के दिव्यांग निधीचे वाटप

**वेळापूर, दि.२४ मार्च-**

वेळापूर ग्रामपंचायतीकडून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील ५ टक्के दिव्यांग निधीअंतर्गत पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. दिव्यांग कल्याणासाठी २ लाख १७ हजार ८८६ इतका निधी आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीमार्फत १८ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ११ हजार रुपये निर्वाह भत्ता धनादेशाच्या स्वरूपात देण्यात आला. या धनादेश वितरणाचा कार्यक्रम ग्रामपंचायत वेळापूर येथे पार पडला. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासो मुंगुसकर तसेच ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना धनादेश प्रदान करण्यात आले. यावेळी दादा तुपे, ग्रामपंचायत कर्मचारी सुरेश जाधव, महेश देवकते, बाबा तुपे, दीपक जाधव व पूजा लावंड उपस्थित होते.

### कुटुंबातील वैवाहिक वादातील प्रकरणात अटकपूर्व जामीन मंजूर

**बार्शी दि. २४ मार्च-**

सिंहगड रोड पोलीस ठाण्यात दाखल वैवाहिक वादाच्या प्रकरणात पुणे सेशन कोर्टाने आरोपींना मोठा दिलासा देत अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून पोलीस कोठडीची आवश्यकता



नसल्याने आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर केला. यात आरोपींच्यावतीने अॅड. शिवाजी क्षीरसागर, अॅड. पवन क्षीरसागर आणि अॅड. अक्षय बिडबाग यांनी बाजू मांडली. या प्रकरणात पतीसह त्याच्या कुटुंबीयांना आरोपी करण्यात आले होते. यात तक्रारदार पत्नीने वैवाहिक वादातून क्रूरता व छळाचे आरोप करत गुन्हा दाखल केला होता. बचाव पक्षाने न्यायालयासमोर मांडले की, तक्रार उशिराने दाखल झाली असून त्यातील आरोप सर्वसाधारण, अतिशयोक्त आणि खोट्या स्वरुपाचे आहेत. तसेच पती-पत्नीमधील किरकोळ मतभेदांना गुन्हेगारी रंग दिला आहे. इतर कुटुंबीयांविरुद्ध कोणतीही ठोस आरोप नमूद नाहीत. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला गुन्ह्यात ओढणे हे कायद्याचा गैरवापर असल्याचे सांगण्यात आले.

# शिक्षक पात्रता परीक्षेबाबत शासन दाखल करणार पुनर्विचार याचिका

## राज्यमंत्री पंकज भोयर; पंढरपूर येथे शिक्षक परिषदेचा प्रशिक्षण वर्ग उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ मार्च-**

शासन शिक्षक पात्रता परीक्षाबाबत लवकरच सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याचे आश्वासन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी प्रशिक्षण वर्गातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना दिले.

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग) यांचा दोन दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग दि. २१ व २२ मार्च रोजी एस. के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) येथे उत्साहात संपन्न झाला.

या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन शालेय शिक्षण, गृह व सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आभासी पद्धतीने केले. राष्ट्रीय उपाध्यक्ष भिखाभाई पटेल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमास शेषाद्री अण्णा डांगे, डॉ. कैलास करांडे, डॉ. बी. पी.रोंगे, प्रा. डॉ. प्रदीप खेडकर, प्रा. डॉ. शेखर चंद्रात्रे व प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे उपस्थित होते.





### दोन प्रशिक्षणात सात सत्रांचे आयोजन

महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांतील सुमारे ३५० कार्यकर्त्यांनी या प्रशिक्षण वर्गात सहभाग नोंदवला. दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण वर्गात एकूण सात सत्रांचे आयोजन करण्यात आले.यामध्ये 'एनईपी २०२०', त्याची अंमलबजावणी व शिक्षकांची भूमिका, 'विमर्श', संघटन कार्य, तसेच 'एआय आणि भविष्यातील शिक्षण' व 'पंच परिवर्तन दायित्व बोध' या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रांमध्ये शेषाद्री डांगे, सचिन लादे, भिखाभाई पटेल, संदीप सावेकर आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय सचिव प्रा. डॉ. प्रदीप खेडकर यांनी समारोप प्रसंगी या प्रशिक्षण वर्गातून शिक्षक परिषदेच्या संघटनात्मक विस्तारात आमूलाग्र बदल घडून येईल, असा विश्वास व्यक्त केला.

पंढरपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार समाधान आवताडे यांनी समारोप कार्यक्रमास उपस्थित राहून 'राष्ट्र प्रथम' या विचाराने कार्य करणाऱ्या शिक्षक परिषदेच्या कार्यास शुभेच्छा देत सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिले. या प्रशिक्षण वर्गाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे, कार्यवाह पुरुषोत्तम काळे, कोषाध्यक्ष अविनाश तालापल्लीवार, संघटन मंत्री सुरेश दंडवते, प्रांत प्रवक्ते दत्तप्रसाद पांडागळे, कार्याध्यक्ष मच्छिंद्र गुरमे, रमेश क्षीरसागर, किरण कुंभार, सहकार्यवाह राकेश आव्हाड, किशोर पिसे, नितीन पवार, उपाध्यक्ष डॉ. अवधूत वानखेडे, महिला आघाडी प्रमुख वैशाली काकडे, सहप्रमुख सुरेखा ताजवे, मराठवाडा विभाग अध्यक्ष संजय कोठाळे, नाशिक विभाग अध्यक्ष रामकृष्ण बागल, नागपूर विभाग कार्यवाह विजय साळवे, डॉ. सचिन लादे , सुनील जगताप आबा देवकुळे व रामेश्वर कोरे यांनी परिश्रम घेतले.

# माळशिरस बांधकाम कामगार स्थानिक सल्लागार शासकीय समिती अध्यक्षपदी आ. उत्तमराव जानकर



**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. २४ मार्च-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांच्या आदेशानुसार माळशिरस विधानसभा मतदारसंघासाठी बांधकाम कामगार स्थानिक सल्लागार शासकीय समिती स्थापन करण्यात आली आहे. याच्या अध्यक्षपदी आमदार उत्तमराव जानकर यांची नियुक्त करण्यात आली. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या संदर्भानुसार ही समिती गठीत करण्यात आली असून बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविणे, कामगारांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवणे तसेच योजनांची अंमलबजावणी सुलभ करणे यासाठी ही समिती कार्य करणार आहे.

### माळशिरस विधानसभा मतदारसंघातील कामगारांना होणारे फायदे

शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न, कामगारांची नोंदणी करून नोंदणीकृत कामगारांना विविध योजना मिळवून देणे, कामगारांना आरोग्य सहाय्य, अपघात मदत, शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य व सामाजिक सुरक्षा योजना उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन, कामगारांच्या समस्या व अडचणी शासनापर्यंत पोहोचवून त्यांचे निराकरण करण्यासाठी समन्वय साधणे, कामगारांमध्ये शासनाच्या योजनांविषयी जनजागृती करणे, कामगारांच्या कल्याण, सुरक्षितता व सामाजिक संरक्षणासाठी उपाययोजना राबविणे.

**समितीतील अन्य सदस्य याप्रमाणे** : सुधीर हनुमंत पवार, विकास संदीपन धाईंजे - (पुरुष बांधकाम कामगार प्रतिनिधी), वर्षा बलभीम रसाळ, शमशाद बेगम अकबर शिकलगर (महिला बांधकाम कामगार प्रतिनिधी), शिवराज जगथीश निंबाळकर, रणजित दिगंबर सातपुते - (बांधकाम क्षेत्रातील मालक प्रतिनिधी). सदस्य सचिव : सहाय्यक कामगार आयुक्त / सरकारी कामगार अधिकारी.

# आळजापूरच्या सिमरन शेखने २० व्या वर्षी साकारले पोलिस होण्याचे स्वप्न

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २४ मार्च-**

तालुक्यातील आळजापूर येथील सिमरन हजीज शेख (पटेल) हिने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर धाराशिव जिल्हा पोलीस दलात कॉन्स्टेबलपदी निवड मिळवत आपल्या गावाचे आणि कुटुंबाचे नाव उज्वल केले आहे. अवघ्या २० व्या वर्षी मिळवलेल्या या यशामुळे आळजापूरसह परिसरात तिचे कौतुक होत आहे.



सिमरन हिने आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, आळजापूर येथे पूर्ण केले, तर माध्यमिक शिक्षण गौडगाव येथील मल्टी पर्पज आदर्श न्यू इंग्लिश स्कूलमध्ये घेतले. पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी ती भूम येथील श्री एस कडमीमध्ये ७ फेब्रुवारी २०२४ पासून नियमित प्रशिक्षण घेत होती.

### पहिल्या अपयशानंतरही हार मानली नाही

पोलीस भरतीच्या पहिल्या प्रयत्नात अपयश आले असतानाही सिमरन खचली नाही. उलट अधिक जोमाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने तिने अभ्यास व शारीरिक सराव सुरु ठेवला. दुसऱ्या प्रयत्नात तिने लेखी आणि शारीरिक चाचण्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. ग्रामीण भागातून येऊन कठीण स्पर्धा परीक्षेत यश मिळवणे ही सोपी बाब नसताना सिमरनने आपल्या कष्टाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. सिमरन म्हणाली की, पोलीस भरतीच्या पहिल्या प्रयत्नात अपयश आले, पण मी खचले नाही. सातत्य, अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर प्रामाणिकपणे प्रयत्न करत राहिले आणि दुसऱ्या प्रयत्नात यश मिळाले.

# गावागावात, क्लस्टर स्तरावर शेतमाल खरेदी केंद्रांचे जाळे विस्तारण्यात यावे

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २४ मार्च-**

माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आज लोकसभेत शेतकऱ्यांच्या समस्यांवर जोरदार आवाज उठवला. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळावा यासाठी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे मागणी केली.

खासदार मोहिते-पाटील यांनी शेतकऱ्यांची सोय व्हावी यासाठी गावागावात किंवा क्लस्टर स्तरावर खरेदी केंद्रांचे जाळे विस्तारण्याबाबत सरकारचा प्रस्ताव काय आहे, असा प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, शेतकऱ्यांच्या संपूर्ण उत्पादनाची योग्य खरेदी व्हावी यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे मिळून काम करत आहेत. भारतीय खाद्य महामंडळ, नेफेड आणि राज्य सरकारांच्या विविध एजन्सीमार्फत ही खरेदी प्रक्रिया राबवली जाते. जिथे गरज असेल तिथे नवीन खरेदी केंद्रे उघडली जातील.

खासदार मोहिते-पाटील यांनी यावेळी एक महत्त्वाचा उपप्रश्नही विचारला. MSP आणि बाजारभाव यांमधील तफावत दूर करण्यासाठी MSP ला कायदेशीर गॅरंटी देण्याची किंवा 'प्राईस डेफिशियन्सी पेमेंट' (मूल्य तफावत भरपाई) सारखी प्रणाली लागू करण्याची सरकारची कोणती योजना आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर स्पष्टीकरण देताना मंत्री चौहान यांनी सांगितले की, आमच्या सरकारने केवळ गहू आणि तांदूळच नव्हे, तर कडधान्ये, तेलबिया आणि अगदी फळे-भाज्यांचीही मोठ्या प्रमाणात खरेदी केली आहे. पंतप्रधान अन्नदाता आय संरक्षण अभियानसारख्या योजनांमुळे शेतकऱ्यांना आधार मिळत असून, त्यांना योग्य भाव मिळवून देण्यात सरकार कोणतीही कसर सोडणार नाही. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या या प्रश्नामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांवर केंद्र सरकारचे स्पष्ट धोरण पुन्हा एकदा समोर आले आहे. PM-SH योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमी भाव मिळवून देण्याची सरकारची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.



# वेळापूर नगरीत अर्धनारी नटेश्वराचा हळदी सोहळा भक्तिभावात

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत यात्रोत्सवाला दिमाखात प्रारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २४ मार्च-**

वेळापूर नगरीचे आराध्य दैवत अर्धनारी नटेश्वर यांच्या वार्षिक यात्रोत्सवाला भक्तिभाव, परंपरा आणि उत्साहाच्या वातावरणात प्रारंभ झाला. यात्रेतील प्रमुख मानला जाणारा हळदी सोहळा सोमवारी अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी सोलापूर जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने वेळापूर येथे दाखल झाले होते.

गुढीपाडव्याच्या सणापासून यात्रेला प्रारंभ होत असला तरी देवाच्या हळदी सोहळ्याने यात्रेचा खऱ्या अर्थाने शुभारंभ मानला जातो. सोमवारी दुपारी चारनंतर मंदिर परिसरात धार्मिक विधींना सुरुवात झाली. प्रारंभी अर्धनारी नटेश्वराला गरम पाण्याने व त्यानंतर गार पाण्याने विधिवत स्नान घालण्यात आले. त्यानंतर देवाचा मानाचा पोशाख गणेश सावता वसेकर यांनी आणून दिला. तो पोशाख देवाला परिधान करून त्यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. देवाच्या दारात सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. मंदिराच्या आत व बाहेर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने उजळून निघाला होता.

अर्धनारी नटेश्वराची विधिवत पूजा झाल्यानंतर उपस्थित महिलांनी मोठ्या भक्तिभावाने देवाला तेल व हळद अर्पण केली. यावेळी देवाचे पुजारी असणाऱ्या गुरव कुटुंबातील पाच महिलांसह पं.स. सदस्या विमल जानकर, जि.प. सदस्या मीनाक्षी मिलिंद सरतापे, सीमा खाडे, प्रियंका आडत, अर्चना गुरव, संजीवनी गुरव, अश्विनी गुरव, अर्चना उरणे, सोनाली गाढवे, अनिता बनसोडे, अश्विनी भानवसे, आधीश्री गाढवे, शिवानी गाढवे, राधिका होडगे, दिशा होडगे यांच्यासह हजारो महिलांनी देवाला हळद लावून भक्तीभाव व्यक्त केला. यानंतर अर्धनारी नटेश्वराला मानाचा पोशाख परिधान करून आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना माळी समाजाच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

धार्मिक विधी गौरीहर गुरव, सतीश गुरव व रविराज गुरव यांनी पार पाडले. हळदी सोहळ्याच्या पारंपरिक मानाप्रमाणे पालकर परिवाराच्या वतीने पार्वती देवीला चूडा ठेवण्यात आला. यावेळी मोहन पालकर, मनीषा पालकर व अंजली शशिकांत पालकर यांनी महिलांना बांगड्या भरल्या. तसेच होडगे परिवाराच्या वतीने राधिका होडगे, अनिता होडगे, दिशा होडगे, अनुराधा होडगे, आशा बिले, अनुराधा पोरे व रतन होडगे यांनी महिलांना हळदी-कुंकू लावून त्यांची ओटी भरली.

या हळदी सोहळ्याचे पोरोहित्य पुजारी गौरीहर गुरव, सतीश गुरव व रविराज गुरव यांनी केले. कार्यक्रमास प.स. सदस्या विमलताई जानकर, जि.प.सदस्या मीनाक्षी मिलिंद सरतापे, वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुसकर, रिपाई (आठवले) माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, यावेळी यात्रा कमिटीचे अध्यक्ष काशिनाथ आडत, उपाध्यक्ष अॅड. विठ्ठल मंडले, उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, सेक्रेटरी विजय पवार, सदस्य मनोहर माने तसेच महादेव ताटे, सुरेश पिसे, धनंजय माने-देशमुख, भागवत गायकवाड, कैलास सुरवसे, शंकर आडत, महादेव म्हेत्रे, शिवाजी सावंत, सावता मेहत्रे, शिवाजी मोहिते, गौरीशंकर गाढवे, संतोष मेहत्रे, युवराज मंडले, प्रदीप सरवदे, डॉ. धनंजय मेहत्रे, राहुल सराटे, अक्षय गाढवे आदींसह यात्रा कमिटीचे सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व हजारो महिला भाविक उपस्थित होत्या.